अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर २००८ किंमत :रुपये १५















‘द मॅन बुकर’

# ‘द व्हाइट टायगर’

– अरविंद अडिगा

२००८च्या ‘द मॅन बुकर’ पारितोषिकाचे मानकरी ठरलेल्या अरविंद अडिगा लिखित ‘द व्हाइट टायगर’ या जगप्रसिद्ध आणि विक्रमी मागणी असलेल्या इंग्रजी पुस्तकाचे मराठी अनुवादासाठी स्वामित्व हक्क ‘मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे’ यांना मिळाले आहेत.



“ ‘अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघा’ तर्फे देण्यात येणाऱ्या उत्कृष्ठ ग्रंथनिर्मीती पुरस्कार प्रसिद्ध चित्रकार सुभाष अवचट यांच्या हस्ते स्वीकारताना ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ चे सुनील मेहता. ”

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ डिसेंबर २००८
◆ वर्ष आठवे
◆ अंक बारावा

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

## – अनुक्रमणिका –

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **अदम्य जिद्द :** अनु. सुप्रिया वकील | ४८ |
| **डबेवाला :** अनु. सुप्रिया वकील | ५६ |
| **आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान :** निरंजन घाटे | ६२ |
| **आपल्या पूर्वजांचे विज्ञान :** निरंजन घाटे | ६८ |
| **मुलाखत :** एस. आनंद | ७६ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ८० |
| **पुरस्कार** | ८४ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९६ |
| **श्रद्धांजली** | ९९ |
| **बालनगरी** | १०५ |

✠ मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email** - info@mehtapublishinghouse.com
mehtapublishing@gmail.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादकसहमत असतीलच असे नाही.*



# संपादकीय

## मायकेल क्रायटन

'ज्युरॅसिक पार्क', 'द लॉस्ट वर्ल्ड', 'कांगो', 'प्रे', 'टाइमलाइन' वगैरे जागतिक कीर्तीच्या थरारकथांचे मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केलेले आहेत.

या थरारकथांचा लेखक मायकेल क्रायटन याचे ४ नोव्हेंबर रोजी कर्करोगाने निधन झाले. विज्ञानविषयक नवनव्या संकल्पनांना रंजक कथावस्तूंच्या कोंदणात बसवणारा एक प्रतिभाशाली साहित्यकार हरपला याचे दु:ख जगभर पसरलेल्या त्याच्या चाहत्यांना झाल्याशिवाय राहणार नाही. मायकेल क्रायटन हे एक जबरदस्त व्यक्तिमत्त्व होते आणि त्याचे सर्वच कर्तृत्व अचाट होते. एकतर सहा फूट नऊ इंच त्याची उंची. त्यामुळे भारदस्त वावर सर्वांनाच जाणवे.

वयाच्या १४ व्या वर्षापासून त्याचे प्रवासवर्णनात्मक लेख न्यूयॉर्क टाइम्समध्ये प्रसिद्ध होत. हार्वर्ड कॉलेजमध्ये असतानाच त्याच्या थरारकथा प्रसिद्ध होऊ लागल्या. अँथ्रापॉलॉजी घेऊन बी.ए. झाल्यावर इंग्लंडमध्ये संशोधनासाठी फेलोशिप मिळाली. तेथेच भेटलेल्या मुलीशी लग्न केले. नंतर डॉक्टर व्हायचे म्हणून हार्वर्ड मेडिकल स्कूलमध्ये प्रवेश घेतला. शिक्षण खर्च भागवण्यासाठी रहस्यकथा लेखनाचा मार्ग त्याने पत्करला. वर्षाला दोन दोन रहस्यकथा त्याने लिहिल्या. टोपणनावाने त्या प्रसिद्ध झाल्या. वैद्यकीय विषयावरील एक कथावस्तू त्याला सुचली. त्यातून 'दि अॅंड्रोमेडा स्ट्रेन' ही कादंबरी लिहून झाली. तिच्या चित्रपटाचे हक्क हॉलीवुडने १५ टक्के नफ्यातील वाटा, असे भरपूर मानधन देऊन घेतले. एम.डी. झाल्यावर त्याने वैद्यकीय पेशाऐवजी लेखनावरच लक्ष केंद्रित केले. पाच वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर पहिल्या पत्नीला घटस्फोट दिला. (त्याची एकूण पाच लग्ने झाली. पहिल्या चौघींना घटस्फोट दिला.)

पंधरा बेस्ट सेलर कादंबऱ्यांनी त्याला लक्षावधी डॉलर्स मिळवून दिले. त्याने नुसते कादंबरीलेखनच केले असे नाही. आपल्या कादंबऱ्यांवरचे चित्रपट दिग्दर्शित केले. 'दि ग्रेट ट्रेन रॉबरी' या चित्रपटाच्या निमित्ताने यूल ब्रायनर आणि सीन कॉनेरी

यासारख्या अग्रगण्य नटांनाही दिग्दर्शक म्हणून धडे दिले. 'ई आर' ही टीव्हीवरील त्याची सीरियलही अत्यंत यशस्वी ठरली. 'ट्विस्टर' या कादंबरीवरून संयुक्तपणे पटकथा लेखन केले. त्याच्याएवढ्या कादंबऱ्यांवर चित्रपट अन्य कोणा एका व्यक्तीच्या नावावर नाहीत. त्याच्या पुस्तकांच्या १५ कोटी प्रती विकल्या गेल्या. 'ज्युरॅसिक पार्क'ने बॉक्स ऑफिसवरही जगभर उच्चांक केला. १९९९ मध्ये त्याची वर्षाची कमाई साडेसहा कोटी डॉलर्सची होती. एकेका पुस्तकावर त्याला एकेक कोटी डॉलर्सची किमान कमाई होई. एकूण मायकेल क्रायटनचे लेखन, चित्रपट आणि जीवन सारेच काही अफाट होते. त्याच्या लेखनाचा झपाटा विलक्षण होता. दिग्दर्शक, चित्रपटनिर्मिती सर्व आघाड्यांवर त्याचा दबदबा होता. विज्ञानक्षेत्रातील नवनव्या सिद्धांतांबद्दलचे त्याचे आकलन विस्मयकारक होते. त्याचा उपयोग कथावस्तूच्या व्यामिश्र गुंतागुंतीसाठी करून घेण्यात त्याचा हातखंडा होता.

कादंबरीकार किंवा लेखक म्हणून त्याला ॲकॅडमिक क्षेत्रात महान मानले जात नव्हते. त्याबद्दल त्याला कधीच खंत वाटली नव्हती. आपल्या लेखनाचे स्वरूप आणि मर्यादा यांची त्याला कल्पना होती. विज्ञानातील नवे शोध, विज्ञानविषयक संशोधन करणाऱ्या संस्था वा संघटना, नवीन औषधे विकसित करणाऱ्या औषध कंपन्या, त्यांची गुंतवणूक, त्यांचे हितसंबंध, त्यात काही गफलत झाल्यास कोसळणाऱ्या आपत्ती, मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम, संधिसाधू लोकांनी या संशोधनाचा गैरफायदा घेण्याचे ठरवले तर त्यातून संभवणारे अनर्थ याबद्दल तो प्रत्येक कादंबरीतून धोक्याची घंटा वाजवताना दिसतो.

'ज्युरॅसिक पार्क'मध्ये अश्मीभूत जनुकांद्वारे पृथ्वीवरून नामशेष झालेल्या महाकाय डायनोसॉरची प्रयोगशाळेत पुनर्निर्मिती करण्याचा प्रयत्न, प्रचंड गुप्तता राखून एका कॉर्पोरेशनतर्फे सुरू होतो. डायनोसॉरची निर्मिती करण्यात यश येते. परंतु ह्या डायनोसॉरवर नियंत्रण ठेवण अशक्य होते, तेव्हा त्यांच्यासाठी तयार केलेल्या एका दरीतील अभयारण्याचाच विध्वंस सुरू होतो आणि डायनोसॉरच्या हल्ल्यात प्रयोगशाळा उद्ध्वस्त होते. कथानकाचा हाच आकृतिबंध इतरही बहुतेक कादंबऱ्यांमध्ये थोड्याफार फरकाने दिसतो. परंतु प्रत्येक वेळी जी समस्या केंद्रस्थानी असते, तिचे बारीकसारीक तपशील व ज्ञान मायकेल क्रायटन कथानकात चपखलपणे गुंतवतो- त्यात त्याचे जे कौशल्य दिसते ते चक्रावून सोडते. त्या त्या धोक्याची जाणीव प्रखरपणे व्हावी अशा रीतीने तो कथानकाला पुढे रेटत राहतो. कथानकाची रंगत वाढवणारी आणि चिंतनाला प्रवृत्त करणारी अनपेक्षित वळणे, यात क्रायटनचा हातखंडा आहे. त्याचे कथाकथनातले कौशल्य हे असामान्य आहे. अत्यंत मोजक्या कालावधीत त्याच्या कथानकातील घटना जलदगतीने एका पाठोपाठ एक घडतात. त्यामुळे वाचकाला मध्ये क्षणाचीही उसंत मिळत नाही. खुर्चीला तो खिळून राहतो.

संशोधक वा संस्थाचालक यांना तो बहुतांशी स्वार्थी, संधिसाधू, धूर्त, आपमतलबी दाखवतो आणि संभाव्य धोक्याची वा आपत्तीची अंधूक जाणीव झालेला नायक हा साधा सरळ सामान्य माणूस असतो. पण एकूण त्या घटनांच्या चक्रव्यूहात अडकल्यावर तो स्वत:च अक्कलहुशारीने आणि उपजत शहाणपणाने त्या समस्येला थेट भिडतो; सामर्थ्यवान प्रतिस्पर्धी असूनही आपला मार्ग काढत राहतो. मानवजातीचा संहार टाळण्यासाठी जणू वामनच अवतार घेतो. स्वत:चीच प्रतिमा तो या नायकावर स्थापित करतो.

नॅनो टेक्नोलॉजीचा वापर त्याने 'प्रे'मध्ये केला आहे. जेनेटिक्सचा वापर 'नेक्स्ट'मध्ये केला आहे. 'डिसक्लोझर'मध्ये लैंगिक छळवणूक हा विषय हाताळला आहे. 'टाइमलाइन'मध्ये एका काळातून दुसऱ्या काळात जाण्याची, टाइम ट्रॅव्हलची कल्पना वापरली आहे... या प्रत्येक क्षेत्रातले त्याचे ज्ञान अद्ययावतच नव्हे, तर दूरदर्शी आहे. भविष्यकालीन समस्यांची आणि प्रभावाची त्याला जी जाण आहे, ती इतर संशोधकांना तेवढ्या तीव्रतेने कधीच जाणवलेली नसेल.

मायकेल क्रायटनच्या उर्वरित कादंबऱ्यांचेही मराठी अनुवाद लौकर यावेत असा प्रयत्न आहे. त्यामुळे मराठी वाचकांच्या विज्ञानविषयक जाणिवा समृद्ध होऊ शकतील.




## प्रिय वाचकमित्रहो........

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन आठवड्याचे सातही दिवस नियमित सुरु राहील.

वेळ -सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०

रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**



# साहित्यवार्ता

*** राजधानीत संत तुकाराम जन्मचतु:शताब्दी कार्यक्रम**

सुमारे चार शतकांपूर्वी संत नामदेवांनी भागवतधर्माची पताका उत्तर भारतात नेली होती. त्यानंतर पुन्हा एकदा विष्णुदासांच्या मांदियाळीने देशाच्या राजधानीत संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकोबारायांचा जन्मचतु:शताब्दी सोहळा आयोजित केला.

वारकरी संमेलनाचे स्वागताध्यक्ष केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते आणि कार्याध्यक्ष अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत सोहळ्याचे उद्घाटन झाले.

वारकरी महामंडळाचे सचिव विठ्ठल महाराज चौधरी, बंडातात्या कराडकर, सदानंद महाराज तुंगारेश्वर, प्रकाश महाराज जवंजाळ, रामेश्वर महाराज शास्त्री आदींसह वारकरी संप्रदायातील मान्यवर या वेळी उपस्थित होते. भव्य व्यासपीठावर उभारलेली संत तुकारामांची सहा फूट उंचीची मूर्ती दूरवरूनही नजरेत भरत होती. कोणत्याही बंदोबस्ताशिवाय स्वयंशिस्तीने एकत्र आलेले हजारो वारकरी एकसुरात तुकारामांच्या गाथेचे पारायण करीत होते. आळंदीहून आलेली वारकऱ्यांच्या वेशभूषेतील मुले लक्ष वेधून घेत होती.

हरिनाम जप, संतांचा जयघोष, तुकारामांच्या गाथेचे भक्तिरसाने ओथंबलेल्या आवजातील पारायण यामुळे राजधानीतील वातावरण भारून गेले होते.

दिल्लीतील छत्तरपूर भागात आद्य कात्यायनी मंदिराच्या प्रांगणात, ४५ हजार चौ. फूट क्षेत्रावर उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात, २१ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज जन्मचतु:शताब्दी सोहळ्याचे दैनंदिन स्वरूप ब्रह्ममुहूर्तावरील काकड

आरती, विष्णुसहस्रनामाचे पठण, गाथेचे पारायण, प्रवचन, हरिपाठ आणि कीर्तन असे होते. इतर भाषक बांधवांनी वारकऱ्यांना भेटून या सोहळ्याची माहिती करून घेतली.

तारीख २१ रोजी रामकृष्ण महाराज लहवीतकर यांचे कीर्तन झाले. खासदार शिवाजीराव पाटील यांनी गाथेचे श्रवण केले. दि. २२ रोजी आचार्य किशोरजी व्यास यांचे हिंदीतून प्रवचन झाले. संत तुकारामांची भगवद्भक्ती, त्यांच्या विचारांचा प्रभाव याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळी बद्रिनाथ महाराज तनपुरे यांचे कीर्तन झाले. सोलापूर जिल्ह्याच्या बार्शी तालुक्यातील संत बावी येथील बालकांनी सादर केलेला संगीतमय हरिपाठ आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यासह सोहळा समितीचे रामेश्वर महाराज शास्त्री, जालिंदर काळोखे, डी. एल. छाजेड, गंगाराम महाराज दुबे, प्रभाकर फुलसुंदर, प्रकाश महाराज जवंजाळ, विठ्ठल महाराज चौधरी आदी पदाधिकारी सोहळा यशस्वितेसाठी प्रयत्नशील होते. राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या उपस्थितीत २४ ऑक्टोबर रोजी सोहळ्याचा समारोप झाला.

*** सी-डॅक 'नॉलेज शेअरिंग फॉर रुरल डेव्हलपमेंट'**

''ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी नवे तंत्रज्ञान आणि नव्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोचवण्याची गरज आहे,'' असे प्रतिपादन वनराईचे अध्यक्ष डॉ. मोहन धारिया यांनी व्यक्त केले.

'भारताच्या विकासाचे प्रवेशद्वार' या बहुभाषिक पोर्टलच्या मराठी विभागासाठी सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कम्प्युटिंग (सीडॅक)च्या वतीने माहिती शिक्षांगण फाउंडेशनची निवड करण्यात आली आहे. सीडॅक व शिक्षांगण फाउंडेशनतर्फे आयोजित 'नॉलेज शेअरिंग फॉर रुरल डेव्हलपमेंट : इंडियन डेव्हलपमेंट गेटवे' या कार्यशाळेचे तसेच बहुभाषिक पोर्टलच्या मराठी विभागाचे उद्घाटन धारिया यांच्या हस्ते झाले. नॅशनल वॉटर ॲकॅडमीचे मुख्य अभियंता चेतन पंडित, शिक्षांगण फाउंडेशनचे संचालक विजय गुप्ता, व्यवस्थापकीय विश्वस्त देविका नाडिग, सीडॅकचे कार्यक्रम व्यवस्थापक जगदीश बाबू, विवेक भांडारकर उपस्थित होते.

धारिया म्हणाले, ''देशात केवळ विकासाचा दर वाढल्याने समस्या सुटणार नाही. त्यासाठी विकासाची निश्चित दिशा ठरवावी लागेल.

पाणी, खनिजे, सूर्यप्रकाश, समुद्रकिनारे, जनावरे, वनस्पती वैविध्य या नैसर्गिक साधनसंपत्तीचा सुनियोजित वापर करण्याची गरज आहे. कुटुंबनियोजन, जीवन पद्धतीत बदल, उच्च राहणीमान व विचार हे विकासाला पोषक ठरणारे घटक आहेत, मात्र ग्रामीण भागात ते रुजविण्यासाठी तेथील नागरिकांना नव्या तंत्रज्ञानाशी जोडणे आवश्यक आहे.''

पोर्टलची माहिती देताना जगदीशबाबू म्हणाले, ''बहुभाषिक पोर्टलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोचता येणे व त्यांच्या समस्या सोडविणे सोपे होणार आहे. कृषी, आरोग्य, ई-शासन, प्राथमिक शिक्षण, ग्रामीण ऊर्जा या पाच घटकांबाबतची ताजी माहिती या पोर्टलवर मराठीतही उपलब्ध असणार आहे.''

या पोर्टलद्वारे तज्ज्ञांशी चर्चा करता येईल. शेतकरी दैनंदिन बाजारपेठेची माहिती घेऊ शकतील. आरोग्याच्या समस्या व उपलब्ध सेवा, शैक्षणिक योजना याची अद्ययावत माहिती पोर्टलवर उपलब्ध असल्याने नागरिकांना त्याचा फायदा होईल.''

*** डिसेंबरमध्ये डेहराडूनला बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन**

बृहन्महाराष्ट्र मंडळ (मध्यवर्ती संघटना) नवी दिल्ली यांचे वार्षिक अधिवेशन २७ आणि २८ डिसेंबर रोजी उत्तराखंडची राजधानी डेहराडून येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या अधिवेशनाच्या आयोजनाची जबाबदारी डेहराडून येथील महाराष्ट्र समाज कल्याण समितीने उचलली आहे. त्यांना या कामासाठी हरिद्वार, मसुरी आणि हृषिकेश येथील महाराष्ट्र समाजाचे सहकार्य मिळणार आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळ ही संस्था महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषिकांचे राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करते. तिची स्थापना साहित्यसम्राट न. चिं. केळकर आणि ज्येष्ठ संपादक ज. स. करंदीकर यांनी १९२६ मध्ये केली. महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, संस्कृती, परंपरा यांचे जतन, संवर्धन करण्यासाठी ही संस्था झटते. गेली साठ वर्षे ही संस्था देशातील मोठ्या शहरांमध्ये भव्य प्रमाणावर अधिवेशनांचे आयोजन करते. मराठी भाषकांच्या प्रश्नांवर चर्चा, परिसंवाद, भाषणे, मुलाखती यासारखे कार्यक्रम सातत्याने त्यातून आयोजित केले जातात.

याशिवाय सांस्कृतिक, क्रीडा, शिक्षण व अन्य क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या बृहन्महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा आणि व्यक्तींचा पारितोषिके देऊन सन्मान केला जातो. वार्षिक अधिवेशनातील सहभागासाठी संपर्क : बळवंत गोखले - ०९९२६७०४१३५, ०७५५-४२८४०२७.

*** आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र, वडघर**

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, मुंबई यांच्या तर्फे साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, ता. माणगाव, जिल्हा रायगड येथे आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. अनुवादकांना अनुवाद करण्यासाठी लागणाऱ्या सोयी येथे उपलब्ध करून दिल्या जात आहेत. अनुवादाच्या संदर्भात ज्यांच्याकडे विविध भाषांतील कोशवाङ्मय आणि अनुवादित पुस्तके तसेच ज्यांचा अनुवाद झाला आहे अशी मूळ पुस्तके असतील अशी पुस्तके या संस्थेस भेट द्यावीत, तसेच १९७०

च्या सुमारास युसिस तर्फे अमेरिकन बऱ्याच पुस्तकांचा मराठी अनुवाद प्रसिद्ध करण्यात आला होता. ती पुस्तके कुणाकडे असल्यास या संस्थेला भेट द्यावीत. अभ्यासकांना त्यांचा उपयोग होऊ शकेल.

संपर्क : साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, महापालिका मराठी शाळा क्र.२, खोली क्र. १७, पहिला माळा, पोतुगीज चर्चजवळ, गोखले रोड (द.), दादर (प.), मुंबई - २८, दूरध्वनी (०२२) २४३०७९१७

ई मेल : antarbharati_ask@yahoo.com

संकेत स्थळ : www.aantarbharati.org

*** प्रदर्शनात ग्रंथ 'एकावर एक फ्री'**

ग्राहककेंद्री बाजारपेठेत रुळलेली 'एकावर एक फ्री' योजना 'अक्षरधारा' आयोजित ग्रंथप्रदर्शनातही सुरू झाली आहे. या योजनेतून अनेक मान्यवर लेखकांच्या पुस्तकांची भेट वाचकांना देण्यात आली.

'अक्षरधारा'ने प्रथमच 'बाय वन गेट वन' ही धाडसी योजना सुरू केली आहे.

'एकावर एक फ्री' या योजनेत वि. स. खांडेकर, चिं. वि. जोशी, बाबासाहेब पुरंदरे, आचार्य अत्रे, द. मा. मिरासदार, पु. ल. देशपांडे, अरुण साधू, अरुण टिकेकर, व. पु. काळे, आनंद यादव, मारुती चितमपल्ली, रणजित देसाई, व्यकंटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे, शांता शेळके, विजय तेंडुलकर, प्रभाकर पणशीकर, विठ्ठल कामत, विश्वास पाटील, सदानंद मोरे, शिवाजी सावंत, दिलीप प्रभावळकर अशा अनेक मान्यवर लेखकांच्या लोकप्रिय पुस्तकांचा समावेश होता.

मराठीतील ललित आणि वैचारिक ११२ पुस्तकांचा या योजनेत समावेश होता. ही भेट योजना २३ नोव्हेंबरपर्यंत आचार्य अत्रे सभागृहातील ग्रंथोत्सवात सुरू होती. यासाठी मांडके हिअरिंग सर्व्हिसेसचे सहकार्य मिळाले होते.

या योजनेतील काही पुस्तके पुढीलप्रमाणे : (कंसात मोफत पुस्तकाचे नाव) ययाती (एक होता कार्व्हर), मी कसा झालो (मराठी माणसे मराठी मने), मिरासदारी (भुताचा जन्म), एका कोळियाने (बटाट्याची चाळ), मृत्युंजय (अशी मने असे नमुने), तुंबाडचे खोत (हाक आभाळाची), ड्रॅगन जागा झाल्यावर (फिडेल, चे आणि क्रांती), नर्मदे हर हर (स्वामी विवेकानंद चरित्र), चकवाचांदण (केशराचा पाऊस), श्रीमानयोगी (पावनखिंड), किमयागार (मजेत कसं जगावं), चित्र आणि चरित्रे (माणदेशी माणसे), तुळजाभवानी (लज्जागौरी), राजा शिवछत्रपती (पावनखिंड).

*** ल. ग. देशपांडे यांची जन्मशताब्दी**

गोपाळ हायस्कूलच्या स्थापनेसाठी आणि विकासासाठी आयुष्य खर्ची घातलेल्या गुरुवर्य ल. ग. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षाला २१ ऑक्टोबर रोजी प्रारंभ झाला.

शिक्षक आमदार भगवान साळुंके, संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब जोशी, सचिव विठ्ठलराव कुलकर्णी, वि. व्यं. भिलवडकर, नगरसेवक दीपक मानकर या वेळी उपस्थित होते. विश्वनाथ मुंगळे महाराज अध्यक्षस्थानी होते. डॉ. गावे म्हणाले, ''आज मोठ्या संख्येने इंग्रजी शाळा वाढत आहेत. मात्र, ज्या काळात मराठी शाळांची गरज होती त्या काळात देशपांडे यांनी सर्वसामान्यांच्या मुलांसाठी शाळा सुरू केली. इमारतीसाठी पैसा उभा केला, तारांगण सुरू करून मुलांना अभ्यासाचे नवे दालन निर्माण केले.'' आमदार भगवान साळुंके म्हणाले, ''उच्च शिक्षणासाठी मोठ्या देणग्या घेतल्या जात आहेत, ही आजच्या शिक्षण व्यवस्थेतील वास्तवता आहे.''

*** बालसाहित्याची विद्यापीठाकडून उपेक्षा होते**

''बालवाङ्मयाच्या क्षेत्रात विपुल लेखन झाले असूनही विद्यापीठ पातळीवर त्याचा अभ्यास होत नाही,'' अशी खंत पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. मनोहर जाधव यांनी व्यक्त केली. नव्या पिढीच्या अभ्यासकांनी बालवाङ्मयाचे संशोधन करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'स्नेहवर्धन प्रकाशन'तर्फे डॉ. दिलीप गरुडलिखित 'डॉ. न. म. जोशी : व्यक्ती आणि वाङ्मय' या पुस्तकाचे प्रकाशन राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते झाले.

डॉ. जाधव म्हणाले, ''मराठी साहित्यातील लेखकांवर किंवा त्यांच्या वाङ्मयावर अभ्यास होतो तेव्हा काही विशिष्ट लेखकांचाच विचार होतो. अशा अभ्यासाची गृहीतके व पूर्वग्रह बाजूला ठेवून बालसाहित्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.''

*** 'ऑनलाइन' दिवाळी अंक**

महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव असलेल्या दिवाळी अंकांची शताब्दी साजरी होत असताना या वर्षी 'मनोगत डॉट कॉम', 'उपक्रम डॉट ओआरजी', 'मायबोली डॉट कॉम', 'रेषेवरची अक्षरे' आणि 'सुरेश भट डॉट इन' असे पाच दिवाळी अंक प्रकाशित झाले आहेत.

महेश वेलणकर हे 'मनोगत डॉट कॉम'चे प्रवर्तक असून चित्तरंजन भट, संजीव कुलकर्णी, सोनाली जोशी, वरदा वैद्य, मृदुला गोरे हे अंकाच्या संपादकीय समितीचे सदस्य आहेत. कथा, कविता, अनुभव यांसह 'मराठी भाषा' या विषयावर लेख आणि मुलाखत यांचा अंकामध्ये समावेश आहे.

'मायबोली डॉट कॉम'च्या अंकात ललित लेखन, प्रवासवर्णन, चारोळ्या, कविता अशा विविध साहित्यप्रकारांचा समावेश आहे. विविध लोकांच्या 'ब्लॉग'चील वर्षभरातील निवडक लेखांचा समावेश 'रेषेवरची अक्षरे' या दिवाळी अंकात आहे. गझलविषयक विविध विषय हाताळणारा 'सुरेश भट डॉट इन' या संकेतस्थळाचा पहिला दिवाळी अंक चित्तरंजन भट यांनी काढला आहे.

*** पुस्तकाविना घर म्हणजे आत्म्याविना शरीर**

'साहित्य हे आनंददायी, जीवनाशी सुसंवादी, कलात्मक असायला हवे. ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला हवे. आजच्या युगात पुस्तकांसाठी माध्यमांचा वापर करून घ्यायला हवा. पुस्तकाविना घर म्हणजे आत्म्याविना शरीर होय,' असे विचार डॉ. लीला दीक्षित यांनी भारतीय विचार साधना पुणे आयोजित वाचक सन्मान पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी मांडले. या पुस्तक प्रदर्शनामध्ये खेळ, आयुर्वेद, मनोरंजन, कथा, कादंबरी, विज्ञान, योग इ. अनेक विषयांवरील शेकडो पुस्तके ठेवण्यात आली होती.

*** वाचन संस्कृतीला पुष्टी देणारा 'बांधवी' कट्टा**

या कट्ट्यावरील महिलांची संख्या पन्नासच्या पुढे गेली आहे. जया काळे यांनी भांडारकर रस्त्यावर त्यासाठी खास हॉल उपलब्ध करून दिला आहे. या कट्ट्याला अध्यक्ष नाही आणि पदाधिकारी नाहीत, सगळे सारखे!

वाचनवेड्या महिलांचा बांधवी हा कट्टा बारा वर्षे सुरू आहे. वाचलेल्या पुस्तकांविषयी चर्चा करण्यासाठी इथे महिला एकत्र येतात. कोणतेही पुस्तक वाचल्यानंतर त्याविषयीची मते कोणाला तरी सांगावीशी वाटतात. अशाच हेतूने आशा कर्दळे आणि त्यांच्या मैत्रिणी बारा वर्षांपासून दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी पाच ते सात या वेळेत वाचलेल्या पुस्तकांविषयी चर्चा करण्यासाठी भेटत आहेत.

याबद्दल कट्ट्याच्या सभासद शैलजा देवस्थळी म्हणाल्या, ''बौद्धिक मेजवानीचा मनसोक्त आस्वाद येथे घेता येतो. साहित्यातील वेगवेगळे पैलू इथे उलगडले जातात. विविध विषयांवरील पुस्तकांबद्दल 'बांधवी'मध्ये चर्चा केली जाते. इथे येणाऱ्या प्रत्येकीचं शिक्षण, कौटुंबिक वातावरण, साहित्यिक शैक्षणिक वारसा- सगळेच वेगळे आहे; पण या कशाचाही अडसर येत नाही.

*** स्त्री अभ्यास केंद्राला ८२ लाखांचे अनुदान**

पुणे विद्यापीठातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्राला रतन टाटा ट्रस्टच्या वतीने तब्बल ८२ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. मराठीमधून पाठ्यपुस्तके व संदर्भसाहित्याची निर्मिती करण्याचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्र हे केवळ अध्यापन-अध्ययनापुरतेच मर्यादित राहिले नसून, स्त्री चळवळीचे प्रेरणास्थान ठरले आहे. १९८७ साली सुरू झालेल्या या केंद्रात १९९४ साली पहिला अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. तब्बल २० वर्षांनी या केंद्राचा 'वनवास' संपुष्टात आला नि २००५-०६ या वर्षामध्ये केंद्राला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मान्यता मिळाली. त्याचप्रमाणे राज्य शासन आणि

पुणे विद्यापीठानेही केंद्राच्या विस्तारासाठी विविध योजना आखण्यास मंजुरी दिली. सध्या केंद्रात एक रीडर व एक लेक्चरर ही पदे मंजूर आहेत.

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, जादवपूर विद्यापीठ या ठिकाणी महिला अभ्यास या क्षेत्रामध्ये एम. ए. एम. फिल अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मुंबईतील एसएनडीटी, टाटा समाजविज्ञान केंद्र या ठिकाणी प्रमाणपत्र अभ्यासक्रम, शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये एम.फिल. स्तरावरील एक विषय एवढीच महिला अभ्यासाची सध्या व्याप्ती आहे.

स्त्री अभ्यास केंद्राला टाटा ट्रस्टच्या वतीने मिळालेले हे अनुदान 'रिसर्च ॲण्ड टीचिंग कपॅसिटी बिल्डिंग' यासाठी वापरण्यात येणार आहे. नवीन अभ्यासक्रमांमध्ये एम.ए., पूर्णवेळ पदविका आदींचा समावेश आहे. मराठीमधून पाठ्यक्रम व संदर्भसाहित्याची निर्मिती करण्याचे मोठे आव्हान आहे. भाषांतरित साहित्य आणि संदर्भसूची यांची प्राधान्यक्रमाने निर्मिती करण्यात येणार आहे.

डॉ. विद्युत भागवत यांच्या निवृत्तीनंतर डॉ. शर्मिला रेगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## * चांद्रयानाचे यशस्वी उड्डाण

भारताने यशस्वीरीत्या अवकाशात सोडलेल्या चांद्रयानाबद्दल 'इस्रो'च्या सर्व शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिकांचे अभिनंदन करायला हवे. आता देशातील मानवाचे पाऊल त्यावर पडावे, या दृष्टीने प्रयत्न होण्याची गरज आहे अशी भावना ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि 'इस्रो'चे माजी संचालक डॉ. वसंतराव गोवारीकर यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे भारताची क्षमता काय आहे आणि देशात कार्यरत असलेल्या शास्त्रज्ञ वैज्ञानिकांचे नैपुण्यदेखील यामुळे जगासमोर आले आहे, असे गौरवोद्‍गार त्यांनी काढले.

भारतीय अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात डॉ. गोवारीकर अगदी सुरुवातीपासून कार्यरत होते. डॉ. विक्रम साराभाई आणि सतीश धवन यांच्या खांद्याला खांदा लावून अवकाश संशोधन क्षेत्रात सुरू केलेले काम चांद्रयानामुळे बहरलेले पाहण्याचे समाधान त्यांना लाभले. अवकाश संशोधन क्षेत्राला सरकारचा सुरवातीपासून पाठिंबा आहे. डॉ. गोवारीकर म्हणाले, ''भारताचा अंतराळवीर चंद्रावर उतरवण्याच्या पायाभूत सुविधांसाठी निधी देताना सरकारने हात आखडता घेऊ नये.''

## * 'माहिती'चा चित्ररथ राज्यभर फिरविणार

माहितीच्या अधिकाराचा कायदा होऊन पाच वर्षे झाल्यानंतरही सरकारने त्याचा पाहिजे तसा प्रचार व प्रसार केलेला नाही. भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन समितीतर्फे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात माहिती अधिकाराची सचित्र माहिती देणारा चित्ररथ फिरविण्यात येणार आहे असे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सांगितले.

माहिती अधिकार कायदा हे भ्रष्टाचार नष्ट करण्याचे प्रभावी हत्यार आहे. हे सांगून कायद्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दोन वर्षांचे नियोजन केले जाणार आहे. त्यासाठी ओमनीसारख्या छोट्या गाड्यांना डिजिटल प्लेक्स बोर्ड लावून त्या गाडीतून या कायद्यांची माहिती असलेली पुस्तके, सी.डी., व्हीसीडीचे यांचे वितरण आणि चित्ररथाद्वारे प्रचार, प्रसार करण्यात येणार आहे.

या कामासाठी तीन मोटारगाड्या विकत घेण्यात आल्या असून, तीन गाड्या देणग्या म्हणून मिळाल्या आहेत. अजून चार गाड्या हव्या आहेत. त्यांचे चित्ररथात रूपांतर करण्यासाठी प्रत्येकी दीड ते पावणेदोन लाख रुपये खर्च येणार आहे. पारदर्शक प्रशासन हवे व भ्रष्टाचारमुक्ती व्हावी, असे वाटणाऱ्या नागरिकांनी जनआंदोलन समितीला मदत करावी, असे आवाहन हजारे यांनी केले.

## * 'बाईमाणूस'ने जगायला शिकविले

आत्मविश्वास गमावलेली स्त्री आदिवासींच्या अनुभवातून जीवनात पुन्हा उभी राहते हे 'बाईमाणूस'चे सूत्र आहे. या चित्रपटाने आम्हाला जगायला शिकविले, असे मत प्रसिद्ध अभिनेते आणि 'बाईमाणूस'चे दिग्दर्शक अरुण नलावडे यांनी व्यक्त केले.

आशियाई चित्रपट महोत्सवात क्रांती कानडे दिग्दर्शित 'महक' आणि नलावडे दिग्दर्शित 'बाईमाणूस' हे चित्रपट दाखविण्यात आले. या निमित्ताने दोघांनीही पत्रकारांशी संवाद साधला. नलावडे म्हणाले, ''कविता महाजन यांच्या 'ब्र' या कादंबरीवर उत्कृष्ट चित्रपट होऊ शकेल याची खात्री होती. एक वर्ष यावर काम केल्यावर निर्माते मिळाले म्हणून ही कलाकृती प्रेक्षकांसमोर येऊ शकली. याची पटकथा महाजन याच लिहिणार होत्या. मात्र, कादंबरी ते चित्रपट हे माध्यम परिवर्तन बहुधा त्यांच्या ध्यानात आले नसावे. अखेर अशोक राणे यांना पटकथेचे लेखन करण्यास सांगितले. नंदुरबारसारख्या आदिवासी भागात २७ दिवस चित्रीकरण करण्यात आले. 'लाइट' लागले तेव्हा आदिवासींच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद झळकत होता.''

अशोक राणे म्हणाले, ''कादंबरीवरून चित्रपट होतो म्हणजे काय हे लेखकांनी समजून घेतले पाहिजे. म्हणजे अकारण वादविवाद होणार नाहीत. कोणत्याही साहित्यकृतीवरील चित्रपट १०० टक्के त्या कलाकृतीला न्याय देऊ शकत नाही.''

या चित्रपटातील भूमिकेने आनंद मिळाल्याचे शिल्पा नवलकर यांनी सांगितले. 'महक'चे चित्रीकरण पुण्यातच झाल्याचे कानडे यांनी सांगितले. मुलांनी स्वयंस्फूर्तीने उत्तम सहकार्य दिल्यामुळे चित्रपट उत्तम होऊ शकला. २४ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात हा चित्रपट दाखविण्यात आला. त्यापैकी १९ ठिकाणी त्याला पारितोषिके मिळाली, अशी माहिती त्यांनी दिली.

## * 'मायमराठी शब्दोत्सव' : ३०० वे ग्रंथप्रदर्शन

नवे मूलभूत शिकण्याची प्रक्रिया वयाच्या १८ वर्षापर्यंतच असते. त्यानंतर जीवनात विविध मानाची पदे भूषविली असली तरी नवीन काही शिकलो असे मला वाटत नाही. म्हणून 'मी असा घडलो'च्या लेखनामध्ये मी १८व्या वर्षापर्यंत थांबलो आहे, असे केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी दि. २३ ऑक्टोबर रोजी 'अक्षरधारा'च्या 'माय मराठी शब्दोत्सव' या ३०० व्या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करताना म्हटले. प्रा. द. मा. मिरासदार अध्यक्षस्थानी होते. डॉ. सदानंद मोरे, सुजाता देशमुख, 'मांडके हिअरिंग सर्व्हिसेस'च्या डॉ. कल्याणी मांडके आणि 'अक्षरधारा'चे रमेश राठिवडेकर या वेळी उपस्थित होते. सुधीर गाडगीळ यांनी मुणगेकर यांची मुलाखत घेतली. मिरासदार यांनी 'गणिताचा तास' आणि 'भानाचं भूत' या कथा सादर केल्या.

मुणगेकर म्हणाले, ''साहित्यिक, कलावंत, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ यांच्यामुळे समाज सातत्याने पुढे जात असतो. माझे वडील, शिक्षक आणि मराठी साहित्य यामुळे मी घडलो. अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही-समाजवाद आणि मानवतावाद या पाच गोष्टींना मी जगण्याचा मूलाधार मानतो. हिंसा असलेल्या आंदोलनांचा मी जाहीर निषेध करतो. घरातील महिलेने उशिरा जेवावे हे मला मान्य नाही.'' प्रार्थनास्थळापेक्षा लोकांना अन्न उपलब्ध करून देणारा आठवडे बाजार आणि ताजमहालपेक्षाही मोफत वैद्यकीय सुविधा देणारे ससून रुग्णालय मला सुंदर वाटते. फडके-खांडेकर वाद निरर्थक होता, असे माझे प्रामाणिक मत आहे. राष्ट्रीय उत्पन्न वाढले म्हणजे देश महासत्ता होईल हा भ्रम आहे. लोकांच्या गरजा किती पूर्ण होतात यावर ते अवलंबून आहे.

सर्वसामान्य माणसांच्या हिताचे महत्त्वाचे निर्णय राजकीय प्रक्रियेत होतात. त्यामुळे राजकारण हे पवित्र मानतो. राजकारणात प्रत्यक्ष सहभागी होणे अपरिहार्य असेल आणि माझ्या जीवनधारणेशी विसंगत नसेल, तर अवश्य प्रवेश करेन.''

मिरासदार म्हणाले, ''मनाची मशागत करण्याचे आणि सुसंस्कृत करण्याचे काम वाचनातून आणि ग्रंथप्रदर्शनांच्या माध्यमातून होते.''

## * दिवाळीनिमित्त पुणे परिसरात शंभराहून अधिक मैफली

दिवाळीच्या चार दिवसांत विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून 'दिवाळी पहाट' साजरी करण्याची कल्पना पुणेकरांनी मन:पूर्वक स्वीकारल्यामुळे 'दिवाळी पहाट'चे आयोजक, कलाकार, वादक, ध्वनिव्यवस्था पुरवणारे, सजावटकार, पुष्पविक्रेते, आकाशकंदिल बनवणारे अशा अनेक घटकांमध्ये होणारी आर्थिक उलाढाल कोटींच्या घरात पोचली आहे. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील

अनेक ठिकाणी होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी आता सव्वाशेच्या आकडा पार केला आहे.

पुणे शहरातील बालगंधर्व रंगमंदिर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, गणेश कला-क्रीडा केंद्र, भरत नाट्य मंदिर, शनिवारवाडा, सारसबाग, पर्वती, विविध उद्याने, सभागृहे आणि सोसायट्यांमधून दिवाळीचे चारही दिवस गायन, वादन, मुलाखती असे सांस्कृतिक कार्यक्रम झाले. किशोरी अमोणकर, प. जसराज, पं. शिवकुमार शर्मा, पं. हरिप्रसाद चौरसिया, उस्ताद अमजद अली खाँ, उस्ताद रशीद खाँ, पं. राजन साजन मिश्रा, पं. उल्हास कशाळकर, उस्ताद झाकीर हुसेन, मालिनी राजूरकर, आरती अंकलीकर, अश्विनी भिडे-देशपांडे, संजीव अभ्यंकर... अशा अनेक मान्यवर कलाकारांचा 'दिवाळी पहाट'मध्ये सहभाग असतो.

पुण्यात हा उपक्रम गेली १६ वर्षे 'त्रिदल' चे डॉ. सतीश देसाई चालवत आहेत. हा संकल्पना केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर विदेशातही लोकप्रिय ठरत आहे. यंदा लंडनमध्ये मस्कत आणि दुबईमध्ये 'त्रिदल दिवाळी पहाट' घेण्यात आली.

*** आनंदी राहण्यासाठी इतरांना आनंद द्या**

''आनंद ही मनाची अवस्था असते. श्रीमंती किंवा गरिबीवर आनंद अवलंबून नसतो. जीवनात खरा आनंद मिळवायचा असल्यास इतरांना तो द्यायला शिका. दुसऱ्यांना आंनद दिल्याने आनंदाचा गुणाकार होऊन तो चिरकाल टिकतो.'' असे विचार व्यवस्थापनतज्ज्ञ प्र. चिं. शेजवलकर यांनी व्यक्त केले.

डॉ. गोखले स्मृतिदिनानिमित्त ३० ऑक्टोबर रोजी 'फॅमिली डॉक्टर'वर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. ''आनंदी राहण्याचा मंत्र-तंत्र असू शकत नाही. आनंदी राहण्यासाठी आपण स्वत:ला ओळखणे गरजेचे असते. स्वत:मधील दुर्बलता, गुण, सुप्तशक्ती या सगळ्यांची ओळख जेव्हा होते तेव्हा त्याचा प्रत्यक्षात उपयोग करून आनंदी जीवन जगता येते. इतर अनेक प्रदूषणांपेक्षा मनाचं प्रदूषण हे सर्वात भीषण प्रदूषण आहे. या प्रदूषणापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी आध्यात्मिक जीवनाचा स्वीकार करावा. यातून सगळे प्रश्न जरी सुटले नाहीत तरी स्वत:च्या आयुष्याचा शोध घेण्याची वाटचाल नक्कीच सुरू होते. मुख्य म्हणजे जे जीवन वाट्याला आलं आहे, त्याचा हसतमुखाने स्वीकार करा.'' असा आनंदी जीवनाचा कानमंत्र त्यांनी उपस्थितांना दिला.

फॅमिली डॉक्टर या विषयावर बोलताना डॉ. महेश तुळपुळे म्हणाले, ''फॅमिली डॉक्टरला रुग्णाच्या केवळ आजाराचीच नाही तर त्याची संपूर्ण कौटुंबिक, आर्थिक माहिती असते. ते तातडीच्या वेळी रुग्णासाठी उपलब्ध होऊ शकतात. फॅमिली डॉक्टर हा रुग्णाच्या आजाराबरोबरच त्याच्या मनावरही फुंकर घालतो, त्यामुळे त्याची आवश्यकता असतेच.''

रुग्णाच्या भूमिकेतून बोलताना डॉ. राजा दीक्षित यांनी 'व्यक्तिसापेक्ष' वागणाऱ्या फॅमिली डॉक्टरांची आज नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले.

*** 'प्रिय आत्मन् : ओशो स्मृतिगंध' पुस्तकाचे प्रकाशन**

ओशोंच्या निवडक प्रवचनांचा सारांश आणि आठवणींवर आधारित पी. सी. बागमार ऊर्फ स्वामी सत्यनिरंजन लिखित 'प्रिय आत्मन् : ओशो स्मृतिगंध' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांच्या हस्ते झाले. उत्कर्ष प्रकाशन तर्फे आयोजित या कार्यक्रमास महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पी. ए. इनामदार, माजी आमदार शांताबाई कोटेचा, डॉ. मनोज भाटवडेकर, स्वाती चांदोरकर आणि प्रकाशक सु. वा. जोशी उपस्थित होते. देव म्हणाले, ''हे पुस्तक वाचताना ओशो आपल्यासमोर आहेत आणि आपल्याला उद्देशून ध्यान करा असे सांगत आहेत, असे वाटते. ओशो या करुणासागर लोकोत्तर व्यक्तीचे बहुआयामी रंग या जीवनचरित्रात चितारले आहेत.''

स्वामी सत्य निरंजन म्हणाले, ''आशोंचे प्रवचन आणि ध्यान शिबिरामुळे लाभलेला सहवास आणि आठवणी खोलवर रुजलेल्या आहेत. त्यांच्या विचारांचा सुगंध पुढील पिढीपर्यंत पोचवावा हाच लेखनामागचा उद्देश आहे.''

*** 'शत जन्म शोधिताना' चे प्रकाशन**

''संगीत रंगभूमीच्या इतिहासाची पाने अधोरेखित करणारे 'शत जन्म शोधिताना' हे पुस्तक म्हणजे मा. दीनानाथांचे जीवनचरित्र नाही, तर रंगभूमीवरील त्यांच्या पराक्रमाची गाथा आहे,'' असे मत ज्येष्ठ अभिनेते प्रभाकर पणशीकर यांनी व्यक्त केले.

'श्रीविद्या प्रकाशन'तर्फे (कै.) गो. रा. जोशी लिखित 'शत जन्म शोधिताना' या पुस्तकाचे प्रकाशन पणशीकर यांच्या हस्ते झाले. 'ललित कलादर्श'चे भालचंद्र पेंढारकर, प्रा. प्रसन्नकुमार अकलूजकर आणि उपेंद्र कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.

पणशीकर म्हणाले, ''एक नाट्यवेडा माणूस म्हणून जोशी यांच्याशी माझा परिचय होता. मराठी रंगभूमी पहिल्यापासून सुदैवी आहे, की लेखन करणारी विद्वान माणसे रंगभूमीच्या आसपास होती. गंधर्व नाटक कंपनी आणि बालगंधर्व यांच्या तुलनेत दीनानाथ यांच्याविषयी फारसे लेखन झाले नाही. करमणुकीपेक्षाही प्रबोधन आणि स्वातंत्र्यलढ्यास उद्युक्त करणारी नाटके त्यांनी रंगभूमीवर केली.''

अकलूजकर म्हणाले, ''संगीत रंगभूमीच्या स्मरणरंजनामध्ये रमणाऱ्या जोशी यांची वृत्ती आभ्यसाची होती. दीनानाथ यांचे कर्तृत्व समजून घेण्यासाठी हे पुस्तक महत्त्वाचे आहे.''

*** जेथे मराठी समाज तेथे साहित्य संमेलने भरवा**

''समाजाला साहित्याभिमुख करण्यासाठी संमेलने असतात. जिथे जिथे मराठी

समाज आहे, तिथे तिथे मराठी साहित्य संमेलने भरवली पाहिजेत. या भूमिकेचे मी जाहीरपणे समर्थन करतो,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी पुणेकर रसिक मित्र परिवारातर्फे आयोजित चर्चासत्रात व्यक्त केले. डॉ. वि. भा. देशपांडे, डॉ. सुमन बलवलकर, शरणकुमार लिंबाळे, अमेरिकेतील बे एरिया महाराष्ट्र मंडळाचे सागर येवलेकर याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''साहित्याचा आस्वाद आणि निर्मिती हा एकांताचा उत्सव असतो. मराठी साहित्य संमेलन महाराष्ट्रातच झाले पाहिजे, अशी संकुचित वृत्ती ठेवणे योग्य नाही. जेथे मराठी माणसे आहेत तेथे साहित्य संमेलने अगदी लहान प्रमाणात झाली तरीही चालतील. परंतु संमेलने व्हायला पाहिजेत.

''संमेलन हे समाजाला साहित्याभिमुख करण्यासाठी असते. विश्व साहित्य संमेलनातून अमेरिकेतील मराठी समाज, भाषा, साहित्य आणि संस्कृतीला अनुरूप व्हावा, अशी संयोजकांची भूमिका असली पाहिजे. त्यासाठी मराठीचा गंध नसणाऱ्या तेथील बालवाचक आणि युवा पिढीलाही सहभागी करून घ्यावे. मराठी साहित्याचे जागतिक स्तरावरील स्थान समजून घेण्यासाठी अन्य भाषांत अनुवाद झालेले मराठी साहित्य अमेरिकेतील समीक्षकांना उपलब्ध करून दिले पाहिजे.''

देशपांडे म्हणाले, ''संमेलनातून भाषा, साहित्य, संस्कृती यांची देवाणघेवाण होणे गरजेचे आहे. त्यासाठी तेथील भाषातज्ज्ञांशी संवाद, मराठी साहित्यिकांच्या वाचकांशी गप्पा, शतकपूर्ती साजरी करणाऱ्या दिवाळी अंकांसह विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन या कार्यक्रमांचा या संमेलनात समावेश असेल.''

बेलवलकर यांनी अमेरिकेतील नवी पिढी मराठीपासून दूर जाऊ नये यासाठी मराठी अभ्यासक्रम सुरू करावेत, अशी मागणी केली.

### * बापू घावरे यांचे व्यंगचित्र प्रदर्शन

व्यंगचित्रकार बापू घावरे यांच्या व्यंगचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्वास मेहेंदळे यांच्या हस्ते झाले.

''ॲनिमेशनमुळे चित्रकलेतील सर्जनशीलता संपली असून, केवळ संगणकावर प्रयोग करून विचित्र आकृतिबंध निर्माण करणे म्हणजे चित्रकला का असा प्रश्न या क्षेत्रातील तरुणांनी स्वत:ला विचारले पाहिजे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रकार रविमुकुल यांनी केले.

रविमुकुल म्हणाले, ''व्यंगचित्र काढणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे, ते केवळ हसविण्यासाठी नसते, तर प्रत्येक व्यंगचित्र हे काही भाष्य करते.''

डॉ. मेहेंदळे म्हणाले, ''प्रत्येक कलाकार कलेच्या माध्यमातून व्यक्त होण्याचा प्रयत्न करत असतो. प्रसारमाध्यमातील व्यंगचित्र हे एक प्रभावी माध्यम आहे. आजची प्रसारमाध्यमे काही ठराविक लोकांनाच प्रसिद्धी देतात. प्रा. घावरे यांनी मात्र

आपल्या प्रत्येक चित्रात सामान्य माणसाला स्थान दिले आहे.''

प्रा. घावरे यांचे हे दहावे प्रदर्शन होते. त्यात एकूण १५० व्यंगचित्रांचा समावेश होता. पुणेकर, पुण्याची वाहतूक, महापालिका, सध्या सुरू असलेले 'रिॲलिटी शो', नुकतीच पार पडलेली राष्ट्रकुल युवा स्पर्धा अशा अनेक विषयांवर प्रदर्शनातील व्यंगचित्रांनी नर्मविनोदी भाष्य केले आहे.

### * अभिरुची ओळखून लेखन करावे

''मराठी कवींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. काव्यसंग्रहांचे प्रमाणही वाढत आहे. मात्र संवेदनशील साहित्यनिर्मितीसाठी कवींनी आपली अभिरुची, परंपरा ओळखून लिखाण करावे. आजच्या कवींना जीवनतप कळते. मात्र काव्यतप कळत नाही.'' असे विचार ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

उद्धव कानडे यांच्या 'अस्वस्थायन' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर भाई वैद्य, सिद्धार्थ नागटिळक, अरुण जाखडे, मिलिंद जोशी उपस्थित होते. डॉ. कुलकर्णी पुढे म्हणाले, ''समाजात कलावंतांचे काम दिव्यासारखे असते. कोणतीही साहित्यकृती समृद्ध होण्यासाठी त्यात संवेदनशीता आवश्यक असते. अभिरुचीप्रमाणे कविता केल्यास त्याला जिवंतपणा येतो. जीवनाचा आक्रोशही कलात्मकरीत्या सादर करण्याची कला असणाऱ्या कानडे यांच्या काव्यातून याचा प्रत्यय येतो. संघर्षमय जीवन जगूनही संयमी वृत्ती जपलेल्या कानडे यांच्या कविता त्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब आहेत.''

भाई वैद्य म्हणाले, ''देशात एका बाजूला पैशाच्या राशी तर दुसऱ्याकडे बेकारी वाढत आहे. समाजातील मोठ्या वर्गाला जीवन कसे जगायचे, हा प्रश्न पडला आहे. शेकडो शेतकरी आत्महत्या करीत असूनही समाज संवेदनशून्य नजरेने ही परिस्थिती पाहतो आहे. जागतिकीकरणाच्या परिणामांचे दर्शन 'अस्वस्थायन'मधून घडते.''

### * प्रगतीसाठी 'गांधी इंजिनिअरिंग'ची गरज

''आर्थिक व्यवसायात नावीन्य आणि प्रगती साधायची असेल, तर गरज आहे ती 'गांधी इंजिनिअरिंगची.' गांधी इंजिनिअरिंग म्हणजेच कमी उपलब्धतेतून अधिक लोकांसाठी अधिकाधिक मिळविणे. २०२० पर्यंतच्या इनोव्हेशन व्यवसायासाठी एक जागतिक केंद्र म्हणून भारताची उभारणी करण्यासाठी गांधी इंजिनिअरिंगवर जोर देतानाच अणुकराराचा परिणाम नागरिकीकरणावरही होणार आहे,'' असे प्रतिपादन चर्चासत्रात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.

''जीवनात एक टप्पा पूर्ण केला की पुढच्या प्रवासासाठी नवीन बस लागते, मात्र भारताने प्रगतीचे अनेक टप्पे गमावलेत, हे खेदकारक आहे. त्यासाठी आता आपल्याला इनोव्हेशनची व्याख्याच पुन्हा एकदा बनवावी लागेल. उत्पादन मॉडेलचेदेखील

नव्याने संशोधन होणे गरजेचे आहे. पुनर्विचार आणि पुनर्निर्मिती आवश्यक आहे. जगण्याच्या उंचीलाच जर नावीन्याची आणि कल्पकतेची जोड दिली तर आपोआपच विकासाला नवर्निर्मितीचा ध्यास लागतो.''

या वेळी केपीआयटी कमिन्सचे अध्यक्ष रवी पंडित म्हणाले : औद्योगिक संस्थांनी इनोव्हेशनच्या दृष्टीने हीच योग्य वेळ आहे हे लक्षात घ्यावे कारण ग्राहक बदलत आहे आणि बाजारपेठही बदलत आहे. सिस्कोचे चेअरमन स्टीव्ह ड्यू मॉन्ट यांनी जगाच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण केले.

*** पुलंची प्रतिभा**

पु. ल. देशपांडे यांचे व्यक्तिमत्त्व विविधांगी व सगळ्यांना आपलेसे वाटणारे होते. विंदा करंदीकरांच्या शब्दांत पुलंची वैशिष्ट्ये प्रकटली आणि 'अरे, आपल्यालाही हेच तर म्हणायचे होते,' असा भाव प्रेक्षकांमध्ये उमटला.

करंदीकर म्हणाले, ''अष्टपैलू हा शब्द ज्यांच्याबाबतीत प्रामाणिकपणे वापरता येतील असे अर्वाचीन महाराष्ट्राला दोनच पुरुष लाभले. एक आचार्य अत्रे आणि दुसरे पु. ल. देशपांडे असे मी पूर्वी एकदा म्हटले होते; पण पुलंना अष्टपैलू म्हणण्यात मी पुलंवर थोडा अन्याय केला आहे, अशी माझी भावना आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ८ नव्हे, १४ पैलू होते. प्राध्यापक, विनोदी लेखक, प्रवासवर्णनकार, भाषांतरकार, रूपांतरकार, नाटककार, नट, नकलाकार, दिग्दर्शक, हार्मोनियमवादक, वक्ता, संगीतकार, दाता व रसिकाग्रणी. प्रेक्षकांवर व वाचकांवर आपल्या प्रतिभेच्या बहुढंगी निर्मितीची आणि सेवाभावी संस्थांवर आपल्या दिलदार देणग्याची सातत्याने ज्यांनी बरसात केली. जनता आणि पु.ल. यांच्यामधील प्रेमाच्या चढाओढीत पुलं काकणभर सरस ठरत असले, तर त्याचे श्रेय सुनीताबाईंनाही द्यावे लागेल. इतरांच्या गुणांचा व कार्याचा मुक्तकंठाने गौरव करताना आपण लहान ठरू, अशी भीती पुलंना कधीच वाटली नाही. आम्हा लेखकांना ती पुष्कळदा वाटते. म्हणूनच पुलंच्या बोलण्यातून व लिखाणातून अप्रत्यक्षपणे मिळणारा तो संदेश मला फार मोलाचा वाटतो.

महाराष्ट्राच्या या लाडक्या व्यक्तिमत्त्वाच्या अथांग लोकप्रियतेची काही कारणे सहज लक्षात येतील, अशी आहेत. समकालीन अभिरुचीशी सहज संवाद साधणारी त्यांची प्रतिभा व त्यांची भाषा, त्यांचे आनंदधर्मी व बहुढंगी लिखाण, त्यांचा सर्व संचारक व विविधांगी विनोद, अतिरेकी नावीन्य आणि अनाकलनीय गूढता यांना थारा न देता पारंपारिक श्रद्धांना धक्का देणाऱ्या विचारांची अनुपस्थिती, अनेक माध्यमांचा प्रभावी वापर करणारी असामान्य 'शोमनशिप' त्यांची लोकसंग्राहक व उत्तेजनप्रवण रसिक वृत्ती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांचे निष्कलंक चारित्र्य व नि:शब्द दातृत्व या सर्व गोष्टी निश्चितच त्यांच्या अथांग लोकप्रियतेला कारणीभूत आहेत, पण तेवढ्याने तिचे संपूर्ण रहस्य उलगडले, असे मी समजत नाही. अशा प्रकारच्या

लोकप्रियतेत काही अनाकलनीय असा भागही असतोच.''

*** मराठीला पर्याय नाही**

तुमच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकारने चार वर्षे चांगले काम केले आता पाचव्या वर्षात मराठी भाषेला निवारा देण्याचे काम जोमाने करा आणि फाटक्या वस्त्रात उभ्या असलेल्या मराठी भाषेला शालू नेसवून मंत्रालयात बसवा, असा सल्ला ज्येष्ठ पत्रकार नीळकंठ खाडिलकर यांनी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना दिला.

राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृहात झाले.

विलासराव, पंतप्रधानांकडे शिष्टमंडळ घेऊन जाताना पंतप्रधानांना एकाच वाक्यात सांगा की, मुंबई, महाराष्ट्रात युपी-बिहारी हे खुशाल, सुखरूप आणि सुशेगात आहेत. युपी-बिहारी हे त्यांच्याच प्रांतात संकटात आहेत म्हणून ते इथे येतात. त्यामुळे लालूंनी बिहारींचा प्रश्न बिहारमध्ये सोडवावा महाराष्ट्रात नव्हे, असे परखड मत खाडिलकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रात मराठीला पर्याय असूच शकत नाही. महराष्ट्रात मराठी येणे आवश्यक असून मराठी येत नाही हे कोणीच स्वीकारू शकत नाही. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा व आपली मातृभाषा असल्याचे मुख्यमंत्री देशमुख यांनी या वेळी ठणकावून सांगितले. उर्दू शाळांतही मराठी शिकविली जाईल. मराठीची सक्ती करण्याचा प्रसंग येईल, तेव्हा ती सक्ती सक्तीनेच केली जाईल असेही ते म्हणाले. मराठीला पर्याय असू नये, दुय्यम भाषेला पर्याय ठेवावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

*** 'आजच्या ठळक बातम्या' पुस्तक प्रकाशन**

दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या बातम्यांची वाटचाल प्रेक्षकांना प्रगल्भतेकडे घेऊन जात आहे, असा सूर 'टी.व्ही.च्या बातम्या' या विषयावरील चर्चासत्रात व्यक्त झाला.

'अक्षरधारा' आयोजित 'मायमराठी शब्दोत्सव' ग्रंथप्रदर्शनांतर्गत पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक बहुमाध्यम संशोधन केंद्राचे (ईएमआरसी) संचालक समीरण वाळवेकर लिखित 'आजच्या ठळक बातम्या' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव याच्या हस्ते झाले. 'लोकसत्ता'चे सहसंपादक अरविंद व्यं. गोखले, 'स्टार माझा'चे मुख्य संपादक राजीव खांडेकर, 'सीएनएन आयबीएन'चे राजकीय संपादक रोहित चंदावरकर 'राजहंस प्रकाशन'च्या सुजाता देशमुख आणि 'अक्षरधारा'चे संचालक रमेश राठिवडेकर या वेळी उपस्थित होते.

गोखले म्हणाले, ''मराठीच्या मुद्द्याबाबत मराठी वाहिन्यांमध्ये प्रगल्भता आली आहे; पण हिंदी वाहिन्या अशा का वागतात, ते न कळणारे आहे. एखाद्या राजकीय नेत्याचे वर्तन चुकीचे असेल तर वारंवार दाखवणे मनाला पटणार नाही. लोकांना

काय हवे आहे, यापेक्षाही आपली कर्तव्ये काय आहेत, हे पाहणे महत्त्वाचे आहेत. समाजोपयोगी एखादा विषय मांडण्यामागची भावना चांगली असेल, तर 'सिटीझन जर्नालिस्ट' या विषयाचे स्वागत केले पाहिजे.''

खांडेकर म्हणाले, ''वर्तमानपत्रांसारखा समंजसपणा वाहिन्यांमध्ये यावा, ही अपेक्षा रास्त असली तरी त्यासाठी आणखी काही कालावधी द्यावा लागेल.'' 'मीडिया ट्रायल'बाबत केवळ वाहिन्यांना दोष देण्यापेक्षाही न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये एकही सदस्य दूरचित्रवाणी वाहिन्यांशी बोलणार नाही, अशी बंधने न्यायालये का घालत नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

चंदावरकर म्हणाले, ''बातम्या दाखवताना बऱ्याचदा संयम पाळला जातो. क्वचितप्रसंगी समाजमनावर विपरीत परिणाम होईल, अशी दृश्ये घाईने दाखविली जातात, हे नाकारता येणार नाही. उत्तर भारतीय माणसे हिंदी वाहिन्यांच्या प्रमुखपदी असल्याने महाराष्ट्रविरोधी चित्र दिसते, हा आरोप काही अंशी खरा असून शकतो; पण टोकाचे निष्कर्ष काढू नयेत. राष्ट्रीय पातळीवर विचार करताना संकुचित दृष्टिकोन ठेवून चालत नाही, हेदेखील लक्षात घेतले पाहिजे.''

डॉ. जाधव म्हणाले, ''वाळवेकर यांनी माध्यम क्षेत्रातील प्रवास अधोरेखित करताना माध्यमांचा प्रवासदेखील रोचक पद्धतीने मांडला आहे. हे केवळ व्यावसायिक आत्मकथन नाही, तर या विषयावरचे त्यांचे चिंतन आहे. 'इंडियट बॉक्स'मागे जी शहाणी माणसे आहेत, ती काय काम करतात, याची माहिती या पुस्तकातून मिळते. 'डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा'ने हे पुस्तक पाठ्यपुस्तक करण्याचा मनोदय व्यक्त केले आहे. मात्र, पुणे विद्यापीठ त्याआधीच हा निर्णय घेईल.'' वारंवार त्याच बातम्या दाखवताना ती बातमी कितव्यांदा दाखवली जात आहे तो 'स्कोअर' दाखवा, म्हणजे जनतेला ताजे काय आहे हे कळेल, अशी सूचना जाधव यांनी केली.

वाळवेकर म्हणाले, ''दूरचित्रवाणी हे माध्यम वाटते तितके सहज, सोपे नाही. प्रतिष्ठा, वलय आपोआप येत असले तरी परिस्थितीची जाण आणि उत्तरदायित्वाची जाणीव व्हावी, हा लेखनामागचा उद्देश आहे. माध्यमांचे तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी मजकुराचा आशय तितकाच महत्त्वाचा आहे.''

*** 'कथा एका राजघराण्याची' : भालेराव यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन**

मंगलादेवी भालेराव यांच्या 'कथा एका राजघराण्याची' या आत्मचरित्राचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. यु. म. पठाण यांच्या हस्ते झाले. 'सकाळ'चे संपादक (कला, साहित्य व संस्कृती) सुरेशचंद्र पाध्ये, उन्मेष प्रकाशनाच्या मेधा राजहंस आदी याप्रसंगी उपस्थित होते.

''हिंदू-मुस्लीम संबंधांचे अनोखे दर्शन या पुस्तकातून घडते. एका व्यक्तीचे समृद्ध जीवन; तसेच घराण्याची कारकीर्द यांसह त्यांनी जपलेल्या माणूसपणाची ही

गाथा आहे,'' असे पाध्ये म्हणाले.

''प्रत्येक समाजात चांगल्या-वाईट प्रवृत्ती दिसतात; मात्र सामाजिक ऐक्याचे चपखल चित्र यात रंगविण्यात आले आहे. तत्कालीन समाजाचे धार्मिक, राजकीय व ऐतिहासिक संदर्भ अतिशय चांगल्या पद्धतीने समोर येतात,'' असे डॉ. पठाण म्हणाले. लेखिका भालेराव म्हणाल्या, ''घराण्याचा गौरवशाली इतिहास सर्वांसमोर यावा, या हेतूने पुस्तक लिहिले आहे.''

*** 'ग्रामजागर'मध्ये अभिरूप न्यायालय**

यशवंतराव चव्हाण ग्रामजागर साहित्य संमेलनात दुसऱ्या दिवशी अभिरूप न्यायालयाचे आयोजन केले होते. या वेळी आरोपीच्या पिंजऱ्यातून समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिलेल्या विविध प्रश्नांच्या उत्तरांनी श्रोत्यांची मने जिंकून घेतली.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ग्रामजागर साहित्य संमेलन आयोजले होते. अभिरूप न्यायालयासाठी प्रा. लक्ष्मण ढोबळे, डॉ. आनंद यादव, ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार, आमदार दिलीप मोहिते, विठ्ठल वाघ, रामचंद्र देखणे उपस्थित होते.

या न्यायालयात अण्णा हजारे म्हणाले, ''मतदार जोपर्यंत जागृत होत नाही, तोपर्यंत चांगली माणसे निवडून येणार नाहीत. राजकारणातील कुठल्याच व्यक्तीबद्दल मला राग नाही. स्वैराचाराने वागत असतील तर त्यांच्याविरुद्ध माझे भांडण आहे. गुंड, भ्रष्टाचारी माणसे लोकशाहीच्या पवित्र मंदिरात शिरली, तर लोकशाही नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. माहितीचा अधिकार हा सर्वसामान्यांचा मूलभूत हक्क आहे. निवडून दिलेल्यांना तिजोरीचे रक्षण करायला पाठविले. तिजोरीचा पैसा कसा वापरला, हे विचारण्याचा आमचा हक्क आहे. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता असा प्रकार सध्या झाला आहे. सर्वच लोक वाईट आहेत असे नाही. पुढच्या निवडणुकीत किमान पंचवीस चांगली माणसे निवडून गेली पाहिजे, यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. अशा माणसांचा पक्ष कोणता हे पाहणार नाही.''

ते म्हणाले, ''सहकारातूनच तळागाळातील माणसांचा उद्धार होईल म्हणून सहकाराचे जाळे पसरले आहे. गरिबांनी या संस्थेत ठेवी ठेवल्या. धनदांडग्यांनी त्या लुटल्या; म्हणून सहकाराविरुद्ध आंदोलन केले. आमच्या आंदोलनामुळे मोठ्या प्रमाणात ठेवी वसूल झाल्या. महाराष्ट्रात बावीसशे जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.''

*** साहित्य संमेलन महाबळेश्वरला**

आगामी ८२वे अखिल भारतीय साहित्य संमेलन महाबळेश्वर येथे घेण्याचा

निर्णय अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या दि. १४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक झाल्यास १६ जानेवारीस नवे अध्यक्ष निश्चित होणार असून, मार्चअखेरीस हे संमेलन होणार आहे.

ठाले-पाटील म्हणाले, ''साहित्य संमेलनासाठी पुण्यातील 'त्रिदल' आणि साहित्य परिषदेची महाबळेश्वर शाखा अशा दोन संस्थांची निमंत्रणे महामंडळाकडे आली होती. महामंडळाच्या समितीने दोन्ही ठिकाणची पाहणी केली. महामंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन महाबळेश्वर येथे संमेलन घेण्याचा निर्णय एकमताने झाला. २००२ मध्ये अमृतमहोत्सवी संमेलन पुण्यात झाले होते. महाबळेश्वर येथून प्रथमच निमंत्रण आल्यामुळे, तेथील साहित्य चळवळीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशातून हा निर्णय घेण्यात आला आहे. दहा हजारांच्या आसपास लोकसंख्या असलेल्या गावात यापूर्वी १९९६ मध्ये ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांच्या अध्यक्षतेखाली आळंदी येथे साहित्य संमेलन झाले होते.''

महाबळेश्वर येथील संमेलन मार्चअखेरीस होण्याची शक्यता आहे. अपवादात्मक परिस्थितीत १० एप्रिलपर्यंत हे संमेलन होण्याची शक्यता आहे. १५ एप्रिलपासून महाबळेश्वरचा 'हंगाम' सुरू होतो. संमेलनाच्या निधीसाठी सरकारने अर्थसंकल्पातच तरतूद केली असल्यामुळे लोकसभा निवडणुकीची अचारसंहिता लागू झाली, तरी २५ लाख रुपयांचा निधी मिळण्यास अडचण येणार नाही.

महाबळेश्वर येथे यापूर्वी १९७० मध्ये ज्येष्ठ कवी बा. भ. बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय संमेलन झाले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे स्वागताध्यक्ष आणि शंकर सारडा हे कार्याध्यक्ष होते. या संमेलनाचे उद्घाटन बॅ. नाथ पै यांच्या हस्ते झाले होते.

**अध्यक्षपदाची निवडणूक वेळापत्रक**

मतदारयादी जाहीर करण्याची तारीख -२५ नोव्हेंबर

अध्यक्षपदासाठी महामंडळाकडे नावे येण्याची तारीख - १ डिसेंबर

नाव मागे घेण्याची अंतिम तारीख - ५ डिसेंबर

मतपत्रिका टपालाने पाठविण्याची तारीख - १६ डिसेंबर

मतपत्रिका पोहोचण्याची अंतिम तारीख - १५ जानेवारी

मतमोजणी आणि निकालाची अंतिम तारीख - १६ जानेवारी

*** विद्यानिकेतन शाळेच्या विद्यार्थ्यांनी रद्दीतून उभे केले वाचनालय**

शिक्षण मंडळ पुणे महापालिकेद्वारे संचालित 'विद्यानिकेतन क्रमांक ८' विद्यार्थ्यांनी रद्दीतून वाचनालय उभे केले. मुख्याध्यापक हौशीराम तात्याबा दांगट म्हणाले, ''आमच्या विद्यार्थ्यांना आम्ही सांगितले होते, की एका दिवाळीच्या सुट्टीत मामा-

मामी, काका-काकू किंवा आत्या, मावशी अशा कोणाही नातेवाइकांकडे जाल, तेव्हा एक गोष्ट अवश्य करा. त्यांच्याकडे रद्दीत काढली जाणारी पुस्तके व मासिके असतील तर तुमच्यासाठी मागून शाळेत घेऊन या.''

विद्यार्थ्यांनी ती जमवल्यावर आम्ही त्यातील वाचनीय आणि चांगल्या स्थितीत असलेली पुस्तके निवडली आणि १८५ पुस्तकांचे छोटेखानी वाचनालय उभे केले.

या पुस्तकांमध्ये इसापनीतीच्या कथांसारखी पुस्तकेही होती. त्यातून नीतिकथा शिकायला मिळाल्या. काही पुस्तकांमधून उत्तम कथा, कविता वगैरे मिळाले. माहिती व ज्ञानाचे उत्तम साधन विद्यार्थ्यांनी स्वत: वाचनालयाच्या माध्यमातून उभारले.

संपर्क - ९८९०२३९२८३

## * श्री तुकाराम महाराज जन्मचतु:शताब्दीनिमित्त देहूत आंतरराष्ट्रीय सोहळा

जगद्‌गुरू संत श्री तुकाराम महाराज जन्मचतु:शताब्दी सोहळ्यानिमित्त अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या वतीने २१ डिसेंबरपासून आंतरराष्ट्रीय विराट गाथा पारायण सोहळा व अखंड श्री हरिनाम सप्ताह श्रीक्षेत्र देहू येथे आयोजित केला आहे. उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या हस्ते सोहळ्याचे उद्‌घाटन होईल. सोहळ्यामध्ये अमेरिका, इंग्लंड व जपान या देशांमधूनही भाविक उपस्थित राहणार आहेत.

सोहळा तयारीसाठी मुख्य देऊळवाड्याच्या दर्शनी मंडपामध्ये बैठक झाली. बापूसाहेब मोरे अध्यक्षस्थानी होते. बोधले महाराज, प्रदेशाध्यक्ष संभाजी महाराज मोरे, राम मोरे, शिवाजी मोरे, संस्थानचे विश्वस्त सूर्यकांत मोरे, संजय मोरे, माणिक मोरे, माऊली काळोखे, अशोक मोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## * वाचनसमृद्धीसाठी अभिनव उपक्रम

'नारी समता मंच', 'मासूम', व 'फाउंडेशन फॉर रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ' (एफआरसीएच) या संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे काही गावांमधील महिलांची वाचनभूक भागवण्यासाठी गावोगाव पुस्तकपेट्या पाठवल्या जातात.

तीन वर्षांपासून हा उपक्रम पुण्यातील 'अक्षरस्पर्श' वाचनालय चालवत आहे. आतापर्यंत खानापूर, राळेगणसिद्धी, माळशिरस वगैरे गावे व त्यांच्या परिसरातील वाड्यावस्त्यांवरील महिलांनी या उपक्रमाचा लाभ घेतला आहे.

हडपसर व येरवडा भागातील तीन झोपडपट्ट्यांमधल्या मुलांसाठी 'शब्दयात्रा' हा वाचन विकास प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यासाठी आनंद व मुकुंद नवाथे या बंधूंनी सुमारे दोन हजार पुस्तके दिली आहेत. वाचनालयापर्यंत पोहोचू न शकणाऱ्यांपर्यंत आपण पोहोचावे, या उद्देशाने हा वाचन प्रकल्प सुरू करण्यात आला. पेटीतील पुस्तके वाचून संपली की ती पेटी परत येते. तिच्यात पुन्हा वेगळी पुस्तके भरून पाठवली जातात. पेटी एका ठिकाणी थांबवण्याचा कालावधी वाचक

महिलांना त्या-त्या वेळी उपलब्ध होणाऱ्या वेळानुसार एक ते अडीच महिन्यापर्यंत कमी-जास्त होत असतो. या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद खूप चांगला आहे.

'वनस्थळी' संस्थेच्या सचिव भारती भिडे म्हणाल्या, ''आम्ही मुलांसाठी फिरत्या वाचनालयांचे काही प्रयोग केले आहेत. त्यात बारामती येथील प्रकल्पाची अलीकडेच भर पडली आहे. एका वाहनात तऱ्हेतऱ्हेचे बालसाहित्य, चित्रमय पुस्तके, शैक्षणिक साहित्य व खेळणी असतात. १५ शाळांमध्ये हे वाहन जाते. सोबत तीन शिक्षिका असतात. १ ली ते ४ थी या वर्गांसाठी पुस्तके मोठ्याने वाचून दाखवताना शारीरिक व वाचिक अभिनयही केला जातो. मुलांना आवडणारी ही पुस्तकगाडी बारामती व परिसरातील प्राथमिक शाळांमध्ये लोकप्रिय झाली आहे. संपर्क : अक्षरस्पर्श : २५४२४९१५, वनस्थळी : २५६५१५५०''

*** जे. पी. नाईक यांचे शैक्षणिक योगदान**

देशाची शिक्षण पद्धती ठरविण्यात आणि प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात जे. पी. नाईक यांचे योगदान सर्वाधिक आहे. त्यांचे हे कार्य समाजासमोर येण्याची गरज आहे, असे मत केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केले.

'दूरदर्शी शिक्षणयोगी जे. पी. नाईक' या सविता भावे संपादित पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले, डॉ. शंकरराव गोवारीकर, मोहन धारिया, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. चित्रा नाईक वगैरे या वेळी उपस्थित होते. स्वातंत्र्य चळवळ व त्यानंतर स्वतंत्र भारताच्या शिक्षणव्यवस्थेतील नाईक यांच्या कार्याचा आढावा घेताना पवार म्हणाले, ''कोल्हापूर जिल्ह्यातील एका छोट्या गावातून आलेल्या या थोर शिक्षणतज्ज्ञाचे शिक्षणविषयक मूलभूत विचार आशियातील अनेक दिशांना दिशादर्शक ठरले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन परिषदेच्या (एनसीईआरटी) स्थापनेपासून शिक्षणविषयक मूलभूत काम करणाऱ्या अनेक संस्था त्यांनी स्थापन केल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर शिक्षणविषयक धोरण राबविताना समाजातील शेवटच्या माणसाची काय गरज आहे, हा विचार त्यांनी केला. उपेक्षित वर्गाच्या शिक्षणाचा विचार खूप वेगळ्या पद्धतीने त्यांनी केला. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करताना अनौपचारिक शिक्षणाची गरज त्यांनी व्यक्त केली. कोठारी आयोगाचे सचिव म्हणूनही त्यांचे योगदान मोठे आहे. अकराव्या योजनेत शिक्षणासाठी मोठी अर्थिक तरतूद करण्यात आली आहे. शिक्षणाकडे पाहण्याची आजच्यासारखी स्थिती त्या वेळी असती, तर देशातील शिक्षणाचे आणखी चांगले चित्र निर्माण झाले असते.''

*** राज्य ज्ञान आयोग**

राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या धर्तीवर राज्यातही 'महाराष्ट्र ज्ञान आयोग' स्थापन

करण्याचा निर्णय मुंबईत झालेल्या कुलगुरूंच्या संयुक्त मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यपाल व कुलपती एस. सी. जमीर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक झाली. मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री दिलीप वळसे-पाटील या वेळी उपस्थित होते. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी आणि बदलत्या काळाशी सुसंगत शिक्षण देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानातील तज्ज्ञ सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय ज्ञान आयोगाची (नॉलेज कमिशन) स्थापना करण्यात आली आहे.

त्या धर्तीवर महाराष्ट्रातही राज्यपातळीवरील ज्ञान आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे. विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या प्रशासकीय जबाबदाऱ्या कमी करून अधिकार वाढविण्यास तत्त्वत: मान्यता देण्यात आली. व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभा या अधिकार मंडळांचे कुलगुरूंवर असलेले नियंत्रण कमी करण्याच्या मुद्द्यावर चर्चा झाली. त्यासाठी विद्यापीठ कायद्यात बदल करावे लागणार आहेत. सध्या १९९४ मधील महाराष्ट्र विद्यापीठ कायदा अस्तित्वात आहे. मात्र बदलत्या काळात त्यामध्ये बदल करण्याची गरज व्यक्त करण्यात येत होती. अकराव्या पंचवार्षिक योजनेनुसार विद्यापीठ अनुदान मंडळाने (यूजीसी) घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांना सुसंगत असे परीनियम तयार करण्यात येतील, असेही सूचित करण्यात आले. महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबाबतही मार्गदर्शक तत्त्वे ठरवण्यात येणार आहेत.

राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये संशोधनाचे कार्य सुरू असते. त्यामध्ये समन्वय साधण्यासाठी एक समन्वय केंद्र स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली.

### * 'अमृतसंजीवनी' नृत्य नाट्यात ज्ञानेश्वरांचा जीवनपट

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या अभंगावरील लयबद्ध नृत्यरचना आणि आकर्षक सादरीकरणाने तळेगाव दाभाडेच्या सृजन नृत्यालयाने 'अमृतसंजीवनी'द्वारे ज्ञानेश्वरांचा जीवनपट उलगडला. रसिकांनी या नृत्यनाट्याला भरभरून दाद दिली.

चिंचवडच्या प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात या दोन अंकी नृत्य-नाट्याचा शुभारंभाचा प्रयोग झाला. प्रयोगाचे लेखन, दिग्दर्शन, संकल्पना आणि नृत्यरचना नृत्यालयाच्या संचालिका मीनल कुलकर्णी यांची आहे. त्यांच्या गुरू स्वाती दैठणकर, आमदार दिगंबर भेगडे, नगरसेविका सुलभा उबाळे, 'कलापिनी'चे डॉ. आनंद परांजपे या वेळी उपस्थित होते. नृत्य-नाट्यात ज्ञानदेवांची 'शब्दकळा' हे रूपक वापरण्यात आले. 'रूप पाहता लोचनी', 'ऐका नारायण पामर पुराण', 'ज्ञान माझा बाळराजा', 'देवाचिये द्वारी', 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' आदी अभंगांवर नृत्य-नाट्य सादरीकरण झाले.

## * गाडगीळांच्या परीकथांची तीन पुस्तके

बालदिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ साहित्यिक गंगाधार गाडगीळ यांनी खास छोट्या दोस्तांसाठी लिहिलेल्या गोष्टींची 'माकड झाले राजा', 'यक्षकन्या आणि राजपुत्र' तसेच 'मुंगीचं समाधान होतच नाही' ही तीन पुस्तके प्रकाशित झाली.

गाडगीळ यांनी मुलांसाठी 'यक्षनगरीतील नवलकथा' या नावाने गोष्टींची मालिकाच काही वर्षांपूर्वी लिहिली होती. त्यापैकी 'गरुडाचा उतरला गर्व' आणि 'अश्रूंचे झाले हिरे' ही दोन पुस्तके त्यांच्या हयातीत प्रकाशित झाली. या पुस्तकांना बालवाचकांचा प्रतिसादही छान होता. गाडगीळ यांचे नुकतेच निधन झाले. पण त्यापूर्वी त्यांनी मुलांसाठीचे लेखन पूर्ण केले होते. आता बालदिनाने महत्त्व जाणून 'पॉप्युलर प्रकाशन'तर्फे उर्वरित गोष्टींची तीन पुस्तके बालवाचकांच्या हाती देण्यात आली. वाचनाचा आनंद घेत असतानाच नकळत संस्कार करण्याचे सामर्थ्य या कथांमध्ये आहे.

'पॉप्युलर प्रकाशन'चे हर्ष भटकळ म्हणाले, ''रंजनासह संस्कार करणाऱ्या या तीनही पुस्तकांमध्ये एकूण पंधरा गोष्टींचा समावेश आहे. छोट्या मुलांच्या भावविश्वात स्थान असणाऱ्या पऱ्यांच्या, पक्षी-प्राण्यांच्या, उडणाऱ्या हत्तींच्या, बोलणाऱ्या बाहुल्यांच्या या कथा मुलांना वाचायला तर आवडतीलच, पण नकळत त्यांच्यावर चांगले संस्कारही करतील अशा आहेत.

## * 'सकाळ एनआयई'चा उपक्रम

पुस्तके वाचण्याचे अनेक प्रकार आहेत. काही जण पुस्तके म्हणजे केवळ त्यातील अक्षरे, शब्द वाचतात. तर काही जण शब्दांमधून प्रकट होणारा आशय, भावार्थ वाचतात. पण वाचन हे केवळ पुस्तकांपुरतेच मर्यादित असू शकते का? एखाद्या परिसराचे वाचन, चित्रवाचन, माणसाचे वाचन, एखाद्या झाडाचे वाचन... हेसुद्धा वाचनाचे प्रकार आहेत. असे वैविध्यपूर्ण वाचनप्रकार 'सकाळ एनआयई'च्या अंकात देण्यात आले आहे.

'सकाळ एनआयई'तर्फे 'बालमित्र प्रबोधिनी'च्या सभासदांसाठी तीन आवृत्त्या प्रकाशित केल्या गेल्या. सर्व अंकांसाठी 'बँक ऑफ महाराष्ट्र'ने राज्यस्तरीय प्रायोजकत्व दिले असून, चालू शैक्षणिक वर्षातील 'कलारंजन' विशेषांक लवकरच शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यात येणार आहे. या उपक्रमात सुमारे वीस हजार विद्यार्थी महाराष्ट्रातील विविध शहरांतील १६० शाळांमधून सहभागी झाले आहेत.

यापुढील अंक 'वाचाल तर वाचाल' या विषयावर असणार आहे. आजच्या जगात जर तुम्हाला 'वाचायचे' असेल तर तुम्हाला वैविध्यपूर्ण माहितीने समृद्ध असणे आवश्यक ठरते. वाचन आणि तेही नावीन्य आणि माहितीपूर्ण असे असावे लागते.

*** डॉ. मीना प्रभू यांची इजिप्त गाथा**

भर वाळवंटात केवळ नाईल नदीच्या जीवनदायी प्रवाहामुळे बहरत गेलेली हजारो वर्षांची संस्कृती; इतिहास, भूगोल, जीवनपद्धती यांचे ललितरम्य विवेचन करत डॉ. मीना प्रभू यांनी श्रोत्यांना इजिप्तची सफर घडवली.

प्राचीन राजांची थडगी, त्यांच्या दासदासी, सेवक, राण्या, रथ, प्रसाधने, सिंहासने, पलंग, आसने, अन्नधान्य, दागदागिन्यांसह सुवर्णमंडित करून हजारो वर्षे जतन करून ठेवण्याची तत्कालीन इजिप्तची परंपरा, त्या परंपरेचे तुतनखामेनच्या थडग्याच्या उत्खननामुळे प्रकाशात आलेले स्वरूप, अभ्यासक-संशोधकांनी अनेक वर्षे संशोधन करून वाचलेली प्राचीन लिपी, त्यातून जुळलेले संदर्भ, समजलेल्या रूढी-परंपरा, पूर्वजांनी केलेली आश्चर्यकारक बांधकामे, स्थापत्याचे चमत्कार, आजही ती सुस्थितीत राहणे, शिरस्त्राणापासून पादत्राणापर्यंत शृंगारलेल्या ममीज... यांचे एक अद्‌भुत विश्व प्रभू यांच्या कथनातून उलगडले. इजिप्तमधील प्रचंड पिरॅमिड्स, त्यांची मांडणी, आस्वान धरणातील पाण्यात प्राचीन अवशेष बुडून नष्ट होऊ नयेत म्हणून आधुनिक संशोधकांनी घेतलेले परिश्रम यांचाही उल्लेख प्रभू यांनी आवर्जून केला.

*** 'इफ्फी'त जुन्या चित्रपटांचा खजिना!**

गोव्यात होणाऱ्या ३९ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी) भारतीय चित्रपटसृष्टीतील जुना खजिना रसिकांसाठी खुला होणार आहे. पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या (एनएफएआय) सहकार्याने या चित्रपटांचा आनंद रसिकांनी लुटता येईल असे संग्रहालयाचे संचालक विजय जाधव यांनी सांगितले 'इफ्फी'मध्ये 'संग्रहालयातील खजिना' या मालिकेत १९५० पूर्वीचे दर्जेदार आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आलेले चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. हिमांशू राय यांची पहिली आंतरराष्ट्रीय निर्मिती ठरलेल्या 'कर्मा'सह 'संत तुकाराम', 'जर्नी ऑफ डॉक्टर कोटणीस', 'नीचानगर' या चित्रपटांचा त्यामध्ये समावेश आहे.

मनोरंजनाबरोबर समाजप्रबोधन हाही चित्रपटांचा उद्देश असल्याचे आणि प्रबोधनातील चित्रपटांचे योगदान स्पष्ट करणाऱ्या भित्तिचित्रांचे आणि छायाचित्रांचे प्रदर्शनही या वेळी आयोजित करण्यात येणार आहे. त्यापैकी निवडक चित्रांच्या संग्रहाचे पुस्तकही प्रकाशित करण्यात येणार आहे.

चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या 'कालियामर्दन' या मूकपटाचे प्रदर्शन 'इफ्फी'मध्ये करण्यात येणार असून या मूकपटाच्या वेळेस प्रत्यक्ष संगीताची साथ हे 'इफ्फी'मधील खास आकर्षण ठरणार आहे. १९१९ मध्ये हा चित्रपट तयार करण्यात आला होता. येत्या २३ नोव्हेंबर रोजी पणजीमध्ये हा चित्रपट प्रत्यक्ष वाद्यवृंदाच्या साथीसह दाखविण्यात येणार आहे.

### * सर्वोदय समाज ४२ वे संमेलन

'४२व्या सर्वोदय समाज संमेलन'चे उद्घाटन ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत देसाई यांच्या हस्ते झाले. चंद्रशेखर धर्माधिकारी, महापौर राजलक्ष्मी भोसले, केंद्रीय योजना आयोगाचे सदस्य लक्ष्मीचंद जैन, अपारंपरिक ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री विलास मुत्तेमवार, ठाकूरदास बंग, डॉ. सुगंध बरंठ, 'युक्रांद'चे अध्यक्ष कुमार सप्तर्षी, 'एमआयटी'चे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड, काँग्रेस शहराध्यक्ष अभय छाजेड आदी उपस्थित होते.

''देशभरात सुरू असलेल्या विकासप्रक्रियेमध्ये सामान्य माणूस बाजूला पडला आहे. हिंसेच्या जाळ्यात तो भरडला जात आहे. त्याला अत्याधुनिक बाँब अथवा बंदुकीची गरज नसून, अहिंसा हीच त्याची ढाल आहे. त्यामुळे सामान्य माणूस सशक्त झाल्याशिवाय समाजात अहिंसेची संस्कृती निर्माण होणे अशक्य आहे,'' असे मत ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत नारायणभाई देसाई यांनी व्यक्त केले.

देसाई म्हणाले, ''निसर्गामध्ये सुधारण होते तेव्हा तिला संस्कृती म्हणतात, पण जेव्हा बिघाड होतो त्या वेळी विकृती म्हणतात. सध्या जगभरात दहशतवाद, वैफल्यभाव, सांप्रदायिक द्वेष या तीन प्रकारच्या हिंसा वाढत आहेत. आपल्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय वर्तुळामध्ये हिंसेची बीजे रोवली गेली आहेत; मात्र त्याची जाणीव समाजाला नाही. राजकीय मक्तेदारी दिसत आहे. स्त्रिया, दलित, आदिवासी लोकही त्यांचे शिकार बनले आहेत. भ्रष्टाचार, गरिबांचे प्रश्न, सामाजिक विषमता अशा विदारक वास्तवाशी लढणे अवघड आहे; पण अशक्य नाही. प्रत्येक व्यक्तीने आपल्या गरजा कमी करून बांधवांना मदत केली पाहिजे. त्यासाठी महात्मा गांधींनी मांडलेले महत्त्वपूर्ण विचार आचरणात आणावेत.''

धर्माधिकारी म्हणाले, ''सध्या धार्मिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रांतील हिंसा आणि इतर समस्या महात्मा गांधी आणि विनोबांच्या काळामध्ये नव्हत्या. त्यामुळे पूर्वीच्या शस्त्रांनी आताची लढाई लढता येणार नाही. त्यासाठी विचारमंथन, चिंतन करून मार्ग काढावा लागेल.'' संयोजक रामचंद्र राही यांनी सूत्रसंचालन केले.

### * 'मैत्री मधुमेहाशी'चे प्रकाशन

''भारतात मधुमेह रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे अनेक जण नैराश्याच्या गर्तेत अडकले आहेत. या रुग्णांना मानसिक आधाराची गरज असून, 'मैत्री मधुमेहाशी' हे पुस्तक त्यांच्यासाठी उपयुक्त ठरेल,'' असा विश्वास 'ब्लू बर्ड इंडिया'चे कार्यकारी व्यवस्थापक नितीन सोनटक्के यांनी व्यक्त केला.

ज्येष्ठ मधुमेहतज्ज्ञ डॉ. रमेश गोडबोले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. श्यामल कुलकर्णी यांनी हे पुस्तक अनुवादित केले आहे.

सोनटक्के म्हणाले, ''मधुमेहासारख्या आजाराच्या विळख्यात अडकूनही निकोल

जॉन्सन हिने 'मिस अमेरिका' होण्याचे ध्येय गाठले. मधुमेह झाल्यानंतरही ती मोठ्या जोमाने कार्यरत होती. तिचा हा आदर्श मधुमेहींसमोर राहावा.''

डॉ. गोडबोले म्हणाले, ''मधुमेहाचे रुग्ण नाहक भीती बाळगतात. आहाराबाबतही अनेक गैरसमज आहेत. ते दूर करून नियंत्रित आहार घेतल्यास विविध पदार्थांचा आस्वाद घेता येईल. मात्र, त्यासाठीची मानसिकता तयार असायला हवी. बालकांना होणाऱ्या मधुमेहाचे प्रमाण वाढत आहे. मात्र, ते प्रमाण सध्या तरी आटोक्यात आहे. बालकांमध्ये आढळून येणाऱ्या मधुमेहाबाबत मोठा गवगवा केला जात आहे. त्या संदर्भात पालकांमध्ये गैरसमज आहेत. त्यामुळे लहान मुलांच्या आहारावर बंधने आणली जातात. त्यासाठी मधुमेह काय आहे व तो कशामुळे होतो, याबाबत जागृती व्हायला हवी.''

*** सविता भावे - ७५**

''मी माणसांत राहिलो, त्यांच्यात जगलो. 'माणसां'विषयी कुठलाही आकस, द्वेष ठेवला नाही. त्यामुळे मी अत्यंत सुखी माणूस आहे,'' असे उद्‌गार ज्येष्ठ लेखक सविता भावे यांनी १३ नोव्हेंबर रोजी अमृतमहोत्सवी सत्कारानिमित्त काढले. या प्रसंगी भावे यांच्या 'माणसातील माणूस' या आत्मचरित्राचे तसेच 'कार्यकुशल सविता भावे गौरव अंका'चे प्रकाशन प्रतापराव पवार यांच्या हस्ते झाले. वैद्य दादा खडीवाले यांच्या हस्ते गौरवनिधी देण्यात आला. या प्रसंगी समितीचे अध्यक्ष डॉ. शरच्चंद्र गोखले, उपाध्यक्ष रावसाहेब शिंदे, कुंदा भावे, डॉ. अशोक कामत आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कुंदा भावे यांचा सत्कार डॉ. वैजयंती जोशी यांनी केला.

भावे म्हणाले, ''माझ्या हातून आजवर मनाला खंत वाटावी, असे काहीही घडले नाही. मी फार मिळवले असे नाही. जे मिळवले ते रास्त मार्गानेच मिळवले. प्रत्येक माणसाशी सौहार्दाचे, प्रेमाचे संबंध ठेवले. आपल्याकडून कोणावर अन्याय होऊ नये यासाठी दक्ष राहिलो. सुदैवाने प्रकृतीने साथ दिली. जी कामे करायला मिळाली, त्यांनी समाधान दिले. मनाप्रमाणे काम करता आले. मी कायम परिवारात, माणसांत राहिलो, माणसांचा शोध घेत फिरलो. माझे हे जगणे सुखाचे झाले, ते कसे हे या पुस्तकात मी मांडले आहे.''

*** सामाजिक समरसता मंचाच्या 'मानदंड'चा लोकार्पण सोहळा**

''बंधुभाव हा सामाजिक समरसतेचा मंत्र आहे. समाजातील विषमता दूर करण्यासाठी राजसत्तेचा वापर समाजाच्या हितासाठी कसा करता येईल, याचा विचार केला पाहिजे,'' असे मत 'साप्ताहिक विवेक'चे संपादक रमेश पतंगे यांनी ८ नोव्हेंबर रोजी व्यक्त केले.

'सामाजिक समरसता मंच'च्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'समरसतेचे मानदंड'

लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून इंद्रेश उपस्थित होते. मंचाचे महानगर अध्यक्ष सुरेश नाशिककर, मधुकर व्हटकर, दादा इदाते, रमेश महाजन, प्रा. अशोक तांबे या वेळी उपस्थित होते.

'भटके विमुक्त विकास परिषदे'चा 'अण्णा भोई पुरस्कार' लक्ष्मण सुपनार व भारताबाई देवकर यांनी इंद्रेश यांच्या हस्ते देण्यात आला.

या वेळी समरतेचे मानदंड महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा व डॉ. हेडगेवार यांच्या प्रतिमा रवींद्र वंजारवाडकर (अध्यक्ष, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी), विकास काकतकर (उपाध्यक्ष, डेक्कन एज्युकेशन सोसायटी), अनिल कुलकर्णी (हिंगणे स्त्री शिक्षण संस्था), प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी अपंग कल्याणकारी संस्था, शिवराय प्रतिष्ठान यांना प्रदान करण्यात आल्या.

समाजजीवन समजून घेण्यासाठी महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा व डॉ. हेडगेवार यांचे जीवन समजून घेतले पाहिजे. इंद्रेश म्हणाले, ''मतांच्या राजकारणासाठी सत्ताधारी पक्ष दलित समाजाला आरक्षण देण्याचे आमिष दाखवून त्यांचे हक्क व सन्मानाची पायमल्ली करीत आहे. त्यासाठी घटनेच्या मार्गावर चालून सर्वसमावेक्षक आरक्षण देणे गरजेचे आहे.''

*** बालगीतांच्या व्हीसीडीचे प्रकाशन**

'स्वप्नात पाहिला राणीचा बाग
हत्तीच्या पाठीवर बसला नाग'

यासारख्या मुलांच्या भावविश्वाबरोबर 'अक्षरा'च्या नंदनवनाशी नाते जोडणाऱ्या कवितांच्या सादरीकरणाने विंदा करंदीकरांनी बालगोपाळांना अनोखी सफर घडविली.

'आर्या कम्युनिकेशन्स अँड व्हिडिओज' आणि 'संवाद, पुणे'तर्फे बालदिनानिमित्त ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांच्या 'विंदा आजोबांच्या कविता' या व्हीसीडीचे आणि डॉ. माधवी वैद्य यांच्या 'चट्टा-मट्टा' या बालकवितासंग्रहाचे प्रकाशन विंदांच्या हस्ते झाले. पुणेकर बालवाचकांतर्फे मृण्मयी मोघे, शिवानी महाजन आणि ईरा जोशी यांच्या हस्ते विंदांना मानपत्र प्रदान करण्यात आले. अर्ध्या तासाच्या मैफलीत विंदांनी एकामागोमाग एक अशा १५ कविता सादर केल्या आणि मुलांनी त्यांच्या काव्याचा आनंद लुटला. 'मावशी', 'बेडूक नावाचा विद्यार्थी', 'माकडाचे दुकान', 'भीमाचे जेवण', 'चिडविण्याचा मंत्र', 'बाताराम', 'गोगलगाय', 'अकलेचा कांदा', 'पतंग गुल करायचा मंत्र', 'पडसे न येण्याचा मंत्र', 'पहिल्या नंबरचा मंत्र' या कविता ऐकताना शब्दांची गंमत, विंदा आजोबांची शब्दफेक अनुभवत बालचमूने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

*** अनिमेशन स्टुडिओचे उद्‌घाटन**

काळाशी सुसंगत अभ्यासक्रम सुरू करण्याची 'सीमलेस ॲकॅडमी' ची दूरदृष्टी ही वाखाणण्यासारखी आहे, असे मत अभिनेत्री अमिषा पटेल यांनी २० ऑक्टोबर रोजी व्यक्त केले.

संस्थेच्या ॲनिमेशन स्टुडिओचे उद्‌घाटन पटेल यांच्या हस्ते झाले. दाजीकाका गाडगीळ, संस्थेचे उपाध्यक्ष सौरभ गाडगीळ, व्यवस्थापकीय संचालक केदार निगवेकर या वेळी उपस्थित होते. ॲनिमेशन स्टुडिओअंतर्गत राज्य कला केंद्राचे उद्‌घाटनही या वेळी पटेल यांच्या हस्ते झाले. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण निगवेकर हे या केंद्राचे अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत. सेनापती बापट रस्त्यावर नऊ हजार चौरस फुटांच्या आवारात ॲनिमेशन स्टुडिओ, तसेच शैक्षणिक केंद्र सुरू केले आहे. या वेळी पटेल यांच्यावर बनविलेली ॲनिमेशन फिल्म दाखविण्यात आली. या संस्थेत ॲनिमेशन, ब्रॉडकास्टिंग मीडिया, तसेच ज्वेलरी-जेमालॉजी हे अभ्यासक्रम सुरू आहेत. प्रास्ताविक व सूत्रसंचालन केदार निगवेकर यांनी केले.

*** 'मिस्टेरियस महाराष्ट्र'**

रुपेरी पडद्यावर खलनायक तसेच नायक अशी दुहेरी भूमिका साकारत असतानाच आपला 'भटकंती'चा छंद जोपासणारे, हिंदी आणि मराठीबरोबरच दक्षिणेकडील, तसेच भोजपुरी चित्रपटांमध्ये लोकप्रिय असलेले मिलिंद गुणाजी निसर्गावर लिखाण करण्यासाठीही प्रसिद्ध आहेत. शिवकालीन गड आणि किल्ले तर त्यांना नेहमीच खुणावत असतात. लवकरच त्यांचे 'मिस्टेरियस महाराष्ट्र' हे पुस्तक सादर होईल. 'गूढरम्य महाराष्ट्र' या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. या पुस्तकाचे इंग्रजी रूपांतर म्हणजेच 'मिस्टेरियस महाराष्ट्र'. वाईल्ड लाईफबाबत त्यांना आपुलकीची भावना वाटते. जंगलतोड करून आपण त्यांचा निवारा नष्ट केला आहे. त्यांचं घर आपण हिसकावून घेतल्यामुळेच वाघ वरचेवर वस्त्यांमध्ये फिरताना आढळतात आणि मरण ओढवून घेतात. त्यांचं रक्षण करणं गरजेचं आहे. सह्याद्रीतील जंगल जवळजवळ नष्ट झालं आहे.

*** 'पोस्ट मॉडर्न' लेखिका**

कमल देसाई यांनी १० नोव्हेंबरला ऐंशी वर्षे पूर्ण केली. रंग आणि रंग-२ हे दोन कथासंग्रह, काळा सूर्य, हॅट घालणारी बाई, रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग या कादंबऱ्या इतके मोजके साहित्य त्यांच्या नावावर आहे; पण आजही त्यांच्या नावाचा दबदबा कायम आहे.

कमलाबाई या अत्यंत 'आयसोलेटेड' वृत्तीच्या बाई आहेत. त्यांचं सगळं आयुष्य समाजाशी आणि स्वत:ला पडणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांशी झगडा करण्यात

गेलेलं आहे. त्यांची सगळी साहित्यसंपदा ही त्या झगड्यातून निर्माण झालेली आहे. आणि त्यातील प्रश्नांना खूप वेगवेगळी परिमाणं लाभलेली आहेत.

*** 'खाली जमीन वर आकाश'चा हिंदी अनुवाद**

डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी लिहिलेल्या आत्मकथेचा हिंदी अनुवाद 'नेम नॉट नोन' या नावाने राधाकृष्ण प्रकाशनामार्फत योजनाआयोगाचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते योजना भवनात प्रकाशित झाला. त्यावेळी प्रकाशक अशोक माहेश्वरी, महाराष्ट्र सदनच्या निवासी उपायुक्त नंदिनी आवडे, प्राचार्य प्रवीण चौगुले आदी उपस्थित होते. हा अनुवाद डॉ. गिरीश काशिद यांनी केला आहे.



**'खाली जमीन, वर आकाश' या आत्मकथेच्या 'नेम नॉट नोन' हिंदी अनुवादाचे प्रकाशन नवी दिल्ली येथे करताना डॉ. भालचंद्र मुणगेकर, हिंदी प्रकाशक अशोक माहेश्वरी व लेखक डॉ. सुनीलकुमार लवटे.**

मेहता पब्लिशिंग हाऊस मार्फत ही आत्मकथा 'खाली जमीन, वर आकाश' या नावाने २००६ मध्ये प्रकाशित झाली होती. तिचे आजवर गुजराथी, ब्रेल मध्ये अनुवाद प्रकाशित झाले आहेत. लवकरच इंग्रजी अनुवाद प्रकाशित होत आहे.

'खाली जमीन वर आकाश' या आत्मकथेस महाराष्ट्र फाऊंडेशन, महाराष्ट्र शासन, मेहता फाऊंडेशन यांचे पुरस्कार लाभले असून कोल्हापूर रेडिओवरून अभिवाचन झाले आहे. या आत्मकथेचा अंतर्भाव शिवाजी विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ यांनी आपल्या अभ्यासक्रमात केला.

*** बनावट पुस्तके व स्वामित्व हक्कासंबंधी मराठी प्रकाशक समिती स्थापन करणार**

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ व कॉपीराईट कौन्सिल, फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'पुस्तकासंबंधी कॉपीराईट व पायरसी' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले.

चर्चासत्राच्या उद्‌घाटनसत्रात ज्या प्रकाशकांच्या पुस्तकांच्या बनावट प्रती निघाल्या आहेत त्यांनी आपले अनुभव कथन केले.

ॲड. सुरेश नाईक व ॲड. कल्याणी पाठक यांनी स्वामित्व हक्क कायदा काय आहे, त्यातील कलमे, कायद्याचा भंग केल्यास शिक्षा या संदर्भात माहिती दिली. ज्येष्ठ प्रकाशक एस. के. घई यांनी कॉपीराईट कायद्याची अंमलबजावणी कशी होते, पुस्तकांच्या बनावट प्रती बाजारात आल्यावर दिवाणी व फौजदारी दावे दाखल करता येतात, अशी माहिती दिली. तसेच लेखक वा प्रकाशक यांच्यात करार करताना कोणत्या बाबींचा समावेश हवा, याबद्दल मार्गदर्शन केले..

पोलीस सहआयुक्त विनोद सातव यांनी पुस्तकांच्या बनावट प्रती निघाल्यानंतर प्रकाशक-लेखकांनी माहिती गोळा करून पोलिसांशी संपर्क साधणे तसेच या संदर्भात पोलिसांना कोणते अधिकार आहेत, याबद्दल माहिती दिली.

अनिल मेहता, रामचंद्र शेटे, दिलीप माजगावकर, शरद गोगटे यांनी पायरसी संदर्भात आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वास दास्ताने यांनी केले.

*** सातारा ग्रंथ महोत्सव - ९ ते १२ जानेवारी २००९**

यंदाच्या वर्षी सातारा ग्रंथ महोत्सवाला दशकपूर्ती होत आहे. सातारकरांचा प्रचंड प्रतिसाद या ग्रंथमहोत्सवाला मिळतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पुस्तकविक्री होते. दीड किलोमीटर लांबीच्या ग्रंथदिंडीने संपूर्ण शहरात उत्सवासारखे वाङ्‌मयीन वातावरण निर्माण होते. चारही दिवस नामवंतांची व्याख्याने, परिसंवाद, कविसंमेलन, विविध गुणदर्शन, लोककलादर्शन, वगैरे कार्यक्रम असतात. यंदाही ८० ग्रंथविक्रीचे स्टॉल असून चार दिवसाचे भाडे ४०००रुपये असेल. महोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. शंकर सारडा यांजकडे पुणे येथेही नाव नोंदणीसाठी संपर्क साधता येईल.

(ई-१० पाटील रिजन्सी, १५ एरंडवणे, कलिंग हॉटेल मागे, ऑफ कर्वे रोड, पुणे ४११ ००४. फोन - ९८२३२६१०२३)

*** जागतिक साहित्य उत्सव**

२३-२६ ऑक्टोबर दरम्यान मराठीतले ख्यातनाम कवी पद्मश्री नामदेव ढसाळ व उर्दू-पंजाबी-इंग्लिश भाषिक तथा जर्मनचे राजकवी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून शाहीर अमर शेख कला लोकनाट्य प्रबोधिनीतर्फे साहित्योत्सवाचे आयोजन करण्यात

आले होते.

स्कॉटलंडचे ज्येष्ठ लेखक रॉबिन लॉयड-जेम्स, आफ्रिकन-अमेरिकन कवी लॅमॉन्ट स्टेपटो, जॉर्ग फैसमन (जर्मनी), टोरील ब्रेके (नॉर्वे), सोनाटा पालिलुता, केरी शॉ-कीज (लिथुआनिया), पीटर पॅन्के (जर्मनी), जान-विल्हेम आंकर (हॉलंड) अशा विविध भाषक साहित्यिकांच्या तीन पिढ्यांचे प्रतिनिधी या उत्सवात सहभागी झाले होते. मराठीतील लक्ष्मण गायकवाड, प्रो. रतनलाल सोनाग्रा, प्रज्ञा दया पवार, प्रा. अनुराधा पाटील, अरुण म्हात्रे, अशोक नायगावकर, फरझाना व यशोधरा काटकर तसेच माणिकराव मुंढे (हिंदी), गोपीकृष्ण कुट्टूर (मल्याळम-इंग्लिश) हे कवीही सामील झाले. यशोधरा काटकर यांनी आपल्या 'थर्ड पर्सन' या कथासंग्रहातल्या 'परत' या कथेच्या काही भागाचे अभिवाचन केले. मराठी साहित्यातील दलित व स्त्रीसाहित्यावरची चर्चा परदेशी पाहुण्यांसाठी लक्षवेधी ठरली.

समारंभाच्या उद्‌घाटन सत्रात ज्येष्ठ हिंदी कवी अशोक बाजपेयी, नामदेव ढसाळ, नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर व महाराष्ट्राचे पुनर्वसन मंत्री पंतगराव कदम उपस्थित होते. तर समारोपासाठी गुजराथी लेखक सीतांशू यशश्चंद्र उपस्थित होते.




**२३-२६ ऑक्टोबर दरम्यान मुंबई येथे जागतिक साहित्य उत्सव साजरा झाला त्यावेळी भाषण करताना यशोधरा काटकर. उजवीकडून पहिले नामदेव ढसाळ.**

❐

# नवे कोरे




## नोबेल ललना

मीरा सिरसमकर

**१२०रु.** पोर्स्ज २५ रु.

आपल्या अंतर्मनात लागलेल्या प्रकाशाच्या शोधाने उजळणाऱ्या या चौतीस स्वप्रकाशरुपा. प्रत्येकीचे कार्यक्षेत्र वेगळे. प्रत्येकीचे कर्तृत्व वेगळे; परंतु कर्म हीच तृप्ती हा समाधानाचा मंत्र जपल्यामुळे आंतरिक शांती, आत्मविश्वास आणि आनंद त्यांतील प्रत्येकीलाच लाभलेला .

जगातील सर्वोच्च समजला जाणारा नोबेल पुरस्कार त्यांना मिळाला खरा; पण त्यांनी पाहिलेल्या स्वप्नांकडे आणि ध्येयाकडे वाटचाल करणारा त्यांचा प्रवास कोणत्याही पुरस्काराच्या क्षितीजापार होता.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.



# दखल

## ● गुगलचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प : गुगल बुक सर्च

इंग्रजीतील कुठल्याही पुस्तकाची माहिती हवी असेल, त्यातील मजकूराची वानगी बघायची असेल तर तुम्हाला 'गुगल बुक सर्च' या वेबसाइटचा उपयोग होऊ शकेल.

गेल्या तीन वर्षात या वेबसाईटने २० हजार प्रकाशकांच्या लक्षावधी पुस्तकांची माहिती संकलित केली असून ती या वेबसाइटद्वारे उपलब्ध करून दिली आहे.

गेल्या अनेक शतकात लिहिले गेलेले साहित्य वेगवेगळ्या ग्रंथालयात संदर्भासाठी जतन करून ठेवण्यात आले आहे. ते त्या ग्रंथालयात समक्ष न जाताही आपण गुगल बुक सर्चद्वारे घरबसल्या मिळवू शकतो. तेही फुकटात. (अर्थात इंटरनेट ब्रॉडबँडचे शुल्क तासाला आठदहा रुपये लागणारच!) त्यामुळे ही वेबसाइट फारच वाचकप्रिय ठरली आहे. मायक्रोसॉफ्टने 'लाइव्ह सर्च बुक' नावाने सुरू केलेली वेबसाइट गुगलपुढे टिकाव धरू शकली नाही. त्यामुळे 'फ्री ऑनलाइन-फुल-टेक्स्ट-सर्चेबल टूल' म्हणून गुगलने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. ॲमेझॉन डॉट कॉमची 'सर्च इनसाइड द बुक' ही वेबसाइट ही अशाच प्रकारे काम करते. प्रत्यक्ष पुस्तक विकत घेण्यापूर्वी त्यातील मजकूर चाळून पाहता यावा आणि नंतर ते पुस्तक विकत घ्यायचे की नाही हे ठरवता यावे या दृष्टीने ही सोय महत्त्वाची ठरते. वाचकाला ते पुस्तक विकत घ्यावेसे वाटले तर बुकसेलरच्या किंवा प्रकाशकाच्या वेबसाइटवर जाऊन विकत घेण्यासाठी ऑर्डर नोंदवता येते आणि क्रेडिटकार्डद्वारे पैसे चुकते करून ते पुस्तक कुरियरद्वारे घरपोच मिळू शकते.

गुगल बुक सर्चद्वारे पुस्तकातील मजकूर उपलब्ध करून दिला जातो, तो अनेकदा 'कॉपीराइट' कायद्याखालील पुस्तकातील असू शकतो. कॉपीराइट असणाऱ्या पुस्तकातील जास्तीत जास्त २०

टक्के भाग उद्‌धृत करता येतो किंवा झेरॉक्स करता येतो. प्रकाशक आणि बुकसेलर यांच्या संमतीने अशा पुस्तकातील संपूर्ण मजकूरही या वेबसाइटवर देण्यात येतो. वाचक संपूर्ण पुस्तक वेबसाइटवर वाचण्याऐवजी ते पुस्तकच गरज असेल तर विकत घेणे पसंत करतो.

ऑनलाइनवर संपूर्ण पुस्तक वाचणे हा प्रकार अजूनही डोळ्यांना शीण आणणारा वाटतो. एरव्ही पुस्तकाच्या दुकानात गेल्यावरही वाचक मुखपृष्ठ आणि ब्लर्बवरील मजकूर एवढेच काय ते बघतो. थोडेफार पुस्तक चाळतो. नाही का? त्यापेक्षा गुगलवर जास्त मजकूर बघता येतो. त्यामुळे गुगल बुक सर्च ही वेबसाइट चोखंदळ वाचकांना विशेष प्रिय झाली आहे. गुगलच्या आकडेवारीवरून एखादे पुस्तक बरेचसे चाळून झाल्यावर ही विकत घेण्याची प्रवृत्ती वाचक अधिक दाखवतात असे दिसून येते. गुगलमुळे पुस्तकांच्या विक्रीत वाढ होत आहे हे लक्षात आल्याने प्रकाशक आणि ग्रंथालये आपली पुस्तके गुगल बुक सर्चच्या योजनेत देण्यासाठी उत्सुक असतात असाही एकूण अनुभव आहे. काही वाचकांनीच गुगलला सुचवले आहे की या वेबसाइटवर पुस्तक डाऊनलोड करताना अधूनमधून ''पुस्तक वाचताय याबद्दल धन्यवाद. पण ही काही लायब्ररी नाही... पुस्तक विकत घ्या आणि मनसोक्त वाचा'' अशा सूचनाही टाका.''

गुगलने ही वेबसाइट तयार करण्यासाठी खूप परिश्रम घेतले आणि प्रदीर्घ पूर्वतयारी केली आहे.

गुगल या कंपनीची स्थापना १९९६ मध्ये म्हणजे १२ वर्षापूर्वी झाली. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीमध्ये डिजिटल लायब्ररी टेक्नॉलॉजी प्रोजेक्टवर संशोधन करणाऱ्या सर्जी ब्रिन आणि लॅरी पेज यांनी डिजिटल लायब्ररीद्वारे भविष्यकाळात उपलब्ध सर्व आणि नवीन पुस्तके बघता यावीत, त्यातील मजकूराची सूची वा वर्गीकृत यादी कोणालाही बघता यावी असे उद्दिष्ट ठरवून 'वेब क्रॉलर' तयार करण्यासाठी संशोधन कार्य सुरू केले. तसा वेब क्रॉलर प्रोग्रॅम त्यांनी तयार केला आणि त्याला 'बॅकरब' हे नाव दिले. गुगलची स्थापना त्यांनी केली आणि या प्रोग्रॅमला व्यापक स्वरूप देण्याचे ठरवले. जगातील कोणतेही पुस्तक घरबसल्या कोणाही वाचकाला मोफत बघता यावे, त्यातील मजकूर वाचता यावा असे उद्दिष्ट मनात असले तरी ते प्रत्यक्षात आणणे महाकठीण होते. पुन्हा हे सर्व करताना गुप्तताही पाळण्याची गरज होती. प्रतिस्पर्धी कंपन्यांना त्याची बातमी लागली असती तर त्या कल्पनेचे वेगळेपण हरपले असते.

गुगलच्या काही कर्मचाऱ्यांची एक टीम या प्रकल्पावर काम करू लागली.

अमेरिकेतील सर्वांत मोठी लायब्ररी ऑफ काँग्रेस; तिने अमेरिकन मेमरी प्रोजेक्ट गुटेनबर्गद्वारे दहा लाख पुस्तकांचा प्रकल्प हाती घेतला होता. लॅरी पेजने या प्रकल्पाच्या प्रमुखांची भेट घेतली. मिशिगन युनिव्हर्सिटीतील ग्रंथालय डिजिटायझेशनमध्ये

त्यावेळी अग्रेसर होते. या ग्रंथालयातील ७० लाख ग्रंथांचे डिजिटायझेन व्हायला १००० वर्षे लागतील असे युनिव्हर्सिटीच्या प्रेसिडेंट मेरी स्यू कोलमन यांनी म्हटले तेव्हा लॅरी पेजने त्यांना सांगितले, ''मी हे काम सहा वर्षात करून दाखवीन.'' या टीमने ॲरिझोनामधील एका धर्मादाय ग्रंथजत्रेला भेट देऊन स्कॅनिंगबाबत प्रयोग करायला पुस्तके मिळवली. स्कॅनिंग करताना पाने सारखी उलटावी लागतात. त्यामुळे पुस्तके फाटतात. नाजूक रीतीने पण पुस्तकाची हानी न होता जलद वेगाने स्कॅनिंग शक्य व्हावे म्हणून अनेक प्रयोग केले.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतील बॉडलेइयन लायब्ररी चारशे वर्षे जुनी. शेक्सपियर वगैरे लेखकांची पुस्तके - वर्षानुवर्षे कोणीही न हाताळलेली. तेथील लायब्ररीयनने गुगलला आपली सर्व पुस्तके डिजिटायझेशनसाठी देण्याची ऑफर दिली. २००४ मध्ये गुगल प्रिंट लायब्ररी प्रोजेक्ट सुरू झाला. फ्रँकफर्ट ग्रंथ जत्रेत त्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररी, ऑक्सफर्ड, स्टॅनफोर्ड या तीन ग्रंथालयांमध्ये दीड कोटी पुस्तके होती. त्याशिवाय युरोपमधील अनेक देशांनी आणि शेकडो प्रकाशकांनी गुगलशी सहकार्य करायचे ठरवले. लायब्ररी ऑफ काँग्रेसला वर्ल्ड डिजिटल लायब्ररी या प्रकल्पासाठी गुगलने ३० लाख डॉलर्सची देणगी दिली. या प्रकल्पातील पुस्तके जगभर ऑनलाइन उपलब्ध होणार होती. या लायब्ररीतील ऐतिहासिक महत्त्वाच्या पुस्तकांचे डिजिटायझेशन करण्याचे कामही गुगलने सुरू केले. 'गुगल प्रिंट'चे 'गुगल बुक सर्च' असे नामाकरण करण्यात आले...

लेखक, प्रकाशक, विक्रेते या सर्वांनाच गुगलच्या प्रकल्पाचा फायदा होत आहे. गुगलला मिळणाऱ्या जाहिरातीतून या प्रकल्पाचा खर्च भरून काढला जातो. जगातील ग्रंथरूपी धनाचे हे सर्वांत मोठे भांडार चिरस्थायी व्हावे, सांस्कृतिक संचित सर्वांना लाभावे या गोष्टीला फार महत्त्वपूर्ण स्थान आहे.

## ● बक्षीस नसलेली कादंबरी लेखनाची अभिनव स्पर्धा

नोव्हेंबर महिन्यात करायच्या कामात 'कादंबरी लेखन' हे एक काम आता नव्याने समाविष्ट झाले आहे, हे आमच्या वाचकांना सांगताना आनंद वाटतो. आपल्याला खूप वेळा लिहावेसे वाटते, परंतु प्रत्यक्षात बैठक मारून लिहायला बसणे जमत नाही. त्यामुळे लिहिण्याची इच्छा अपुरीच राहते. अशा लोकांना लेखनासाठी, तीही फुटकळ लेखासाठी नव्हे तर कादंबरीसारख्या गंभीर प्रदीर्घ लेखनासाठी प्रेरणा द्यावी म्हणून एक आंतरराष्ट्रीय प्रकल्प चालवण्यात येत आहे. त्याचे नाव नॅशनल नोव्हेंबर रायटिंग मंथ. नॅनोरायमो असे संक्षिप्त नाव. १९९९ साली हा प्रकल्प अमेरिकेत सुरू झाला. क्रिस बॅटी याने त्याचा आरंभ केला. त्यावर्षी २१ कादंबरीकारांनी नोव्हेंबरमध्ये आपल्या कादंबऱ्या लिहून पूर्ण करून या स्पर्धेत भाग घेतला. त्यामुळे हा उपक्रम पुढेही चालू ठेवण्यात आला. या कादंबरी लेखन

महिन्यात पूर्ण होणारी कादंबरी किमान ५० हजार शब्दांची म्हणजे २०० पृष्ठांची तरी असावी अशी अट आहे. ही अट पूर्ण करणाऱ्या स्पर्धकाला ऑनलाइन प्रशस्तिपत्र मिळते. वेगळे बक्षीस वगैरे काही मिळत नाही. परंतु आपण कादंबरी लिहिण्याचे आव्हान स्वीकारले आहे आणि ते एका महिन्यात पूर्ण करण्याचा आपला निर्धार आहे हे या स्पर्धेद्वारे सिद्ध करायचे असते. ज्यांना लेखनाचा सराव नाही त्यांना हे आव्हान स्वत:चीच परीक्षा घेण्यास प्रवृत्त करते आणि ज्यांना हे आव्हान पूर्ण करता येते त्यांचा आत्मविश्वास दृढ होतो. हा आत्मविश्वास निर्माण होणे हाच या कादंबरी लेखन स्पर्धेचा खरा पुरस्कार असतो. या कादंबऱ्या प्रकाशित करण्यासाठी आयोजक काहीही मदत करीत नाहीत. स्वत: लेखकानेच याबाबत हालचाल करावी अशी अपेक्षा असते. कादंबरी प्रकाशित व्हायलाच हवी असा अट्टाहास नसावा. लेखनातला आनंद हाच खरा अंतिम असेही या स्पर्धेद्वारे लेखकाच्या मनावर बिंबवले जाते. या ऑनलाइन स्पर्धेत २२५ भारतीय लेखकही भाग घेत आहेत. निखिल लोंढे, रोही शेट्टी वगैरे पुणेकर स्पर्धकही त्यात आहेत. इंग्रजीत लिहिणाऱ्यांसाठी ही स्पर्धा आहे. कोणीतरी मराठीसाठी हा असा एखादा उपक्रम सुरू करायला हवा. स्पर्धेच्या निमित्ताने नवोदित लेखकांच्या सुप्त प्रतिभेला आव्हान मिळू शकते आणि त्यातून चांगले लेखक पुढे येऊ शकतात. परंतु लेखक म्हणून मान्यता मिळवण्याऐवजी एक गंमत म्हणून या स्पर्धेत घेणेही श्रेयस्कर ठरेल.

या स्पर्धेत तुम्हाला भाग घ्यायचा आहे का? Na No Wri Mo.org आणि पटकथा लेखनासाठी www.scriptfrenzy.org या वेबसाइटवर संपर्क साधा.

The Office of Letters and Light या ऑकलँड (अमेरिकेतील) संस्थेतर्फे या स्पर्धेचे आयोजन होते.

## ● राजगडच्या पायथ्याशी साहित्य संमेलन

विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या घोषणेमुळे की काय, दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारी बरीच छोटी जिल्हा पातळीवरची किंवा दलित, आदिवासी, ग्रामीण, विद्रोही वगैरे साहित्य संमेलने यावर्षी झालेली दिसत नाहीत. परंतु काही नवीनच साहित्य संमेलने घेण्यासाठी नव्या दमाचे साहित्यप्रेमी कार्यकर्ते पुढे येऊन ती त्रुटी भरून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत.

अशाच नव्या प्रातिभ साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष बनण्याचा योग मला लाभला.

हे संमेलन उपस्थितीच्या दृष्टीने छोटेखानीच होते; परंतु ते एका अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी भरले होते; थेट राजगडच्या पायथ्याशी. एक उंच टेकडीवरच्या पठारावर. भाटघर धरणाच्या जलाशयाच्या सान्निध्यात! पुण्यापासून साठ किलोमीटरवर असणाऱ्या धुक्याने सदासर्वदा अवगुंठित असलेल्या मिस्टी व्हॅलीमधील ह्या

पठारावर तसे म्हटले तर काही व्यवस्था नाही. वीज आहे. टाकीचे पाणी आहे एवढेच! दोन शेडवजा घरे आणि स्वच्छतागृहे आहेत. त्यामुळे पिकनिकला येणाऱ्यांना थोडाफार निवारा... तर अशा ठिकाणी लेखककवींनी यावे; शिवरायांच्या साम्राज्याची राजधानी असणाऱ्या राजगडाच्या पराक्रमी परिसरात आपल्या प्रतिभेला सोनेरी झळाळी आणावी, निसर्ग विभ्रमांनी आपल्या कल्पनाशक्तीला गगनचुंबी झेप घेऊ द्यावी या विचाराने मिस्टी व्हॅलीचे प्रवर्तक बिल्डर डॉ. सुनील थिगळे यांनी येथे 'प्रातिभ साहित्य संमेलन' भरविण्याचा घाट घातला. अशा प्रकारचा त्यांचा हा पहिलाच उपक्रम; त्यामुळे त्याचे स्वरूप आटोपशीर ठेवले. पिकनिक, मेळावा असे न म्हणता साहित्य संमेलन असे म्हणण्यात त्यांच्या दूरदर्शीपणाचा भाग जास्त म्हणायला हवा. भविष्यकाळाचे चित्र त्यांच्यासमोर असावे. साठसत्तर रसिकांच्या उपस्थितीतले हे साहित्य संमेलन; पण त्यातले कार्यक्रम हे मिनी साहित्य संमेलनाच्या दृष्टीने जराही कमी नव्हते. पुस्तक प्रकाशन, पाहुण्यांचा परिचय, कविसंमेलन, गझल सादरीकरण, अभिवाचन, कथाकथन, एकपात्री प्रयोग अशी विविधता त्यात होती.

या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी होते. उद्घाटक डॉ. आनंद पाटील. स्वागताध्यक्ष शंकर सारडा. तिघेही समीक्षक. त्यामुळे वाङ्मयीन विचारमंथन मूलगामी झाले. साम्यवाद, स्त्रीवाद, देशीवाद वगैरे वादांच्या आहारी जाऊन जे साहित्य निर्माण होते ते गुणवत्तेत, कसदारपणात कमी पडते. हे वाद समाजशास्त्रीय संकल्पनांवर आधारित असतात. त्यामुळे ते साहित्याला, ललित साहित्याला जसेच्या तसे लागू पडत नाहीत. प्रचारकी साहित्य हे अभिजात असूच शकत नाही असा विचार डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी मांडला. डॉ. आनंद पाटील यांनी साहित्यातील आणि समीक्षेतील उत्तर वासाहतिक व आधुनिकोत्तर संकल्पनांचा ऊहापोह करीत आस्वादक समीक्षेच्या मर्यादा स्पष्ट केल्या. प्रत्येक पुस्तक ही एक युद्धभूमी असते; लेखन ही एक दहशतवादी कृती असते. पारंपरिक मूल्यांची जपणूक करण्यासाठी दहशतवादी इतरांना दडपून त्यांचा आवाज बंद करू पाहतात, असे विचार त्यांनी मांडले. प्रदीप निफाडकर यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले. शंतनू चिंधडे, ज्योत्स्ना चांदुगडे, आशिष केसकर, मीन बाठे, स्वाती सामक, संजीव ठकार वगैरेंनी कविता सादर केल्या...

अशी मिनी संमेलने सर्वत्र साजरी झाली तर वाङ्मयीन अभिरूची आणि वाचन संस्कृती यांची अभिवृद्धी होऊ शकेल.

## ● कादंबरीला पाच लाखांचा मान एशियन पुरस्कार

दि मॅन एशियन लिटररी प्राइझ गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आले आहे. आशियातील लेखकांचे वाङ्मयीन क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण ठरत आहे याची जाणीव ठेवून मान बुकर प्राइझच्याच प्रायोजकांनी इ. स. २००७पासून या नव्या

पुरस्काराची घोषणा सुरू केली आहे. या पुरस्काराची रक्कम दहा हजार डॉलर्स (पाच लाख रुपये) असून त्यासाठी अप्रकाशित कादंबऱ्याही ऑनलाइन पाठवता येतात हे त्याचे वैशिष्ट्य आहे. पहिल्याच वर्षी २४३ नवोदित कादंबरीकरांनी या स्पर्धेसाठी पुस्तके पाठवली होती. त्यातील ११ कादंबरीकार भारतीय होते. लक्षात घ्यायला हवे ही पुस्तके इंग्रजीत प्रसिद्ध झालेली असता कामा नयेत अशी महत्त्वाची अट स्पर्धेसाठी भाग घेण्यासाठी असते. इतर भाषांमध्ये प्रसिद्ध झाली असल्यास स्पर्धेत भाग घेता येतो.

तुलसी बद्रीनाथ (द लिव्हिंग गॉड), संजय बहादुर (दि साऊंड ऑफ वॉटर), कंकणा बसू (कॉप्युचिनो डस्क), संजीव बटाला (इनजस्टिस), सैकत चक्रवर्ती (दि ॲम्नेसिॲक), रीती गाडेकर (फॅमिलीज ॲट होम), एन. एस. माधवन (लिटॅ नीज ऑफ डच बॅटरी), लक्ष्मी नारायण मिश्रा (दि लिटल गॉड), नलिनी राजन (दि पँगोलिन्स टेल), श्रीकुमार वर्मा (मरियाज् रूम), अनुराधा विजयकृष्ण (सी इंग द गर्ल) या भारतीय लेखकांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. पाकिस्तान, फिलिपाइन्स, श्रीलंका, म्यानमार, जपान, चीन, हाँगकाँग, तैवान, मलेशिया या देशातील स्पर्धकही यामध्ये सहभागी होते.

या स्पर्धेचे आयोजन मान हाँगकाँग इंटरनॅशनल लिटररी फेस्टिव्हल, हाँगकाँग युनिव्हर्सिटी, चायनीज् युनिव्हर्सिटी ॲट हाँगकाँग यांच्यातर्फे होते. लंडनस्थित मान ग्रुप त्याचा आर्थिक भार वाहते.

ऑक्टोबरमध्ये अंतिम फेरीतील पाच पुस्तकांची शॉट लिस्ट जाहीर केली जाते. १० नोव्हेंबर रोजी अंतिम पुरस्काराची घोषणा केली जाते.

इ. स. २००८ च्या अंतिम शॉर्टलिस्टमध्ये कावेरी नंबिसान आणि सिद्धार्थ धनवंत संघवी (दि लॉस्ट फ्लॅमिंगोज् ऑफ बाँबे) या भारतीयांच्याबरोबर मिगेल सायजुको (इलेस्ट्रो) यू हुआ (ब्रदर्स) आणि आल्फ्रेड युसॉन (दि म्युझिक चाइल्ड) यांचा समावेश होता.

फिलीपिनो लेखक मिगेल सायजुको याच्या इलेस्ट्रो या पहिल्याच कादंबरीने यंदाचा पुरस्कार मिळवला.

इ. स. २००७चा पुरस्कार वूल्फ टोटेम या कादंबरीबद्दल जुआंग रोंग याला मिळाला होता. सांस्कृतिक क्रांतीच्या लढ्याच्या पार्श्वभूमीवरील या चिनी कादंबरीच्या २० लाख प्रती अल्पावधीतच विकल्या गेल्या; आणि पायरेटेड प्रतीही त्यापेक्षा जास्त निघाल्या असे सांगण्यात येते. पेंग्विन ग्रुपने इंग्रजी अनुवाद गतवर्षी प्रसिद्ध केला.

मुंबई राहणाऱ्या सिद्धार्थ संघवी यांची दि लास्ट साँग ऑफ डस्क (२००४) ही पहिली कादंबरी लक्षवेधक ठरली होती. त्या कादंबरीला बंटी ट्रास्क ॲवार्ड आणि प्रिमिओ ग्रिंझाने कॅव्हर ही बक्षीसे मिळाली होती. संघवीचा समावेश इंडिया टुडेने ५०

सर्वांत जास्त प्रभावी व्यक्तींमध्ये केला होता.

कावेरी नंबिसान या शस्त्रक्रियातज्ज्ञ असून बिहार, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक राज्यात त्यांनी वैद्यकीय सेवा केली आहे. मँगो कलर्ड फिश, दि सेंट ऑफ पेप्पर, दि हिल्स ऑफ अंगेरी, दि ट्रुथ (आलमोस्ट) अबाऊट भारत, ऑन वुइंग्ज ऑफ बटरफ्लाइज् ही त्यांची पुस्तके पेंग्विन इंडियाने प्रकाशित केली आहेत.

'दि स्टोरी दॅट मस्ट नॉट बी टोल्ड'मध्ये चेन्नईत एका गृहनिर्माण सोसायटीत राहणाऱ्या सायमन जेसकुमार या वयस्कर विधुराची जवळच्याच झोपडपट्टीतल्या एका तरुण मुलीशी मैत्री होते आणि तिच्याबरोबर त्याची घसट वाढते. तिच्याबरोबर तो प्रवासाला जातो; परंतु झोपडपट्टीतील दादा त्याला गाठून त्याचा छळ करतात असे दाखवले आहे.

## ● 'देशद्रोही' पुरस्कारांवर हल्ला

बुकर पुरस्कर विजेता कादंबरीकार अरविंद अडिगा यांनी आपल्या वाङ्मयीन एजंटाला डच्चू दिला आहे. त्याने बुकर पुरस्काराच्या दृष्टीने मोर्चेबांधणी केल्याचे श्रेय स्वत:कडे घेण्याचा प्रयत्न केला असा अरविंद आडिगांनी आरोप ठेवला आहे. प्रत्यक्षात त्यासाठी त्याने काहीही केले नाही असे अडिगांचे म्हणणे आहे.

अरविंद अडिगा यांच्या दि व्हाइट टायगर या कादंबरीने बुकर पुरस्काराचा मान मिळवल्यावर तिला प्रचंड मागणी आहे. त्यामुळे बेस्टसेलर्सच्या यादीत तिला सर्वोच्च स्थान मिळाले आहे.

भारताच्या दारिद्र्याचे अभद्र आणि धक्कादायक प्रदर्शन करून अरविंद अडिया यांनी बुकर पुरस्कार मिळवला आहे असा आरोप दीपंकर सरकार या बंगाली समीक्षकाने केला आहे. भारतातील गरिबीचे भांडवल करून परदेशी वाचकांची करमणूक करणे हे लज्जादायक कृत्य आहे असा हल्ला त्यांनी चढवला आहे. भारतातील दारिद्र्याचे अतिरंजित चित्र रेखाटणे हे देशद्रोहाचे कृत्य मानावे असे त्यांचे मत आहे.

बुकर पुरस्कार हा देशविरोधी आहे अशी टीका हिंदी लेखक नरेंद्र कोहली यांनी केली आहे. इंग्लिशमध्ये लिहिणारे भारतीय लेखक देशाची बदनामी करण्यात आघाडीवर असतात. सलमान रश्दी, अरुंधती रॉय, अरविंद अडिगा या सर्वांनी भारताचे विकृत चित्र परदेशी वाचकांपुढे चितारून भारताला काळिमा फासला आहे. प्रादेशिक भाषांतील कनिष्ठ लेखकांपेक्षा या इंग्लिश लेखकांनी खालची पातळी गाठली आहे; भारताची बदनामी करणे, भारताची प्रतिमा विकृत स्वरूपात मांडणे हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवण्याचा राजरोस मार्ग बनला आहे याबद्दल कोहली यांनी खेद व्यक्त केला आहे. अशा बदनामीकारक पुस्तकांत वाङ्मयीन कौशल्याचा मागमूसही नसतो असेही त्यांनी म्हटले आहे.

**शंकर सारडा**

# पुस्तक परिचय

विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी
तरुणाईला प्रेरणा देणारी जीवनसूत्रे

## अदम्य जिद्द

**डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम**
**अनु. सुप्रिया वकील**



**भा**रताचे राष्ट्रपती म्हणून डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची कारकीर्द विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राला प्रोत्साहक ठरली. नुकताच चंद्रावर यान पाठवण्याचा आपला जो यशस्वी प्रयत्न झाला त्याची तयारी गेली काही वर्षे चालू होती. एखादा शास्त्रज्ञ वा नवतंत्रज्ञानाचा जाणकार सत्तेच्या उच्चस्थानावर असला म्हणजे असे धाडसी निर्णय घेणे सोपे जाते.

राष्ट्रपती म्हणून डॉ. कलाम देशभर संचार करीत राहिले आणि बालतरुणवर्गाला नवविचारांची आणि काहीतरी अभूतपूर्व करून दाखवण्याची प्रेरणा देत राहिले. इ. स. २०२० मधील भारताचे प्रगत महासत्तेचे स्वप्न बघण्यास त्यांनी युवा पिढीला प्रवृत्त केले आणि त्यांच्या जिद्दीला, पराक्रमाला साद घातली. त्यांची मने प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला. डॉ. कलाम यांचे आत्मचरित्र, त्यांचे प्रगत भारताचे स्वप्न यांना मोठा वाचकवर्ग लाभला. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला उद्देशून भाषण करणे, शिक्षक दिनानिमित्त दरवर्षी पुरस्कार प्रदान सोहळ्यात शिक्षणविषयक प्रकट चिंतन करणे, शंकर आंतरराष्ट्रीय बालस्पर्धेच्या विजेत्यांना पुरस्कार देणे, दिल्ली बुक फेअरचे उद्‌घाटन करणे, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण करणे वगैरे निमित्तांनी डॉ. अब्दुल कलाम संबंधित विषयांवर आपली मते प्रकट करीत राहिले. संगीत नाटक अकादमी, रामकृष्ण मिशन, बंगलोर गायक समाज, विश्वभारती विद्यापीठ, सत्यसाई आंतरराष्ट्रीय केंद्र, दुबई इंडियन हायस्कूल, जैन विश्व भारती संस्था, कोलकत्ता अरविंद भवन, राज्यपाल परिषद, काझी कोडे वेद व्यास विद्यालय, पुणे प्रीत मंदिर, डेहराडून स्कूल, डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया पोर्टल, भारत स्काऊट आणि गाइड, विश्वभारती, सतीश धवन अवकाश केंद्र, लघुउद्योजक परिषद, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, जादवपूर विद्यापीठ अशा अनेक संस्थांना त्यांनी भेटी दिल्या. त्या संस्थांच्या कामगिरीच्या निमित्ताने आपले विचार मांडले. विविध विषयांवरील विचारधनाचे वर्गीकरण करून 'अदम्य जिद्द' या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

स्फूर्तिदायी व्यक्तित्वे, शिक्षक, शिक्षण अभियान, सर्जनशीलता आणि नवउपक्रम, कला आणि साहित्य, चिरंतन मूल्ये, विज्ञान आणि अध्यात्म, उद्याचे नागरिक, स्त्रियांचे सबलीकरण, ज्ञानसंपन्न समाज, सुजाण नागरिकत्व, नेतृत्व, भारताचे भवितव्य, अदम्य जिद्द अशा ढोबळ विषयांच्या अनुषंगाने सुमारे २०० भाषणांतील विचारांचे संकलन करून हे पुस्तक सिद्ध झाले आहे. डॉ. अब्दुल कलाम यांच्या चिंतनशील प्रकृतीचे आणि भारताच्या सर्वांगीण विकासाच्या तळमळीचे दर्शन या पुस्तकात घडते. शिक्षण, विज्ञान, कला, स्त्रीशक्ती, युवापिढी, ज्ञानसंपन्न समाज, नेतृत्व, हे विषय त्यांच्या चिंतनविषयात अग्रगण्य आहेत. मानवी जीवनावर मूलभूत श्रद्धा असणारा द्रष्टा माणूस देश घडवू शकतो असा ठाम विश्वास यामुळे

त्यांचा दृष्टिकोन सदैव सकारात्मक आणि विधायक राहिला आहे.

स्फूर्तिदायी व्यक्तित्वे आणि माझे शिक्षक या पहिल्या दोन प्रकरणातून डॉ. कलाम यांनी आपल्यावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींची कृतज्ञतापूर्वक नोंद केली आहे.

दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा सर्व वस्तूंची चणचण सुरू झाली. दहा वर्षे वयाच्या शाळकरी कलाम यांनाही तिची झळ पोचली. रामेश्वरचे हे एक एकत्र कुटुंब. आजी, आई-वडील, चुलते... मोठेच खटले. दहा वर्षाच्या कलाम यांना पहाटे चारला उठून आंघोळ करून गणिताच्या शिकवणीला जावे लागे. नंतर स्टेशनवर जाऊन दैनिकांचे पार्सल आणावे लागे. घरोघर दैनिक टाकून घरी येऊन आठ वाजता न्याहारी. नमाज पढणे, अरबी शाळेत कुराण शरीफचे पठण. आईचे संस्कार. आई ही त्यांना प्रेमाचे, सहृदयतेचे मूर्तिमंत रूप वाटे. दैवी स्त्री वाटे.

कर्नाटकी संगीताच्या अध्वर्यू एम. एस. सुब्बलक्ष्मी यांच्या संगीतावर १९५०पासून कलाम लुब्ध. त्यागराज महोत्सवात त्यांनी सुब्बलक्ष्मींचे गायन प्रथम ऐकले. ते सूर त्यांच्या काळजाला भिडले. ते सुब्बलक्ष्मींचे कायमचे फॅन झाले. १९९८ साली सुब्बलक्ष्मींना भारतरत्न देण्याचा योग त्यांना लाभला. सुब्बलक्ष्मींनी डॉ. कलाम यांच्या मस्तकावर हात ठेवला. हा आयुष्यातला सर्वोत्तम क्षण असे डॉ. कलाम नमूद करतात.

रामेश्वरचे शिक्षक श्रीशिव सुब्रमणीय अय्यर यांनी त्यांना एकदा वर्गात पक्षी कसे उडतात हे सांगितले. ''पण ते मला नीट कळले नाही.'' असे कलाम म्हणाले. अय्यर यांनी त्यांना समुद्रकिनाऱ्यावर नेऊन पक्षी दाखवले. त्यांच्या पंखांची उडताना हालचाल कशी होते ते दाखवले. एरॉनॉटिकल इंजिनिअर व्हायचे असे त्याचवेळी कलाम यांनी ठरवले. रॉकेट इंजिनिअरिंग, एरोस्पेस इंजिनिअरिंग, हॉवरक्राफ्ट निर्मिती, क्षेपणास्त्र निर्मिती या सर्वांचे मूळ शिक्षकांच्या त्या शिकवण्यातून रुजले. सेंट जोसेफ कॉलेजमधील प्रा. कॅल्क्युलस श्रीनिवासन, प्रा. तोताद्री अय्यंगार यांचाही प्रभाव त्यांच्यावर पडला.

डॉ. विक्रम साराभाई, डॉ. सतीश धवन, प्रा. एम. जी. के. मेनन, डॉ. राजा रामण्णा, प्रो. ब्रह्मप्रकाश हे सर्व शास्त्रज्ञ त्यांचे सहकारी तसेच गुरुजन. डॉ. धवन यांनी त्यांना हॉवरक्राफ्टसाठी कॉन्ट्रा रोटेटिंग प्रॉपेलर कसे बनवावे, त्याचे डिझाईन कसे करावे यावर मार्गदर्शन केले. प्रॉपेलरसाठी लागणारे एक विशिष्ट द्रव्य त्यांना मिळवून दिले. त्यांच्या मदतीने सँडविच बांधणीचे आणि असेंब्लीचे तंत्र वापरून प्रॉपेलरची निर्मिती करण्यात आली. डॉ. कलाम यांच्या भावी प्रगतीचा पाया या प्रॉपेलर निर्मितीने घातला. गुरू शिष्याला भव्यदिव्य स्वप्ने देतो. शिष्यात आत्मविश्वास आणि जिद्द निर्माण करतो.

प्रा. तोताद्री अय्यंगार यांनी आर्यभट्ट, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त आणि रामानुजम

या गणिततज्ज्ञ व खगोलशास्त्रज्ञांची माहिती दिली. त्यातूनही कलाम यांना प्रेरणा मिळाली.

विशिष्ट क्षेत्रात पाया रोवून भरघोस कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींबद्दल डॉ. कलाम यांना आदर, आपुलकी वाटते. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना आस्था वाटते. या पुस्तकात त्यांचे उल्लेख जागोजाग येतात.

पाच वर्षांच्या अवधीत डॉ. कलाम हे देशातील दहा लाखांवर विद्यार्थ्यांना भेटले. दहा ते सतरा वर्षे या वयोगटातल्या विद्यार्थ्यांना ते प्रश्न विचारण्यास उद्युक्त करतात. वेबसाईटवरही त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देतात. अशी हजारो प्रश्नांना उत्तरे त्यांनी दिली आहेत. काही प्रश्न त्यांना विशेष महत्त्वाचे वाटले. प्रज्वल पी. आचार्य या विद्यार्थ्याचा काळ, अवकाश आणि गुरुत्वाकर्षण यांचा परस्परसंबंध काय हा प्रश्न त्यांना इंटरेस्टिंग वाटला. अशा विद्यार्थ्यांचा ते नावानिशी उल्लेख करतात. अथेना पब्लिक स्कूलमधील भारत चौधरीचा ''आपण अवकाशाचा अभ्यास जास्त करतो, महासागराचा तेवढा करीत नाही असे का?'' हा प्रश्नही त्यांना लक्षवेधक वाटला.

प्रत्येक मूल हे सर्जनशील असते, जिज्ञासू असते. सुंदर मन हे सर्जनशीलतेचा उगम असते. शंकर्स वीकलीच्या बाललेखांकातील काही चित्रांवर ते भाष्य करतात. अँथिया न्यूम्स या जर्मन विद्यार्थिनीचे ग्रामीण भागातील ईस्टरचे चित्र पाहून डॉ. कलमांना आपले रामेश्वरच्या समुद्र किनाऱ्यावरचे बालपण आठवते. रशियातल्या ॲन्ना सिन्थाकोवाच्या नेव्हर थिंक ऑफ इलनेस या कवितेतला आशावाद त्यांना आवाहक वाटतो. एका विद्यार्थ्याने त्यांना विचारले, 'युद्धाच्या तयारीचं समर्थन शांततेसाठी बचाव असं कसं करता येईल?' देशाचं संरक्षण हे आपलं ध्येय आहे. भारतानं भूतकाळात कधीही कुठल्याही देशावर आक्रमण केलेलं नाही. पुढंही तो करणार नाही. इतर देशांकडे अण्वस्त्रे आहेत. तेव्हा भारताने हातावर हात ठेवून गप्प बसणे योग्य नाही. एक सामर्थ्यवान दुसऱ्या सामर्थ्यवानाचा आदर करतो; तेव्हा शांततेसाठी आपण सामर्थ्यवान असणं, शस्त्रसज्ज असणं जरुर आहे असे स्पष्टीकरण त्यांनी केले.

एका मुलीने राष्ट्रपती कलाम आणि मिसाईल मॅन कलाम यांच्यातील फरक त्यांना विचारला. एका विद्यार्थ्याने विज्ञान आणि अध्यात्म यातील फरक विचारला. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या मनातील आकांक्षा ते जाणून घेत राहिले. विद्यार्थ्यांमधील ऊर्जेला योग्य दिशा देण्याचे निकड त्यांना भासली. देशात आज ५४ कोटी तरुण आहेत. या प्रचंड शक्तीला भव्यदिव्य ध्येय हवे, तरच ही विशाल शक्ती कृतिप्रवण होईल अशी त्यांची भावना आहे.

### मुलांसाठी जाहीरनामा

मुलांसाठी एक जाहीरनामा त्यांनी तयार केला.

१. मुलं ही राष्ट्राची मौल्यवान शक्ती आहे.

२. मुलगा आणि मुलगी यांना समान महत्त्व आहे. शिक्षण आणि विकासाचे अधिकार त्यांना समान अधिकार द्यायला हवेत.

३. स्वास्थ्य आणि समृद्धी हे आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कुटुंब सीमित ठेवण्यात यावे.

४. शिक्षणातून ज्ञान मिळते आणि ज्ञानामुळे विद्यार्थ्यांचा विकास होतो. त्याच्या रोजगाराचे, कर्तृत्वाचे क्षेत्र खुले होते. हे शिक्षणाचे महत्त्व मुलांच्या मनावर बिंबवायला हवे.

५. किमान पाच रोपे लावून, जंगलसंपत्तीचा विध्वंस रोधायला हवा. प्रदूषण टाळायला हवे.

६. मुलांसाठी पालकांनी रोल मॉडेल बनायला हवे. आदर्श उभे करायला हवेत.

७. मुलांना स्वप्ने रंगवण्यासाठी प्रोत्साहन द्या. स्वप्न-विचार-कृती हा त्यांचा कार्यक्रम हवा.

**प्रतिज्ञा**

कार्यक्रम वा सभासमारंभासाठी डॉ. कलाम यांचे दौरे देशात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर होत. कुठेही गेले तरी विद्यार्थ्यांचा मेळावा ते घेत. त्यावेळी एक प्रतिज्ञा घ्यायला लावत.

१. मी मन लावून अभ्यास करीन. त्यात उत्कृष्ट ठरेन.

२. मी किमान पाच झाडे लावीन आणि त्यांची निगा राखीन.

३. मी माझ्या दु:खीकष्टी बांधवांना मदत करीन. त्यांच्या व्यथावेदना दूर करण्याची शर्थ करीन.

४. मी सुजाण नागरिक बनेन. कुटुंबाने सदाचाराच्या मार्गावर चालावे यासाठी प्रयत्नशील राहीन.

५. मी मानसिक दृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या विकलांग असणाऱ्या लोकांशी स्नेह राखीन.

६. आपल्या देशाला विकसित देश बनवण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करीत राहीन.

युवकांसाठी एक गीतही त्यांनी तयार केले. राष्ट्रपती म्हणून पदग्रहण केल्यावर त्याचा त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला.

भारताला विकसित देश बनविण्याचं भव्यदिव्य स्वप्न आपलं मन प्रज्वलित करील आणि प्रज्वलित मन हे पृथ्वीवरील, पृथ्वीच्या वरच्या स्तरावरील तसेच पृथ्वीच्या पोटातील इतर कोणत्याही साधन स्रोतापेक्षा सामर्थ्यवान असेल. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी, आर्थिक विकासाबरोबर जीवनमूल्यांची जपणूक

करण्यासाठी ज्ञानदीप सतत तेवत ठेवू अशी भावना त्यांनी त्या गीतामध्ये व्यक्त केली होती.

**स्त्रीशक्ती** - मुले आणि तरुण यांच्याचप्रमाणे स्त्रीशक्तीचेही डॉ. कलाम गुणगान करतात. एकूण लोकसंख्येच्या ४८ टक्के स्त्रिया आहेत आणि आज त्या सर्व क्षेत्रात चमकत आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्रशासक, नेत्या, पोलिस, शास्त्रज्ञ, कलावंत... राष्ट्र उभारणीत सुजाण, ज्ञानसंपन्न स्त्रियांचा सहभाग, त्यांची जीवनमूल्ये आणि कुटुंबनिष्ठा यामुळे समाज आणि राष्ट्र यांना स्थैर्य लाभते. सक्षम, सबल, आत्मनिर्भर नारी सुस्थिर समाज निर्माण करते. सामान्य मूलभूत शिक्षणपूर्ण झाल्यावर व्यावसायिक प्रशिक्षण, स्वयंरोजगार, नोकरी याद्वारे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी स्त्रियांसाठी खास शैक्षणिक पॅकेजेस सुरू करण्याची गरज डॉ. कलाम व्यक्त करतात. उत्तरांचलच्या महिला पोलीस महासंचालक कांचन चौधरी भट्टाचार्य, व्हाइस अॅडमिरल पुतिना अरोरा, एअर मार्शल पी. बंदोपाध्याय, एव्हरेस्ट विजेत्या कॅप्टन क्षिप्रा मुजुमदार, कॅप्टन अश्विनी पवार, मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ. शांता, मदर तेरेसा, लाइट कॉम्बॅट एअर क्राफ्टसाठी लागणारे कार्बन ब्रेक पॅड तयार करणाऱ्या वैज्ञानिक रोहिणी देवी, अंतरिक्षात जाणारी पहिला भारतीय महिला कल्पना चावला, व्यवस्थापन तज्ज्ञ कमला चौधरी अशा अनेक महिलांचा डॉ. कलाम आदराने आणि अभिमानाने उल्लेख करतात. पुरुष आणि स्त्री यांच्यामध्ये काही भेदभाव न करता पारदर्शी पद्धतीने कार्यसूचीवर (रॉस्टरवर) आधारित पदे त्यांना देण्यात यावीत. स्त्री-पुरुष यांच्या संमिश्र टीम असाव्या असे त्यांचे प्रतिपादन आहे.

**ज्ञानप्रणित अर्थव्यवस्था** - ज्ञानसंपन्न समाजाची जडणघडण होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, अवकाश तंत्रज्ञान, आपत्ती व्यवस्थापन, दूर चिकित्सा, दूर शिक्षण, स्वदेशी ज्ञान उत्पादन निर्मितीसाठी तंत्रज्ञान, इन्फोटेनमेंट वगैरे ज्ञानक्षेत्रे राष्ट्रीय कृतिदलाने निवडली आहेत. केवळ पुस्तकी शिक्षणावर भर न देता सृजनशील, परस्पर क्रिया घडवणाऱ्या स्वयं अध्ययनाला चालना देणे, औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या जागी ज्ञानप्रणित अर्थव्यवस्थेची प्रस्थापना करणे याला प्राधान्य देणे आता अपरिहार्य आहे याकडे डॉ. कलाम लक्ष वेधतात. आपल्या परंपरागत ज्ञानाची आणि साधन स्रोतांची आधुनिक कालोचित मांडणी करून राष्ट्रहिताचे संवर्धन करणे आणि जागतिक पातळीवर आपले अस्तित्व ठळक करणे हे आपले ध्येय असायला हवे. डिजिटल ग्रंथालयाद्वारे ज्ञानप्रक्रिया मुक्त आणि लोकाभिमुख करणे, भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्यातील अंतर दूर करणे, संबद्धतेच्या माध्यमातून प्रगती साधणे, व्हर्च्युअल विद्यापीठे आणि संस्था स्थापन करणे, ज्ञानाचे आदानप्रदान करणे, व्याख्याने-ग्रंथालये-प्रयोगशाळा यांचे जाळे विणून त्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या बँडविड्थ वाढवणे, दूरस्थ उपकरणे आणि सुविधा यांच्याद्वारे सर्वांना सामावून घेऊन उच्चशिक्षणात

सार्वत्रिकता आणि सुलभता आणणे, आरोग्य, प्रशासन, ग्रामविकास यात ग्रीड निर्माण करून उच्चस्तरीय बॅंडविड्थ ब्रॉडबॅंड कनेक्टिव्हिटीचा फायदा उठवणे अशा अनेक कल्पना डॉ. कलाम विकसित भारताची उभारणीसाठी सुचवतात. ३३ लक्ष चौरस किलोमीटरचा आपला देश, त्याला लाभलेला ७००० किलोमीटरचा समुद्र किनारा, विविध प्रकारचा भूभाग, एक अब्जावर लोकसंख्या या प्रचंड विस्तारात सामाजिक एकजिनसीपणा आणणे, चिरस्थायी विकास घडवणे यासाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि ज्ञानसंबद्धता यांची काय धरल्याविना गत्यंतर नाही असे डॉ. कलाम पुन:पुन्हा प्रतिपादन करतात.

**विकसित भारताची रूपरेखा -** भारताचा विकास हा लोकशाहीच्या माध्यमातूनच व्हायला हवा, जनसामान्यांच्या परिश्रमातून व्हायला हवा. दरवर्षी दहा टक्के वृद्धीचा वेग सांभाळायला हवा, त्यासाठी एक संघवृत्तीची आणि विकासाची इंजिने गतिमान करण्याची गरज आहे. जल, ऊर्जा, शिक्षण आणि कौशल्ये, पायाभूत संरचना, रोजगार निर्मिती या पाच क्षेत्रातील प्रगतीवर हा विकासदर अवलंबून आहे.

डॉ. कलाम यांच्या दृष्टीने विकसित भारताची रूपरेषा पुढीलप्रमाणे असेल.

१. ग्रामीण आणि शहरी भाग यातील सीमारेषा पुसट होणे.
२. ऊर्जा आणि शुद्ध पेयजल सर्वत्र उपलब्ध. न्याय्य वाटप.
३. कृषि, उद्योग व सेवा या क्षेत्रात सुसंवाद-मेळ.
४. तंत्रज्ञानाद्वारे चिरस्थायी सपत्तिनिर्मिती, अधिक रोजगार निर्मिती.
५. शिक्षणापासून कोणालाही वंचित राहावे लागू नये अशी व्यवस्था.
६. बुद्धिमान विद्वज्जन आणि वैज्ञानिक यांचे माहेरघर.
७. सर्वांसाठी उत्तम आरोग्य सेवा.
८. सर्वोत्तम तंत्रज्ञान वापरणारे प्रशासन. पारदर्शी, कार्यक्षम, भ्रष्टाचार मुक्त.
९. दारिद्र्याचे उच्चाटन. महिलांना सन्माननीय वागणूक, अत्याचार, जुलूम, शोषणरहित जीवन.
१०. समृद्धी, आरोग्य, सुरक्षा, शांती, सुखसमाधान.
११. पृथ्वीवर वास्तव्य करण्यासाठी सर्वोत्तम ठिकाण म्हणून भारताचे नाव घेतले जाणे.

सुजाण नागरिकत्वाकडून देखील त्यांच्या काही अपेक्षाही आहेत.

सुजाण नागरिकाने आपल्या व्यवसायावर प्रेम करावे, त्यात प्रावीण्य मिळवावे, जातिभेद, भाषाभेद बाळगू नये. भ्रष्टाचारमुक्त जीवन जगावे, धर्माचे आध्यात्मिक शक्तीत रूपांतर करावे, भारताचे आर्थिक सामर्थ्य वाढवावे, शहरी व ग्रामीण भागात जाऊन व्यसनमुक्तीचे काम करावे, अशिक्षितांना साक्षर करावे, किमान दहा झाडे लावावी, रुग्णांना मदत करावी, विकलांगांना सौहार्दाने वागवावे, त्यांना सर्वसामान्य

जगता यावे यासाठी सहाय्य करावे, देशाच्या व देशबांधवांच्या यशाचा आनंद साजरा करावा इत्यादी.

**सर्जनशील नेतृत्व -** नेतृत्व हे सर्जनशील असावे असा त्यांचा कटाक्ष होता. भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी परिवर्तनाला योगय दिशा देणारे, गुणवान नेते हवेत, अडीअडचणीच्या, कसोटीच्या प्रसंगी न डगमगणारे धैर्यवान नेतृत्व हवे. १९८३ मध्ये क्षेपणास्त्र विकास प्रकल्पासाठी संचालकाची निवड करण्यात येणार होती. तेव्हा प्रकल्प संचालकाला आवश्यक गुण कोणते यावरची मते त्यांनी व्यवस्थापन समितीच्या सदस्यांकडून जाणून घेतली. रॉकेट इंजिनियरिंगमधील डॉक्टरेट, तंत्रज्ञानात कुशल, उत्तम डिझाईनकार, संघभावनेने काम करण्यात कुशल, चाळिशीच्या आतील वय, सचोटीने व्यवहार करण्याची वृत्ती वगैरे गुणांचा उल्लेख लोकांनी केला. त्या धर्तीवर खऱ्या नेत्याने अपयशही स्वत:च्या पदरी घ्यावे, इतरांच्या यशाचा आनंद साजरा करावा, नैतिक नेतृत्व द्यावे, थोर मन आणि थोर मत दाखवावे, उद्यमशील नेतृत्व द्यावे, आर्थिक विकास घडवावा, सेनापती ते प्रशिक्षक, व्यवस्थापक ते सल्लागार, संचालक ते प्रतिनिधी अशा विविध भूमिका सहजतेने पार पाडाव्या आणि देशाच्या सबलीकरणाला चालना द्यावी अशी सृजनशील नेतृत्वाची लक्षणे ते प्रकट करतात.

डॉ. नेल्सन मंडेला, महात्मा गांधी यांचा आदर्श त्यांच्यापुढे आहे. एड्सग्रस्त लोकांच्या भारतीय नेटवर्कमध्ये नॅशनल ॲडव्होकसी ऑफिसर म्हणून कार्यरत असणाऱ्या आशा रामय्या यांची अदम्य जिद्द त्यांना गौरवास्पद वाटते. आशा रामय्या हिने एड्स झाल्यावर खचून न जाता एड्सग्रस्त व्यक्तींच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी संस्था काढली. एड्सग्रस्त व्यक्तीशी विवाह केला. जीवनात पुन्हा भरारी घेतली. धैर्याने एड्सग्रस्तांच्या मदतीसाठी कार्य करून एड्सबाबतचे समाजातील गैरसमज दूर केले - याचा डॉ. कलाम आदराने उल्लेख करतात.

एकूणच 'अदम्य जिद्द' हे प्रेरणादायक विचारांचे संकलन सत्कार्याबद्दलचा उत्साह वाढवणारे आहे.

**किंमत : १८०रु. सभासदांना : १२६रु. पोस्टेज : २५रु.**

# पुस्तक परिचय

## ग्राहकसेवेचा आदर्श निर्माण करणारे
## वर्षाकाठी ५० कोटींची उलाढाल असणारे

# डबेवाला

**श्रीनिवास पंडित**
**अनु. सुप्रिया वकील**



**मुं**बईतील डबेवाल्यांची व्यवस्थापन कुशलता ही प्रिन्स चार्लसच्या भेटीमुळे जगभर लौकिकाला पात्र ठरली. एम टीव्ही, झी टीव्ही यांनी डबेवाल्यांवर माहितीपट तयार केले. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसमध्ये त्यांची नोद घेतली गेली. 'रिप्लेज बीलिव्ह इट ऑर नॉट' ने त्यांचा गौरव केला. बीबीसीवरचा माहितीपट कुतूहल वाढविणारा ठरला. फोर्ब्समध्ये त्यावर लेख आला...

११५ वर्षे अविरत चालू असलेला, ५००० अर्धशिक्षित डबेवाल्यांनी चालवलेला, ६० किलोमीटरच्या त्रिज्येच्या परिघातल्या दोन लाख लोकांना दररोज घरचे अन्न पोचवणारा, म्हणजे रोज चार लाख वेळा डब्यांची आवकजावक करणारा डबेवाल्यांचा व्यवसाय हा मुंबईकरांच्या अभिमानाचा विषय आहे. या डबेवाल्यांचे डिलिव्हरी रेकॉर्डही अचाट आहे. १ कोटी ६० लाख व्यवहारांमध्ये फक्त एक इतकाच त्रुटीचा रेट आहे. दरमहा प्रत्येक ग्राहकाला २०० रुपये मोबदल्यात घरचा डबा ऑफिसमध्ये पोचवण्याचा हा उपक्रम तंत्रज्ञानविषयक कुठलाही बॅक अप नसताना सिक्स सिग्मा परफॉर्मन्स दाखवतो. वर्षाकाठी ५० कोटी रुपयांची उलाढाल करतो...

२५-३० डबेवाल्यांचा एक गटप्रमुख मुकादम असतो. असे १२० गट आहेत. हा गट म्हणजे स्ट्रॅटेजिक बिझनेस युनिट असतो. गेल्या अनेक वर्षात डबे पोचवण्याच्या दरात वाढ झालेली नाही कारण हा दर वाढवला तर ग्राहकाला घरचे जेवण घेणे महाग वाटू शकेल आणि त्याऐवजी तो उपाहार गृह, कॅंटिनमधील जेवण घेण्यास प्रवृत्त होऊ शकेल. ग्राहकाला परवडणाऱ्या दरात कार्यक्षम सेवा देण्याच्या जिद्दीमुळे हा व्यवसाय टिकून राहिला आहे. डिलिव्हरी म्हणजे डबे पोचवणे हा मूलभूत उद्योग आहे हे गृहीत धरल्यामुळे फास्टफूड खाद्यपदार्थांचे दुकान-कॅंटिन आपले स्पर्धक आहे असे डबेवाल्यांना वाटत नाही. प्रत्येक डबेवाल्याला महिना पाच ते सहा हजार रुपये मिळतात. प्रत्येक डबेवाल्यावर २५-३० ग्राहकांना डबे पोचवण्याची पूर्ण जबाबदारी असते. ही सप्लाय चेन मॅनेजमेंट - कार्यक्षमतेने सांभाळली जाते.

या डबेवाल्यांच्या कार्यपद्धतीचा संवादरूपाने परिचय करून देणारे, आधुनिक व्यवस्थापन शास्त्राच्या परिभाषेत त्यांचे कार्य सादर करणारे डबेवाला हे श्रीनिवास पंडित यांचे पुस्तक मराठीत आले आहे. सुप्रिया वकील यांनी अनुवादित केलेले हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने काढले आहे.

श्रीनिवास पंडित यांची **थॉट लीडर्स** आणि **एक्झम्पलरी सीईओज्** ही दोन पुस्तके आधी प्रसिद्ध झालेली आहेत. उद्योग व्यवसायात कर्तृत्व दाखवणाऱ्या, नव्या कल्पना यशस्वीपणे राबवणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची आणि जीवनमूल्यांची ओळख करून देणारी ही पुस्तके आहेत.

डबेवाल्यांची ओळख करून देण्यासाठी श्रीनिवास पंडितांनी डबेवाल्यांच्या संघटनेचे दोन पदाधिकारी आणि दोन व्यवस्थापन तज्ज्ञ यांच्या संवादाचे माध्यम वापरले आहे. रघुनाथ मेदगे (वय ४८) आणि गंगाराम तळेकर (वय ५५) हे डबेवाल्यांचे प्रतिनिधी. रघुनाथ बीए, गंगाराम आठवी पास. अनिता दलाल (वय ४०) ही बिझनेस सल्लागार. सोशल इंजिनिअरिंगमध्ये नवे प्रयोग करण्यास स्वारस्य असलेली वाणिज्य शाखेतील पदवीधर आणि अमेरिकेतील विद्यापीठातून पत्रकारितेतील मास्टर्स डिग्री घेतलेली; आणि स्वत: श्रीनिवास पंडित या चौघांच्या चर्चा-संवादातून डबेवाल्यांच्या कार्यपद्धतीचा परिचय आपल्याला होतो. रघुनाथ आणि गंगाराम यांनी दिलेल्या माहितीची व्यवस्थापनशास्त्राच्या परिभाषेत मांडणी करण्याचे काम अनिता दलाल आणि श्रीनिवास पंडित करतात आणि त्याद्वारे यशस्वी उद्योगाची सूत्रे किंवा वैशिष्ट्ये स्पष्ट करतात.

''भक्कम प्राचीन मूल्यांद्वारे शक्तिशाली आधुनिक उद्योगाची जोपासना करणे शक्य आहे, असे टिकाऊ उपक्रम सामान्य ग्राहकांच्या आणि अल्पशिक्षित पुरवठादारांच्या आशाआकांक्षा आणि गरजा भागवतात असा त्यांचा निष्कर्ष आहे. व्यवस्थापनाच्या दृष्टीने डबेवाल्यांचे बिझनेस मॉडेल एक संपूर्णतया नवा दृष्टिकोन प्रकट करते असे त्यांना वाटते. महागाई वाढत असताना सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा बिझनेस जोपासण्यासाठी महागड्या तंत्रज्ञानाच्या अनावश्यक मोहात न पडता, वक्तशीर पुरवठा आणि उत्कृष्ट सेवा यावर रिपीट ऑर्डर मिळवून आपली उपजीविका करतात आणि दररोज दोन लाख ग्राहकांना नियमितपणे घरच्या अन्नाचा पुरवठा करून खरोखर मूल्यवर्धन करतात, **ग्राहकाला वेळेवर सेवा पुरवण्याची आयुष्यभरची समर्पित बांधिलकी आणि सेवेचे तर्कसंगत विकेंद्रीकरण याद्वारे ग्राहकाला बदलाची किंमत कमीतकमी बसेल याबद्दलही जागरुकता दाखवतात** असा त्यांचा दावा आहे.''

फॅशन म्हणून, गरज म्हणून, सोय म्हणून बाहेर खाण्याची पद्धत अंगवळणी पडत असतानाही घरी मायेनं बनवलेले अन्न खाण्यातील समाधानाची भावना आणि सुरक्षिततेची खात्री लक्षात घेऊन कॉस्ट इफेक्टिव्ह डिलिव्हरी सेवा देणारी यंत्रणा उभी करण्यात डबेवाल्यांना यश आले आहे. त्यामुळेच ११५ वर्षे हा व्यवसाय अविरतपणे चालू आहे.

मुंबईच्या जलद लोकल सेवेचा फायदा घेऊन, योग्य प्रकारे तिचा वापर करून केवळ चार तासात दोन लाखावर डबे घरापासून ते ऑफिसपर्यंत पोचवण्याची शिस्तबद्ध यंत्रणा डबेवाल्यांनी विकसित केली आहे. अल्पशिक्षितांनी व्यावहारिक बाबींवर लक्ष देऊन स्वत:चेच एक व्यावसायिक तंत्र विकसित करावे याचे कौतुक आज जगभर होत आहे. सेवेला मानवी सौहार्दाची जोड दिल्याने हा व्यवसाय शतकोत्तर वाटचालही दिमाखाने करीत आहे.

मुंबईच्या साठ किलोमीटरच्या परिसरात कुठेही सकाळी ८।।ला डबेवाला डबा

घरातून घेतो आणि उपनगरी रेल्वे स्टेशनवर आणून पोचवतो. तेथे डब्यांचे स्टेशनानुसार वर्गीकरण करून कार्टेजिस लोकलच्या डब्यात चढवली जातात. महत्त्वाच्या हबवर ती उतरवून घेतली जातात. प्रत्येक संकलन केंद्रावरून येणारी कार्टिजिस तेथे आल्यावर डेस्टिनेशननुसार पुन्हा वर्गीकरण करून ती योग्य त्या रेल्वे टर्मिनल स्टेशनवर पोचतात. तेथे ती उतरवून घेऊन पोचवण्याच्या स्थळानुसार त्यांचे वर्गीकरण होते. साडेबारापर्यंत ग्राहकाच्या कार्यालयात तो डबा पोचतो. दुपारी १। ते २ च्या दरम्यान रिकामे डबे गोळा करून पुन्हा याच पद्धतीने संध्याकाळी साडेपाचपर्यंत डबे घरोघर परत पोचवले जातात.

**व्यावसायिक मॉडेलमागची विचारसूत्रे**

डबेवाल्यांचे हे व्यावसायिक मॉडेल गेली ११५ वर्षे सुरळीतपणे चालू आहे. यामागे निश्चित काही विचारधारा वा मार्गदर्शक सूत्रे आहेत. या पुस्तकात त्यांचीही नोंद करण्यात आली आहे. त्यापैकी काही सूत्रे खूपच अर्थपूर्ण आहे.

१. घरी मायेने बनवलेल्या भोजनातून विलक्षण संतुष्टी लाभते.

२. प्रचंड परिवर्तनाच्या काळात दीर्घकाळ टिकाऊ काय ठरेल त्याचा शोध घ्या आणि त्यातून व्यवसायाच्या संधी मिळवा.

३. सामर्थ्यसंपन्न होण्यासाठी कामाचे विकेंद्रीकरण करा आणि कमीतकमी सेवाशुल्कात डिलिव्हरी द्या.

४. आपल्या व्यवसायक्षेत्रात नव्याने प्रवेश करणाऱ्या लोकांची भीती वा स्पर्धा यांचा बागुलबुवा न करता, नवे ग्राहक मिळवत राहा.

५. ग्राहकांना विश्वासार्ह डिलिव्हरी सर्व्हिस द्या. तो ग्राहक तुमच्याशी निष्ठावंत राहीत.

६. वेळेवर सेवा पुरवण्याची आयुष्यभराची बांधिलकी राजमान्यतेलाही पात्र ठरते आणि व्यवसायही वाढवते.

७. सेवा विभाग मानवी बनवणे हे व्यवसायातील यशाचे रहस्य ठरते.

८. टीमवर्क = नेटवर्क = सहकार्य. हे सूत्र वैयक्तिक गती वाढवत कौशल्य विकास साधणारे आहे. ग्राहकांविषयीची अकृत्रिम आस्था नवउपक्रमशीलतेला चालना देते.

९. या संघटनेत उच्चपदस्थ सीईओ नाही; तरी काम सुरळीत चालते. वीस-पंचवीस जणांचा एक गटप्रमुख असतो. गटप्रमुखांमध्ये मतभेद झाले तर गटप्रमुखच सोडवतात.

१०. मुंबईसारख्या शहरात अस्तित्वासाठी झगडणाऱ्या डबेवाल्यांची वेशभूषा (पांढरा पायजमा, शर्ट आणि गांधीटोपी) लोकांमध्ये सहानुभूतीची भावना निर्माण करते. यात आधुनिकतेपेक्षा साधेपणाला महत्त्व दिले जाते.

११. डबेवाल्यांची कार्यपद्धती या व्यवसायाच्या संदर्भात निश्चित होत गेली आहे. ती इतर कुठल्या बिझनेसला जशीच्या तशी लागू पडावी अशी अपेक्षा वा शक्यता असू नये. ''आमच्याजवळ सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत असे डबेवालेही मानत नाहीत.''

१२. डबेवाले रोज सात तास चालत असतात. चरेवैति चरेवैति (चालत राहा) हा उपनिषदातला मंत्रच ते जणू आचरत असतात.

दोन लाख डबे रोजच्या रोज उपनगरातून घरोघर जाऊन गोळा करणे आणि ते दुपारी १२॥पर्यंत प्रत्येक ग्राहकाच्या कार्यालयात पोचवणे; तसेच ते गोळा करून पुन्हा ज्या त्या घरी पोचवणे हा सर्व व्याप प्रचंड आहे. **ज्याचा डबा त्यालाच नेमका मिळणे हा यातील अचूक कार्यक्षमतेचा उच्चांक ठरतो.** त्यासाठी डबेवाले डिलिव्हरी कोडचा वापर करतात. निवासी स्थानाचा कोड (व्हीपी), डबा पोचवण्याच्या डेस्टिनेशनचा कोड (९ व्हीस १२), डेस्टिनेशन स्टेशनचा कोड (९), इमारतीच्या नावाचा कोड (व्ही एस), इमारतीच्या मजल्याचा कोड (१२), डबेवाल्यांसाठी निवासी रेल्वेस्टेशनचा कोड (ई), डेस्टिनेशन रेल्वे स्टेशनचा कोड (३) हे कोड डब्यावर त्या त्या गटाच्या विशिष्ट रंगानुसार रंगवलेले असतात.

अल्पशिक्षितांच्या या बिझनेस मॉडेलला इंग्लंडचा राजपुत्र चार्लस याने दिलेल्या पावतीमुळे जगभर प्रसिद्धी मिळाली. आपल्या विवाहप्रसंगी डबेवाल्यांच्या प्रतिनिधींना खास निमंत्रित करून त्यांना सन्मानित केले. प्रिन्स चार्लसने त्यांना भेटून आपल्या नवविवाहित पत्नीशी ओळखही करून दिली. भेटवस्तूंबद्दल आभार मानले. नंतर आभाराचे पत्रही पाठवले.

एकूण हे पुस्तक डबेवाल्यांच्या कार्यपद्धतीचे सर्वांगीण दर्शन घडवते. या कार्यपद्धतीच्या मर्यादाही स्पष्ट करते. या कार्यपद्धतीचे आधुनिक व्यवस्थापनाच्या परिभाषेत विश्लेषण करते. ग्राहक हा देव असतो, त्याची भक्ती करीत राहा. तो प्रसन्न होतो. या पूजेचे मोल इतर समाज घटकांनाही समजते. डबेवाल्यांच्या हातगाड्या हेडलाइन गाठण्यासाठी दौडवल्या जातात तेव्हा पोलिसही त्यांचे कौतुक करतात. (त्यांच्या धावण्याकडे कानाडोळा करतात) इतर नागरिकही त्यांना अग्रक्रम देतात. घरच्या अन्नाचा ताजेपणा टिकवण्यात आपल्या डिलिव्हरी सिस्टिमचे खरे यश आहे याची जाणीव असल्याने डबेवाल्यांची वेळेशी शर्यत रोजच्या रोज चालू असते.

... व्यवस्थापनाचे उच्च प्रशिक्षण घेणाऱ्यांनाही विचारप्रवण करील असा हा एक व्यावसायिक आदर्श किंवा नमुना आहे, हे या पुस्तकावरून मनावर बिंबवले जाते.

**किंमत : ७०रु. सभासदांना : ४९रु. पोस्टेज : २०रु.**

टी बुक क्लब १७ चे

# पहिले पुस्तक




# मायकेल क्रायटन

## स्टेट ऑफ फिअर

अनुवाद
डॉ. प्रमोद जोगळेकर

**४००रु.** | पोस्टेज २५ रु.

**वाढत्या औद्योगिकीकरणामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड वायू वाढून पृथ्वीचं तापमान वाढतंय. त्यामुळे बर्फ वितळून सागरांची पातळी वाढणार. पृथ्वीचं तापमान वाढल्यामुळे महापूर, चःक्रीवादळं, दुष्काळ, ढगर्फुी अशी संर्क वाढू लागली आहेत.**

**हे सारं जगाला पैंवण्यासाठी NERF या पर्यावरणवादी स्वयंसेवी संस्थेनं कॅलिफोर्नियात एक जागतिक परिषद आयोजित केलेली आहे. NERF कडे निधीची कमतरता आहे.**

**संर्कींचा धोका किती मोठा आहे हे पैंवण्यासाठी पर्यावरणवादाचे दहशतवादी समर्थक पॅसिफिक महासागरात पाण्याखाली स्र्फी घडवून आणतात.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

## पुस्तक परिचय

**नगररचना, रस्तेबांधणी, दळणवळणाची साधने, शस्त्रास्त्रांची निर्मिती, लिपीचा शोध, नकाशे यांनी मानवी संस्कृतीला दिलेले मूलगामी अधिष्ठान**

# आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान

**निरंजन घाटे**



**म**राठीत विज्ञानविषयक लेखन करणारे फारच थोडे लेखक आहेत. त्या निरंजन घाटे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. गेली चाळीसेक वर्षे त्यांचे लेखन विविध नियतकालिकांमधून आणि रविवार पुरवण्यांतून प्रसिद्ध होत आहे. त्यांच्या लेखांची संकलनेही पुस्तकरूपात येत आहेत.

वृत्तपत्रातील स्तंभलेखनामुळे सातत्याने लेखन होत राहते. त्या निमित्ताने नवीन पुस्तकांचे वाचन आणि विज्ञानक्षेत्रातील नवीन संशोधनाचे आकलन अध्ययन होत राहते. नवनव्या संशोधनाची माहिती लोकांना हवी असते, तीही वैज्ञानिक परिभाषेपेक्षा नित्य व्यवहाराच्या भाषेत आणि सुलभ रीतीने लिहिलेली असेल तर वाचकांना प्रिय होते. या लोकप्रियतेची प्रचीती अधूनमधून येत राहते आणि लेखकाचा उत्साह वाढवत राहते. चाळीस वर्षे सातत्याने विज्ञानाच्या विविध अंगांवर मिळेल ती माहिती मिळवून सदराद्वारे देत राहणे एरव्ही शक्य झालेच असते असे नाही. गेल्या चाळीस वर्षात विज्ञानाच्या विविध क्षेत्रात खूपच नवनवे शोध लागत आहेत आणि आपल्या दैनंदिन जीवनावरही विज्ञानाचा प्रभाव वाढत चालला आहे. इंटरनेट, टीव्ही, मोबाईल दळणवळणाची साधने, घरबांधणीची आधुनिक साधने, जैवतंत्रज्ञान, प्रगत कृषितंत्र यामुळे विज्ञानाची फळे ही केवळ श्रीमंत वर्गाची मिरास राहिलेली नाही. ग्रामीण भागातही या शोधांनी बरेच परिवर्तन घडवून आणलेले आहे. त्यामुळे विज्ञानाबद्दल सर्वच समाजात आता कुतूहल वाढत आहे. निरंजन घाटे यांच्यासारखे लेखक वाचकांची ही जिज्ञासा पूर्ण करण्यात आनंद मानत आहेत ही स्वागतार्ह बाब आहे.

स्वत: शास्त्रज्ञ वा संशोधक विज्ञानविषयक लेखन करतात तेव्हा ते त्यांच्या त्यांच्या विशिष्ट क्षेत्रापुरते सीमित असते. निरंजन घाटे यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते विज्ञानाच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील संशोधनाबद्दल लिहित असतात. त्या दृष्टीने परदेशात प्रसिद्ध होणाऱ्या विज्ञानविषयक नियतकालिकांचा आणि पुस्तकांचा सतत पाठपुरावा करीत असतात. नवे काही दिसले की लगेच त्याची माहिती मराठी वाचकांना देण्यासाठी ते तत्पर असतात. विज्ञानक्षेत्रातील विविध संकल्पना स्पष्ट करण्यासाठी शक्यतर पारिभाषिक शब्दांचीही निर्मिती करीत असतात. संशोधकांची चरित्रे, संशोधनातील अडीअडचणी आणि नवलाई, संशोधनात मिळालेली नवीन माहिती यांची नोंदही ते घेत असतात. सायन्स इन हिस्टरी, सायन्स अॅड टेक्नालॉजी इन मेडिव्हल सोसायटी, अँशिएंट इन्व्हेन्शन्स, स्केप्टिकल इन्क्वायरर, सायन्स, सायंटिफिक अमेरिकन वगैरे पुस्तकांचा आणि नियतकालिकांचा मागोवा घेतल्याने माहिती अद्ययावत आणि विश्वासार्ह राहते. अशा साहित्याचा वापर कशा प्रकारे करावा याचे एक तंत्र असते. तेही घाटे यांना चांगले अवगत झाले आहे. त्यामुळे त्यांच्या विज्ञानविषयक लेखांनी अभ्यासकांचे तसेच सर्वसामान्य वाचकांचेही कुतूहल चाळवत राहते. विज्ञान हा विषय वाचनीय व आकर्षक करण्यातील निरंजन घाटे यांची हातोटी वाखाणण्यासारखीच आहे.

आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान आणि आपल्या पूर्वजांचे विज्ञान ही घाटे यांची दोन पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकतीच बाजारात आणली आहेत. मार्मिकमध्ये दोन वर्षे त्यांनी प्राचीन मानवाच्या विज्ञान-तंत्रज्ञानातील वाटचालीबद्दल सदर चालवले होते. त्यातील लेखांचे संकलन थोडेफार वर्गीकरण करून या पुस्तकात सादर करण्यात आले आहे.

'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान'मध्ये ५० लेखांचा समावेश आहे.

साडेचार हजार वर्षांपूर्वी माहिती तंत्रज्ञानाची सुरुवात झाली. मानवी संस्कृतीचा पाया घातला गेला. चाकाचा शोध लागल्यावर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे शक्य झाले. व्यापारी तांडे एका गावाहून दुसऱ्या गावाला जाऊ लागले. त्यामुळे एकमेकांची माहिती होऊ लागली. माहितीच्या साठ्यात भर पडू लागली. गॉसिप, गप्पांच्या मौखिक स्वरूपामुळे या माहितीत अतिशयोक्ती आणि अतिरंजितपणा यांचा शिरकाव होई. पुढे लिपीचा शोध लागला. भूर्जपत्रावर लिहिण्याची मेख कळली. तरीही लेखी माहितीचे प्रमाण मर्यादितच राहिले.

**नगररचना -** मेसोपोटेमिया ही सर्वांत प्राचीन संस्कृती. इराक-इराणच्या आखातातील त्रिभुज प्रदेश, युफ्रेटिस आणि टायग्रीस नद्यांच्या दुआबातील प्रदेश. मेसोपोटेमिया हे शहर त्यावेळी पंधरा-वीस हजार वस्तीचे होते. शहराभोवती तटबंदी. मध्यभागी पिरॅमिड (झिगुरात), धार्मिकविधी त्या परिसरातील देवळात पार पडत. व्यापारी पेठेत मालाची उलाढाल होई. आर्थिक व्यवहाराची नोंद ठेवली जाई. क्युनिफॉर्म लिपी वापरली जाई. चांदीची वळी चलन म्हणून वापरली जाई. व्यवहार, नियम यांची माहिती विटांवर लिहिली जाई. या विटांवरील ग्रंथांमुळे तत्कालीन जीवनाची माहिती मिळू शकते. पाच लाखावर विटालेख सापडले आहेत. भौमितिक लिपीतून पुढे बोली भाषांची प्रमाणित मुळाक्षरे निर्माण झाली. बार्ली हे मुख्य अन्न. खजूर, शेळीचे दूध यांचा आहारात समावेश होता. बैलगाड्यांनी वाहतूक होई. घोड्यांचा वापर नंतर हजार वर्षांनी होऊ लागला.

गिल्मामेश हे महाकाव्य सिद्ध झाले. गिल्मामेश हा देवाचा पुत्र. त्याने शहराभोवती तटबंदी उभारली.

**रस्तेबांधणी -** पुढे रस्ते बांधण्याची कल्पना प्रत्यक्षात आली. चाकांचा शोध लागल्यावर चाकांच्या गाड्यांची खेळणी प्रचारात आली. घोड्याचा उपयोग वाहतूक आणि लढाईच्या वेळी होऊ लागला.

भारतात इ. स. पूर्व एक हजार वर्षांपासून दुतर्फा झाडी लावलेले रस्ते तयार होऊ लागले. पिण्याच्या पाण्याची सोय, वाटेत मुक्कामासाठी धर्मशाळा... मानवी संस्कृतीत नवनव्या सुविधांची भर पडली. चीनमध्ये इ. स. पूर्व नवव्या शतकात रस्ते बांधणी सुरू झाली. राजासाठी रथ तयार करण्यात आले. चीनमध्ये इ. स. पूर्व

दुसऱ्या शतकापर्यंत ३२ हजार किलोमीटरचे रस्ते तयार झाले.

रोमन सम्राटांनीही रस्त्यांचे जाळे तयार केले. सैन्याच्या जलद वाहतुकीला त्यांचा उपयोग झाला. पुढे बोटी तयार करण्याची कला अवगत झाली. तेव्हा जलमार्गाचाही वापर सुरू झाला.

दळणवळणाच्या दृष्टीने नकाशांची निर्मिती सुरू झाली. भारतीयांनी तयार केलेल्या नकाशात पृथ्वी गोल आहे. भगीरथाने गंगेचा प्रवाह वळवला, जल अभियांत्रिकीचा पाया घातला.

दक्षिण अमेरिकेतील चिनू या संस्कृतीने अर्धषट्कोनी कालवे बांधले. कालव्यांच्या काठावर शेती चांगली होई. कंटूर-बंडिंग पद्धतीचा अवलंब करून नदीच्या उगमाजवळून कालवे काढायला आरंभ केला.

नकाशे बनविण्याची प्रत्येक संस्कृतीची स्वत:ची शैली आढळते. ग्रीक, रोमन, भारतीय, अरबी, पर्शियन, चिनी लोकांच्या नकाशांची माहिती पाचसहा प्रकरणात देण्यात आली आहे.

**जहाज बांधणी -** इ. स. पूर्व तिसऱ्या ते पहिल्या शतकात ग्रीकांनी जहाजबांधणीचे तंत्र विकसित केले. भूमध्य सागराभोवती आणि मध्यपूर्वेत जलमार्गे संचार सुरू केला. युद्धनौकाही तयार केल्या. दगड उचलून फेकणाऱ्या याऱ्या उल्हाट यंत्रांमुळे मालाची चढउतार सुलभपणे होई. आर्किमिडीजच्या देखरेखीखाली हे जहाज सागरसफरीवर निघाले.

शिडाची जहाजे सागरी प्रवासावर जाऊ लागली.

पहिले नौदल इजिप्तने उभारले. (इ. स. पूर्व २३००) सागरी मार्गाने सैनिक पाठवून इजिप्तने पॅलेस्टाइन आणि सीरिया यांचा मोठा भाग ताब्यात घेतला.

हातशेपसुत या राणीने आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरून जहाजे पाठवून राळ आणि लोभान यांच्या उत्पादनासाठी आवश्यक ती झाडे इजिप्तमध्ये आणली. त्यांची लागवड केली.

चीनमध्ये नौकाबांधणीचे युग उशिरा सुरू झाले. (इ. स. पूर्व दुसरे शतक)

इ. स. पूर्व २१ या वर्षी चीनचे एकीकरण होऊन मोठे साम्राज्य स्थापन झाले. क्वीन घराण्याने जागोजागी तटबंदी उभारण्यास प्रारंभ केला.

सुवेझ कालवा प्रथम इ. स. पू. ५००च्या सुमारास बांधला गेला असावा.

फर्डिनांड द लेसेप्स या फ्रेंच इंजिनियरने २० वर्षे सतत काम करून १८६९मध्ये सुवेझ कालवा बांधून पूर्ण केला. या कालव्यामुळे इजिप्तला सतत त्रासच भोगावा लागला. १९५६मध्ये नासरने तो इजिप्तच्या अमलाखाली आणला.

सागरी प्रवासामुळे होकायंत्राचा वापर सुरू झाला. चीनच्या जहाजातून बाराव्या शतकापासून ते सर्रास वापरले जाते. चुंबकसूची दक्षिण दाखवते तेही ती दक्षिणेच्या

पूर्व बाजूस असते असे इ. स. १०८६ मध्ये शेन कुआ याने नमूद करून ठेवले आहे.

**दीपस्तंभ -** समुद्र प्रवासात किनाऱ्याजवळचे खडक जहाजांना दिसावेत म्हणून दीपगृह बांधण्याची पद्धत सुरू झाली. इ. स. पूर्वी २७०मध्ये सोस्ट्रॅटस या ग्रीक वास्तुशास्त्रज्ञाने पहिला दीपस्तंभ बांधला. फारोसचा दीपस्तंभ जगातील सात आश्चर्यांपैकी एक मानला गेला.

इ. स. ४००पर्यंत रोमनांनी तीस दीपगृहे उभारली. रोमन साम्राज्य नंतर लयाला गेले. पण भारतीय राजांनी इ. स. ८०० पर्यंत अरबी समुद्र आणि हिंदी महासागराच्या किनाऱ्यावर अनेक दीपगृहे उभारली.

ग्रीक शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ पायथागोरस, स्ट्रॅटो, फिलॉन, हेरॉन यांनी अनेक अभियांत्रिकी तसेच वैज्ञानिक प्रकल्प राबवले. अलेक्झांड्रिया येथे विद्यापीठ आणि ग्रंथालय स्थापन केले.

घड्याळे, स्टॉल मशीन, दातेरी चक्रांचा वापर करणारा संगणक, वाफेचे यंत्र, स्वयंचलित तिकाटणे, फिरता रंगमंच, स्वयंचलित दरवाजा यांच्या निर्मितीत ग्रीकांचा वाटा मोठा आहे.

चिन्यांनी भूकंपमापक यंत्रे बनवली. स्वयंचलित यंत्रेही तयार केली. चीनमध्ये कूपनलिकांचा वापर खाणीतून दगडी मीठ वर काढण्यासाठी केला जाई.

संरक्षणासाठी किल्ले बांधण्याचा आरंभ इथियोपियात झाला. (इ. स. पहिले शतक)

शहराला तटबंदीची कल्पना जेरिको (मृत समुद्रकाठी) शहराने इ. स. पू. ७०००मध्ये राबवलेली दिसते. हडप्पा संस्कृतीतही प्रत्येक नगराभोवती तटबंदी आढळून आली आहे. ग्रीसमधील शंभरावर शहरांना तटबंदी होती. रोमन लोकही वसाहतीभोवती तटबंदी उभारत.

**युद्धसाधने -** युद्धात लढणाऱ्या सैनिकांसाठी चिलखताचा वापर सुमेरियन संस्कृतीतील ऊर या नगर राज्याने प्रथम केल्याचा अंदाज आहे. (इ. स. पू. ४५००)

हत्ती-घोड्यालाही पुढे चिलखत घालणे सुरू झाले.

प्राचीन युद्ध समयी शिरस्त्राण, चिलखत, लांब दांड्याचे बाण, धातूचे संरक्षक कवच वगैरेंचा वापर होई. उल्हाट यंत्रे आणि ताणधनुष्ये यांचा उपयोग ग्रीकांनी तसेच चिन्यांनी केलेला दिसतो. ज्वालाप्रक्षेपक अस्त्रांचा वापर इस्तंबूलमध्ये प्रथम केला गेला. कॅलिनिकस या सीरियन तरुणाने या युक्तीने बायझॅटिमचे राज्य वाचवले.

पुढे युद्ध हातगोळे, तोफा, अग्निबाण, विषारी वायू यांचाही वापर होऊ लागला.

लोखंडी ओतकामाची कला चीनमध्ये प्रथम सुरू झाली.

डेन्मार्कमधील जुटलंडच्या भागात सापडलेली पाणचक्की पहिल्या शतकातली असावी असा शास्त्रज्ञांचा कयास आहे.

पवन चक्कीचा उपयोग पाणी उपसणे, धान्य दळणे यासाठी यूरोप-मध्यपूर्व यात होत राहिला.

आज अंतरिक्षात संचार करण्याची किंवा इंटरनेटद्वारे जगभर संपर्क साधण्याची तंत्रज्ञानातील क्षमता मानवाने हस्तगत केली आहे. या क्षमतेचा आरंभ चाकांचा शोध, बोटीचा शोध यासारख्या मूलभूत शोधांपासून होत गेला आहे हे विसरून चालणार नाही.

त्याचा मागोवा घेण्यासाठी आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान हे पुस्तक उपयुक्त ठरेल.

**किंमत : १८०रु.  सभासदांना : १२६रु.  पोस्टेज : २५रु.**


**नवे कोरे**

# स्पाय प्रिन्सेस

**श्राबनी बासू**

अनुवाद
**भारती पांडे**

**२००रु. पोस्टेज २५रु.**




टिपू सुलतानाची वंशज असलेली एक भारतीय राजकन्या
दुसऱ्या महायुद्धात सामील होते,
ब्रिटिश गुप्तहेर बनून!
नसानसात अपार धैर्य भिनलेली ही शूर वाघीण,
अखेर जर्मनांच्या हाती लागते.
विश्वासघात, अनन्वित छळ आणि प्राणांतिक यातना...
पिस्तुलाची गोळीच तिची यातून मुक्तता करते.
शौर्याचं अनोखं स्फुल्लिंग जागतं ठेवणारी...

# पुस्तक परिचय

**विज्ञानाने आरोग्यशास्त्र, शस्त्रक्रिया, औषधोपचार, वनस्पतिशास्त्र, सौंदर्य प्रसाधने, आरसे, उद्याने, क्रीडा प्रकार यांच्या प्रगतीला लावलेला हातभार**

## आपल्या पूर्वजांचे विज्ञान

**निरंजन घाटे**



**वि**ज्ञान म्हणजे विशेष ज्ञान. या सृष्टीबद्दल, अंतरिक्षाबद्दल, पंचमहाभूतांबद्दल, सजीव प्राण्यांबद्दल, मनोकायिक व्याधींबद्दल आणि औषधांबद्दल, सौंदर्यप्रसाधनांबद्दल, विविध धातूंच्या वापराबद्दल, वनस्पतींबद्दल, पीकपाण्याबद्दल, यंत्र-उपकरणांबद्दल, घरबांधणी-पूलबांधणी-नगररचना याबद्दल विशेष जे जे मानवाने जाणून घेतले, ते सगळे विज्ञानात येते. प्राचीन काळापासून मानवाने आपल्या पंचेंद्रियांमार्फत, कर्मेंद्रियामार्फत या सृष्टीचे आकलन करण्याचा प्रयत्न चालवला आहे, एकमेकांशी संवाद साधता यावा म्हणून खुणांची, हातवाऱ्यांची, चित्रलिपीची, अक्षर लेखनाची, मुद्रणाची भाषा निर्माण करण्याचा प्रयत्न जारी ठेवला आहे, आपले ज्ञान पुढच्या पिढ्यांपर्यंत पोचावे यासाठी काही यंत्रणा वा व्यवस्था सिद्ध केल्या आहेत. पदार्थविज्ञान, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, खगोलज्ञान, शरीरशास्त्र, वास्तूशास्त्र, दळणवळणाची साधने, जीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र, धातूशास्त्र, वैद्यकशास्त्र, यंत्रशास्त्र, नगररचना शास्त्र... अशा विविध शास्त्रांचा विकास त्यातूनच होत गेला आहे.

प्राचीन काळी ज्ञानसंपादनाची, ज्ञानाच्या वर्गीकरणाची, ज्ञानाचा संग्रह करण्याची साधने फार तुटपुंजी होती. परंतु मानवाने सृष्टीचे अवलोकन करून, सृष्टीतील बदलांचा मागोवा घेत काही ठोकताळे बसवले, गणिताच्या परिभाषेत ते मांडले, अमूर्त भावभावनांचाही आविष्कार करण्याचे संकेत निर्माण केले... निसर्गाच्या रहस्यांचा छडा लावला. निसर्गातील ऋतुचक्राचे गूढ जाणून घेतले. जीवो जीवस्य जीवनं या तत्त्वावरील प्राणीसृष्टीचे अस्तित्व आणि परस्पर साहचर्य यांचे व्यामिश्र नाते शोधताना माणसाने आपले बुद्धिचातुर्य दाखवून आपले प्रभुत्व प्रकट केले. निसर्गाच्या मर्यादांवर मात करण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधले. विज्ञानतंत्रज्ञानाद्वारे त्याने स्थलकालांच्या मर्यादांतून मार्ग काढण्याचा, जीवनात अधिकाधिक सुकरता आणण्याचा ध्यास करून, पक्ष्याप्रमाणे अवकाशात भ्रमण करण्याचा, माशाप्रमाणे सागरात संचार करण्याचा, पृथ्वीवर वेगाने अंतर कापण्याचा, थंडी-पाऊस-ऊन-वारा यांच्यापासून संरक्षण करण्याचा, व्याधीविकारांचा निरास करण्याचा, वार्धक्य आणि आजारपण लांबवण्याचा, हव्या त्या वातावरणात हवे ते पीक काढण्याचा, जीवन सुखावह करण्याचा सर्वंकष प्रयास चालवला. शारीरिक दृष्टीने आकाराने लहान असूनही अवाढव्य प्राण्यांना हाताळण्यास माणूस समर्थ ठरला. निसर्गाचे चक्र काही अंशी तरी आपल्या कलाने चालवण्याएवढी मजल त्याने गाठली. अंतरिक्षात भ्रमण करण्याची यंत्रणा त्याने विकसित केली. परग्रहांवरील सजीव सृष्टीशी संपर्क साधण्यासाठी मोहिमा सुरू केल्या. पृथ्वीच्या पर्यावरणातही बदल घडविण्याचा हव्यास धरला... अण्वस्त्रांची निर्मिती करून आत्मनाशाचाही धोका त्याने पत्करला. उपग्रहांद्वारे जगाच्या कानाकोपऱ्यात घडणारी घटना त्याचक्षणी जगात कुठेही दिसणे सुलभ झाले. ग्लोबल व्हिलेजची संकल्पना प्रत्यक्षात आणली...

क्लोनची निर्मिती करण्याचे तंत्र आत्मसात करून मानवप्राण्याच्या निर्मितीचे प्रयोग त्याने सुरू केले... मृत्यू हा विषय अजून त्याच्या आटोक्यात आलेला नाही. मृत्यूचा अटळपणा, आकस्मिकपणा त्याला अजूनही त्रस्त करतो आहे. मृत्यूवर जय मिळवण्याचे, मृताला जिवंत करण्याचे मंत्र-तंत्र तो शोधतो आहे. एक दिवस ते तंत्रही त्याला गवसले तर सृष्टिनिर्मात्याची भूमिकाही ईश्वराप्रमाणे त्याजकडे येऊ शकेल. माणसाच्या बुद्धीला, प्रज्ञेला मर्यादा नाही. त्याच्या सुप्त शक्तीला सतत काहीतरी खुणावत राहते. त्याची कृती विधायक का विध्वंसक यावर मानवी संस्कृतीचे भवितव्य निर्भर आहे.

सर्वसामान्य माणूस म्हणून विज्ञानाची जमेल तेवढी वैशिष्ट्ये जाणून घेणे ही आपल्या अस्तित्वाची एक अपरिहार्य अट बनून राहिलेली आहे.

प्राचीन काळातील विज्ञानविषयक मानवाच्या जाणिवा आजच्या प्रगत काळात प्राथमिक, अर्धवट, अपुऱ्या असल्याचे जाणवेल. परंतु एकेका कल्पनेचा साधकबाधक पाठपुरावा करीत राहून मानवाने येथवरची मजल गाठली आहे हेही विसरता कामा नये. जुन्या चुकीच्या कल्पनांतूनच वास्तवाचा मार्ग दिसणे शक्य झाले. आजही अनेक अशाच चुकीच्या कल्पना, भ्रममूलक कल्पना डोक्यात असतील. प्रयोगान्ती त्यांची सत्यता किंवा हास्यास्पदता स्पष्ट होत जाईल. ही प्रक्रिया सतत चालू राहणे अपरिहार्य आहे.

निरंजन घाटे यांच्या आपल्या पूर्वजांचे विज्ञान या पुस्तकातले लेख वाचताना गेल्या ५/१० हजार वर्षात माणसाने कितीतरी भ्रम-विभ्रमातून मार्ग काढत आजची तंत्रकुशलता विकसित केली आहे याची कल्पना येऊ शकते.

आरंभीचे दहाबारा लेख आरोग्य. शस्त्रक्रिया, कृत्रिम अवयव, औषधे याबद्दल आहेत.

मानवी इतिहासातला पहिला वैद्य लुलू हा मेसोपोटेमियामधला होय. त्याने दूर दूर प्रवास करून वैद्यकीय ज्ञान मिळवले होते. इजिप्त हे ख्रिस्तपूर्व काळात औषधांचे आणि औषधी ज्ञानाचे केंद्र होते. ग्रीक वैद्य हिप्पोक्रिटस याने इजिप्तमधील आणि पूर्वेकडील वैद्यकशास्त्राचा लाभ घेतला. डॉक्टरांसाठी त्याने तयार केलेली शपथ आजही प्रमाण मानली जाते. रुग्णाचे निरीक्षण करून त्याच्या नोंदी ठेवणे, नोंदीचा तुलनात्मक अभ्यास करणे हे त्याने सुरू केले. रोग बरा करण्यासाठी वैद्य हा निसर्गाला मदत करतो असे तो म्हणे. रोग होऊ नये म्हणून आहारावर नियंत्रण, व्यायाम, पायी चालणे, हवेत बदल करणे असे मार्ग तो सुचवत असे. भारतातूनही त्या काळात बरेच वैद्य औषधांचे व शस्त्रक्रियांचे ज्ञान घेऊन जात. इराण, रोम, चीन या देशात वैद्यराजांचा खर्च सरकार करीत असे. देवळांमध्ये सार्वजनिक रुग्णालये असत. इ. स. ३५० मध्ये त्यासाठी स्वतंत्र इमारती बांधण्यास रोममधील ख्रिश्चनांनी

आरंभ केला. भारतातील रुग्णालयांची वर्णने चिनी प्रवाशांनी केली आहेत. औषधविक्रीची दुकाने प्रथम बगदादमध्ये नवव्या शतकात निघाली.

प्राचीन भारतात वैद्यकशास्त्र चांगलेच विकसित झालेले होते. सुश्रुत संहितेत शंभरावर वैद्यकीय हत्यारांची वर्णने आहेत. ही हत्यारे पोलादाची असत. सुऱ्या, वस्तरे, करवती, सुया, चिमटे, पकडी, नळ्या, हातोडे, सीरिंज, शिंगाची हत्यारे, चांदी-सोने-तांबे-कांस्य यांचीही हत्यारे असत. पोटाच्या जखमा शिवण्यासाठी मुंगळ्यांचा वापर करीत. डोळ्यावरच्या शस्त्रक्रियाही होत. बॉबिलोनियामध्ये चार हजार वर्षापूर्वी डोळ्यावरील शस्त्रक्रियांचा उल्लेख सापडतो.

भारतात त्याकाळी नाक, कान यावर प्लॅस्टिक सर्जरी होत असे. कपाळावरील त्वचेचा उपयोग करून नवीन नाक तयार केले जाई. सुश्रुताने अशा शस्त्रक्रियेच्या वेळी रक्तस्राव होऊ नये म्हणून उपाय सुचवलेले आहेत.

धर्मयुद्धामध्ये जमखी झालेल्या सैनिकांवर युरोपात शस्त्रक्रिया केल्या जात. कवटीवरच्या काही शस्त्रक्रियांचे अवशेष पेरू-इका वगैरे ठिकाणी सापडले आहेत.

विविध व्याधींवर वनस्पतींच्या औषधांचा वापर करण्याचे ज्ञान अमेरिकन इंडियनपासून चीनपर्यंत सर्वत्र दोन हजार वर्षांपेक्षाही आधीपासून होते.

दक्षिण अमेरिकेतील इंडियन भूल देण्यासाठी क्युरेरचा वापर करीत.

डोकेदुखी आणि शारीरिक वेदना यासाठी वेदनाशामक औषधे वापरली जात.

पिवळ्या धोत्र्यामुळे गुंगी येते; जखमा शिवताना त्यामुळे रुग्णाला त्रास होत नाही.

अफू आणि गांजा यामुळे दु:खाचा, वेदनांचा विसर पडतो.

शिकारीच्या वेळी थकवा जाणवू नये म्हणून कोलंबियातील आदिवासी कोकोची पाने चघळत.

उदासीनता घालवण्यासाठी गांजाची पाने चावावी असे असीरियन मानत.

कानातली वेदना आणि डोकेदुखी थांबवण्यासाठी गांजाची पाने उपयुक्त असा ग्रीकांचा समज होता.

धोतऱ्याचे बी अतिरिक्त प्रमाणात खाल्ल्यास जीव जातो असा ओरॅकलच्या पुजाऱ्यांचा अनुभव होता. औषधांचा देव अस्कलेपियस याच्याजवळ जाऊन पुजारी समाधी लावत; त्यामुळे शारीरिक दु:ख कमी करण्याचे ज्ञान त्यांना प्राप्त होत असे.

मसाल्याचे पदार्थही औषधी गुणांनी युक्त असल्याचे ग्रीसमधील लोकांना ज्ञात होते.

डिंक, ॲबर, दालचिनी, लवंग, धूप यांचा लेप गरम करून मुका मार व जखमा यावर लावावा. दालचिनीचे तेल, लवंगीचे तेल दाढदुखी आणि सर्दी पडशावर उपयुक्त ठरते.

चीन मधील वैद्य, आफ्रिकेतील मांत्रिक, न्यू गिनीतले वैदू आणि रेड इंडियनांचे शामन मांत्रिक यांच्या परंपरागत औषधी वनस्पतींचा अभ्यास सध्या परदेशी कंपन्या करीत आहेत.

भाकरीवरची बुरशी जमखेवर लावल्यावर जखम लौकर भरून येते हे इजिप्तमधील वैद्यांना ज्ञात होते. सूर्य रोगजंतूंचा नाश करतो हे अथर्ववेदात सांगितले आहे.

पुरुषाच्या मूत्राचे भागशः ऊर्ध्वपातन करून वापरला तर पुरुषत्व वृद्धिंगत होते. (चीनची धारणा).

अलेक्झांड्रियामध्ये वैद्य हिरोफयलखने (इ. स. पू. तिसरे शतक) शवविच्छेदन करून मानवी शरीरांतर्गत अवयवांची माहिती करून दिली. रक्तवाहिन्या, नर्व्हज, स्नायू बंधने (टेन्डॉन्स) यांच्यातील भेद त्यानेच सर्वप्रथम दाखवला. मेंदूचेही वर्णन करणारा तो आद्य अभ्यासक ठरला. त्याचा शिष्य रॅसिस्ट्रॅटस याने कॅथेटरचा मूत्रमार्गासाठी प्रथम वापर केला.

गॅलेन हा ग्रीक शल्य वैद्य. शवविच्छेदनाद्वारे माकड व मनुष्य यांच्या शरीरातील साम्य त्याने स्पष्ट केले. शरीर शास्त्रावर त्याने १६ खंडांचा ग्रंथ लिहिला.

चीनमध्ये रोगप्रतिकारक लशी वापरल्या जात. पारा, सोने, प्राण्यांचे अवयव यांचा वापर औषध म्हणून केला जाई. देवीची बाधा होऊ नये म्हणून देवीच्या रोग्याचे अंग पुसलेला कापूस वाळवून धडधाकट व्यक्तीच्या नाकपुडीत ठेवत.

...प्राचीन काळीही वेगवेगळ्या वनस्पतींचा, धातूंचा, वस्तूंचा वापर माणूस शारीरिक व्याधींच्या व दुखण्याच्या उपचारादाखल करीत होता हे यावरून स्पष्ट होते. त्यावेळच्या काही औषधांचा वापर आजही चुकीचा ठरलेला नाही. बायबलविरोधी म्हणून ख्रिश्चनांनी प्राचीन ग्रंथ जाळले, पाखंडी म्हणून मुसलमानांनी ग्रंथालये बेचिराख केली. त्यामुळे ज्ञानाचे भांडारच नष्ट झाले.

**कृत्रिम दात -** कृत्रिम दात बसवण्याचे तंत्र इ. स. पूर्व सातशे वर्षांपासून मानवाला ठाऊक आहे. एटुस्कन दंतवैद्य पूर्ण कवळ्या, दंतपूल, काही दात कृत्रिमरीत्या तयार करून बसवत. हे दात दुसऱ्या माणसाचे किंवा बैलाचे असत. इ. स. ६००मध्ये माया संस्कृतीत कृत्रिम दात अलंकार म्हणून वापरले जात... कृत्रिम अवयवही लढाईत जायबंदी झालेल्या व्यक्तींना बसवता येत.

ॲक्युपंक्चर आणि मॉक्सी बसचन ही तंत्रे चीनमध्ये इ. स. पूर्व दोन शतकांपासून वापरात होती.

कुटुंबनियोजनाचे मार्गही त्यावेळी ज्ञात होते. हिंग, रानगाजर, ज्युनिपर, रुई, वाघनखी वगैरे वनस्पतींचा संततिप्रतिबंधासाठी उपयोग रोमन लोक करीत.

**सौंदर्य प्रसाधने -** सौंदर्यप्रसाधनांचा वापरही स्त्री-पुरुष प्राचीन काळापासून करीत आले आहेत. इजिप्तमधल्या पिरॅमिडमधील ममींच्या अभ्यासातून तत्कालीन

स्त्रियांची सौंदर्यप्रसाधने आणि आभूषणे यांची कल्पना येते.

नेफेरेती ही राणी स्थूल होती. तिचे नितंब रुंद होते. पोट सुटलेले होते. मांड्या जाड होत्या. स्तन खुरटे होते. परंतु साक्षात सौंदर्याचा अवतार असे तिचे वर्णन केले गेले आहे. अशियाई लोकांच्या सौंदर्यकल्पना पाश्चात्यांपेक्षा वेगळ्या आहेत. डोळ्यांचा बदामासारखा आकार नजरेत भरावा म्हणून ती त्याभोवती काळा रंग लावत असे. भुवया बाकदार रंगवत असे. सुवासिक तेलांनी मर्दन स्नान ती करीत असे. मुख दुर्गंधी दूर करण्यासाठी नॅट्रॉन चघळत राही. काखेत कस्तुरी, राळ वगैरे मिश्रण लावून घामाची दुर्गंधी दूर केली जाई. पालक व सब्याच्या रसात केस धुतले जात.

**आरसे -** सौंदर्य प्रसाधनांनी आपण आकर्षण कशा दिसतो हे पाहण्यासाठी आरसे हवेतच.

त्याकाळी आरसे कसे तयार केले जात? ऑब्सिडियन नावाच्या ज्वालामुखीजन्य काचेचा त्यासाठी वापर होई.

खूप पॉलिश केलेले तांब्याचे पत्रे आरशासारखे वापरण्यात यूरोप, आफ्रिका, आशिया यातील देश आघाडीवर होते.

चीनमध्ये काशाचे आरसे तयार केले जात. या आरशांचा सोन्याचांदीची चौकट असे. हे आरसे कमरपट्ट्यात लटकवले जात.

इजिप्तमध्ये ब्राँझचे छोटे आरसे तयार होत.

ग्रीकांनी पेटीबंद आरसे, आरसापेट्या तयार करण्यावर भर दिला.

रोमन लोक चांदीचे, तांब्याचे आणि काश्याचे आरसे तयार करीत.

काचेचे आरसे प्रथम प्रचलित करण्याचा मान लॅबॅननमधील सिडॉन शहराकडे जातो. (इ. स. पू. तिसरे शतक).

खिशात मावण्याएवढे लहान आरसे प्रथम रोमन लोकांनी वापरण्यास आरंभ केला. दीड-दोन इंच व्यासाचे बहिर्गोल काचेचे हे आरसे चेहरा मजेदार करून दाखवत.

भारतात सिकंदराच्या स्वारीनंतर आरसे आले असावेत असा एक अंदाज आहे. चिनी व्यापाऱ्यांनीही ते आणले असावेत.

साबण, दागिने, शिवणकाम, फॅशन, वैयक्तिक स्वच्छतेची साधने याबाबतही वेगवेगळ्या देशात वेगवेगळे मानदंड निर्माण झाले.

**शहरे आणि बागा -** शहरी वस्तू वाढू लागली तसतशी उद्याने, बागा यांची प्रथा सुरू झाली. तरंगत्या आणि लटकत्या बागा, चिनी बागा आणि झेन बगीचे यांनी त्यान नावीन्य आणले.

प्राण्यांची शिकार करून त्यांचे मांस खाण्याचा आदिम माणसाचा परिपाठ होता. पुढे काही प्राणी पाळीव म्हणून घरात शिरले. प्राण्यांची संग्रहालये निघाली. प्राण्यांना

दैवताचे रूप कोठे कोठे प्राप्त झाले. प्राण्यांना एक ठिकाणाहून दुसरीकडे नेणे त्यावेळी अवघड असे. प्राण्यांचे खेळही केले जात.

**स्पर्धात्मक खेळ -** स्पर्धात्मक खेळ पुढे सुरू झाले. इलियडमध्येही खेळांची वर्णने येतात.

भालाफेक, कुस्ती, मुष्टियुद्ध, धनुर्विद्या, पळणे, घोडदौड, रथांच्या शर्यती, लांब उडी, गोळाफेक, द्वंद्वयुद्धे, नौकानयन, जलतरण अशा अनेक स्पर्धा घेतल्या जात.

चष्मा, छत्र्या, तंबाखूचे सेवन करण्यासाठी पाइप, चित्रलिपी, लिपी वगैरे शोधांनीही विज्ञानाला दैनंदिन जीवनात स्थान मिळवून दिले.

निरंजन घाटे यांनी आपल्या वैज्ञानिक वाटचालीचा मागोवा घेताना आरोग्य, औषध योजना, सौंदर्यप्रसाधने, नगर राज्यातील उद्याने, प्राणी व वनस्पती, क्रीडा प्रकार आणि स्पर्धा छत्री, साबण, तंबाखू सेवनासाठी पाइप, आरसे, चष्मे, दागदागिने, शिवणेटिपणे वगैरे साधने वा वस्तू यांचे तपशील वगेवगळ्या देशांच्या, संस्कृतीच्या अनुषंगाने स्पष्ट केले आहेत.

पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतिशास्त्र, खगोलशासत्र, नगररचना शास्त्र, अलंकार निर्मितीशास्त्र वगैरे ज्ञानक्षेत्रे घेऊन वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये इ. स. पूर्व काळापासून आजवर झालेल्या प्रगतीचे काटेकोर अध्ययन दर्शन हा हेतू नसल्याने पूर्वजांच्या विज्ञानाचे सम्यक ज्ञान वाचकांना व्हावे अशी अपेक्षा ठेवण्यात काही हशील नाही. वृत्तपत्रीय सदर म्हणून लिहिताना ॲकॅडमिक शिस्तीची आणि तर्कसंगत मांडणीची गरज उरत नाही. त्यामुळे हे सगळे लेखन विशिष्ट सूत्रानुसार झालेले नाही. कुठलेही पान उघडावे आणि वाचू लागावे, त्यातील मनोरंजक तपशीलात हरवून जावे असे हे पुस्तक आहे. विज्ञान रंजक व्हावे, लोकप्रिय व्हावे म्हणून अशा प्रकारची पुस्तके उपयुक्त ठरतात. निरंजन घाटे त्याबाबत आधीपासूनच दक्ष आहेत. त्यामुळे सर्वसामान्य वाचकांनाही अशा पुस्तकांमुळे विज्ञानाची ओळख घडण्यास मदत होते.

**किंमत : १८० रु. सभासदांना : १२६ रु. पोस्टेज : २५ रु.**

# नम्र आवाहन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या परिवारात आपले स्वागत आहे.

पुस्तकविश्वातील नवीन, ताज्या, ज्ञान-मनोरंजनपूर्ण, बालसाहित्य, अनुवादित साहित्य, विज्ञान साहित्य अशा असंख्य पुस्तकांची ओळख करून देण्यासाठी, रसिक वाचकांना आमच्या आकर्षक योजना कळविण्यासाठी, आम्ही उत्सुक आहोत.

आपण फक्त आपला ई–मेल कळवावा.

पत्र पाठवा, फोन करा किंवा इंटरनेटवर कळवा.

आम्ही वाट पाहत आहोत

आमचा Email

**info@mehtapublishinghouse.com**

**mehtapublishinghouse@gmail.com**



# मुलाखत

# एस. आनंद

## नवायन पब्लिशिंग हाऊस

***सामाजिक समस्यांवरील पुस्तके व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी करणे हे खरे आव्हान***

*लंडन बुकफेअरने आणि ब्रिटिश कौंसिलने २००७चा जागतिक युवा प्रकाशन पुरस्कार देऊन गौरव केलेल्या एस. आनंद यांनी इ. स. २००३मध्ये नवायन ही प्रकाशन संस्था सुरू केली. समाजपरिवर्तनासाठी प्रकाशन हे उद्दिष्ट त्यांनी समोर ठेवले होते*

**प्रश्न - प्रकाशन व्यवसायाची सुरुवात तुम्ही कधी आणि कशी केली?**

उत्तर - ऑगस्ट २००३मध्ये प्रकाशन संस्था सुरू करण्याचा विचार मनात आला आणि नोव्हेंबरमध्ये चार पुस्तकांचा संच घेऊन बाजारात आलो. ४० ते ९६ पृष्ठांची ही पुस्तके होती आणि त्यांच्या किंमतीही ४० ते ६० रुपये अशा होत्या. नवायनमधील माझा सहकारी रविकुमार हा दलित आणि नागरी हक्क आंदोलनातील सक्रिय कार्यकर्ता होता आणि तामिळमध्ये लेखक तसेच समीक्षक म्हणून त्याचा बोलबाला होता. जातीशी संबंधित प्रश्नांचा साधकबाधक ऊहापोह करण्यासाठी अभ्यासपूर्ण पुस्तके प्रकाशित करण्यासाठी आपण प्रकाशन सुरू करावे असा त्याचा आग्रह होता. त्यावेळी विशिष्ट वैचारिक किंवा तात्त्विक भूमिका पुढे ठेवून पुस्तके काढणाऱ्या काही संस्था भारतात होत्या. वुमेन अनलिमिटेड, जुबान आणि स्त्री

यांचा स्त्रीवादी पुस्तकांवर भर होता. लेफ्टवर्डने डाव्या विचारसरणीचा पुरस्कार चालवलेला होता. तुलिका आणि तारा या संस्थांनी बालसाहित्याच्या क्षेत्रात काम करण्याचे ठरवलेले होते. या संस्थांच्या प्रकाशनांनी जागरुक वाचकांचे लक्ष वेधून घेतलेले होते. आपल्या सामाजिक जातिव्यवस्थेचा प्रभाव प्रत्येक व्यक्तीवर जाणवतो, परंतु त्याविषयी लिहिण्याचे टाळले जाते. ही गोष्ट आम्हाला खटकत होती. ही उणीव दूर करण्यासाठी आम्ही नवायन प्रकाशन संस्थेची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून दलितांचे धर्मांतर घडवून आणले. नव्या बौद्ध धर्माला उद्देशून त्यांनी नवायन या शब्दाचा वापर केला. तोच आम्ही प्रकाशन संस्थेच्या नावासाठी घेतला. समाजपरिवर्तनासाठी पुस्तकांचे प्रकाशन हे उद्दिष्ट पुढे ठेवून जातिव्यवस्थेवर प्रहार करणारी पुस्तके प्रसिद्ध करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करण्याचा आमचा प्रयत्न होता. इतर प्रकाशक या प्रश्नाला बगल देऊ पाहत. कमर्शिअल, ॲकॅडमिक आणि स्वतंत्र प्रकाशक अशा वादग्रस्त विषयांना स्पर्श करायला धजत नसत.



**एस. आनंद**

**प्रश्न - तुमची पुस्तके इतर प्रकाशकांपेक्षा वेगळी का ठरतात?**

उत्तर - कुठल्याही ॲकॅडमिक - शैक्षणिक प्रकाशकापेक्षा आम्ही जातिव्यवस्थेचे सर्वांगीण विश्लेषण व्हावे अशी पुस्तके काढण्यावर भर देतो. आरंभी आमच्या पुस्तकांबाबत इतर प्रकाशक आणि विक्रेते साशंक असत. परंतु अशा पुस्तकांनाही मागणी असते हे आता त्यांच्या लक्षात आले आहे.

**प्रश्न - दलित साहित्याचे प्रकाशन हे तुमचे खास बलस्थान आहे असे मानले जाते. तेच तुम्हाला अभिप्रेत आहे ना?**

उत्तर - नाही. तसा समज करून घेणे गैर ठरेल. जातिव्यवस्थेचा विचार हा केवळ दलितांशी निगडित नाही. आमचे लक्ष्य जातिविरहित समाजरचना हे आहे. डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेली दलित चळवळ ही जातिव्यवस्थेला जोरदार शह देणारी आहे आणि दलितांनी लिहिलेल्या साहित्याचा प्रसार करणे हे नवायनचे एक उद्दिष्ट

आहे. दलित लेखकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची आमची प्रतिज्ञा आहेच. असे असले तरी ब्राह्मणी विचार प्रवाहाचा आणि ब्राह्मणांचा समाचार घेण्याचेही ध्येय आमच्यासमोर आहे. 'ब्राह्मण आणि क्रिकेट' हे आमचे पुस्तक त्या दृष्टीने बघण्यासारखे आहे. त्याच्या अनेक आवृत्त्या निघालेल्या आहेत.

**प्रश्न - आतापर्यंत तुम्ही किती पुस्तके प्रकाशित केली आहेत?**

उत्तर - सोळा. इ. स. २००८ मध्ये बरीच पुस्तके येतील.

**प्रश्न - त्यापैकी कोणती पुस्तके गाजली?**

उत्तर - दलितस् इन द्रविडियन लँड या पुस्तकाच्या पहिल्या तीन महिन्यात ९०० प्रती विकल्या गेल्या. दि ब्लाइंडनेस ऑफ इनसाइट हे दिलीप मेनन या इतिहास तज्ज्ञाचे पुस्तक ॲकॅडमिक असले तरी चांगले खपत आहे. भारतीय समाजातील जातिव्यवस्थेचे स्वरूप उलगडून दाखवणारे हे पुस्तक जात या संकल्पनेवरही मूलगामी भाष्य करते.

**प्रश्न - लंडन बुक फेअरमध्ये आपण काही पुस्तकांचे विमोचन केले. त्याबद्दल काही सांगता येईल?**

उत्तर - निश्चितच! मराठीतील एक गाजलेले कवी, दलित पँथरचे नेते नामदेव ढसाळ यांच्या कवितांचे दिलीप चित्रे यांनी केलेले अनुवाद- नामदेव ढसाळ : पोएट ऑफ दि अंडरवर्ल्ड हे पुस्तक आम्ही लंडनमध्ये रिलीझ केले. अनुवादक दिलीप चित्रे हे द्वैभाषिक कवी असून साहित्य अकादमीचा पुरस्कारही त्यांना मिळालेला आहे. या पुस्तकामुळे कवी म्हणून नामदेव ढसाळ यांची प्रतिमा उजळून निघाली आणि एखाद्या मोठ्या पुरस्कारासाठी त्यांचे नाव घेतले जावे असे मला वाटते. नोबेलसारख्या मान्यवर पुरस्कारासाठीही या पुस्तकाचे नाव घेतले जावे असे म्हणण्यात मी अतिशयोक्ती करीत आहे असे कोणाला वाटू नये असे मी म्हणेन.

**प्रश्न - भारतीय युवा प्रकाशक म्हणून २००७मध्ये तुमची निवड झाली. पुरस्काराच्या स्पर्धेची माहिती तुम्हाला कशी कळली?**

उत्तर - हिंदू या दैनिकात मला या स्पर्धेची माहिती वाचायला मिळाली. खरे तर माझ्या एका शेजाऱ्याने मला या स्पर्धेबद्दलच्या माहितीचे कात्रण दाखवले आणि अर्ज करण्याबद्दल सुचवले. या स्पर्धेबाबत ब्रिटिश कौंसिलची भूमिका मोठी असते याची मला कल्पना होती.

**प्रश्न - युवा प्रकाशकांसाठी संदेश द्यायचा झाला तर तुम्ही कशावर भर द्याल?**

उत्तर - संदेश देण्याएवढा मी कोणी मोठा प्रकाशक नाही. मात्र सामाजिक समस्यांवरील पुस्तके व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी आणि फायदेशीर करण्याचे हे आव्हान स्वीकारण्यात खरे कौशल्य आहे असे मला वाटते.

**प्रश्न - चांगले पुस्तक कुठले?**

उत्तर - चांगले पुस्तक आपली करमणूक करते; आणि आपले प्रबोधनही करते. त्यात मुद्रण दोष नसावेत. त्याची निर्मिती दर्जेदार असावी. ते आकर्षक वाटावे.

**प्रश्न - नवायनला येत्या पाच वर्षात कुठवर मजल गाठता येईल?**

उत्तर - आमची प्रकाशन संस्था ही आज अगदी छोटेखानी आहे. एकाच संगणकावर सर्व काम मुख्यत: चालते. वर्षभरात दोन संपादक आणि काही कर्मचारी नेमण्याची क्षमता यावी असे वाटते. संपादक दलित वर्गातील असावेत असा आमचा प्रयत्न राहील. आपला प्रकाशन व्यवसाय हा सामाजिक प्रबोधनपर पुस्तकांसाठी काही विशेष प्रयत्नशील आहे असे दिसत नाही. इ. स. २०१२ पर्यंत नवायनचा व्याप आणि दरारा वाढलेला असेल. कुठल्याही पुस्तकाची सध्या दोन हजाराची आवृत्ती आम्ही काढून खपवू शकतो. किमान पाच हजार प्रतींची पहिली आवृत्ती निघावी अशी विक्रेत्यांची आणि ग्राहकांची साखळी आम्ही येत्या तीनचार वर्षात निर्माण करू शकू असे वाटते. सामाजिक समस्यांबद्दलची जाणीव आणि प्रबोधनाची चळवळ अधिक व्यापक होत जाईल तसतशी आमच्या प्रकाशनांची वितरण व्यवस्था व्यापक होत जाईल.

(एस.के.घई यांनी घेतलेली मुलाखत. पब्लिशिंग टुडे, एप्रिल २००७)
(सौजन्य : वन टू वन : एस.के. घई इन्स्टिट्युट ऑफ बुक पब्लिशिंग,नवी दिल्ली.)


**‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ची दर्जेदार साहित्यसंपदा आता ‘ऐका’ संपूर्ण महाराष्ट्रात आकाशवाणीवर...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यवधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. ‘मेहता मराठी ग्रंथजगत’ सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आकाशवाणीच्या सहकार्याने दर मंगळवारी, सकाळी ठीक ७वाजून २५मिनीटांनी आपण ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’च्या पुस्तकांची ओळख ‘ऐकू’ शकाल. ‘इथे पुस्तके भेटतात’या कार्यक्रमात.

**चला तर मग... भेटूया दर मंगळवारी सकाळी ठीक ७वाजून २५मिनीटांनी संपूर्ण महाराष्ट्रात ‘आकाशवाणीवर’.**




# वेळच्या वेळी

**प्रमोदिनी वडके-कवळे**

उन्हाळ्याची  सुट्टी जवळजवळ संपत आल्यावर आम्ही कोकणात डॉ. खांडेकरांच्या बंगल्यावर जायला निघालो.

खांडेकर आमचे फॅमिली डॉक्टर. आलिबागजवळच्या सासवने गावात अगदी समुद्राच्या जवळच त्यांनी एक टुमदार बंगली विकत घेतली होती. शहरी जीवनक्रमाचा कंटाळा आला की दोनचार दिवस ते तिकडे जाऊन यायचे आणि नंतरचे कित्येक आठवडे आम्हा शहरवासियांना अगदी तिखटमीठ लावून आणि फोडणी देउन गावाकडच्या गोष्टी सांगत रहायचे. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर शिडात वारं भरून आलं की त्यांचं तारू भन्नाट सुटायचं.  दरवेळी तिकडे जाताना ते आमच्यासारख्याच काही स्नेहीमंडळीनांही चलण्याचा आग्रह करायचे. बंगल्याची देखभाल करायला एक कुटुंब ठेवलं होतं.  त्या बाईंच्या, नानींच्या अतिथ्याबद्दल आणि पाककौशल्याबद्दल सांगायचे.  तिथला निसर्ग,शांतता, सागरी मार्गाने गेलं तर मुंबईपासून अवघ्या काही मिनिटांच्या अंतरावर असूनही अद्याप बाजारी न झालेला तिथला निवांत सागरकिनारा, शिल्पकार करमरकरांचं घर, तिथे मांडलेलं शिल्पकृतींचं दुर्मिळ प्रदर्शन□ या सगळ्याबद्दल भरभरून बोलायचे. जेणेकरून ऐकणाऱ्याच्या मनात सासवन्याबद्दल ओढ निर्माण झालीच पाहिजे.

त्यांच्या या जादूचा आमच्यावरही परिणाम व्हायचा.  पण रोजच्या यांत्रिक वेळापत्रकाचा प्रभाव त्यापेक्षा जास्त ठरायचा आणि मनात असूनही आमचं सासवन्याला जाणं दरवेळी राहून जायचं.

पण यावेळी आमच्या आणि त्या सासवने नामक निसर्गकिमयेच्या ग्रहांची सकारात्मक युती झाली आणि आम्ही नक्की जायला निघालो.

सकाळी सहाला निघू म्हणता म्हणता आठ वाजलेच. घरातून कुठेही जायला निघताना होणारी धुमश्चक्री सुरू होती□ 'हे घेतलंस का?... ते ठेवलंस का?...'

आणि तेवढ्यात फोन वाजला.

बहुधा त्याच्या मैत्रिणीचा असावा असं वाटून चिरंजीवांनी तो घेतला. पण तो माझ्या मैत्रिणीचा निघाला. तेव्हा 'आई आता निवांत गप्पा मारत बसू नकोस. आधीच उशीर झालाय.' असा दम भरूनच त्याने माझ्या हातात फोन दिला.

पलिकडे सविता होती आणि ती चक्क हुंदके देत होती.

''काय झालं ग?'' मी घाबरून विचारलं.

''तुला मंजूबद्दल कळलं?'' माझ्या छातीत एकदम धस्स झालं. मंजू आमची एक हुशार मैत्रीण. तिला एकदम काय झालं असेल? मनात कितीतरी अशुभ शंका गर्दी करून गेल्या.

''शेवटी तिने आपलं म्हणणं खरं केलं बघ.□ गेलीच निघून ती त्या केरळमधल्या कुठच्याशा मठात रहायला□ कित्ती समजावलं होतं मी तिला,□ पण मलासुद्धा थांग लागू दिला नाही तिने जाताना.'' सविताचे हुंदके थांबतच नव्हते. सविताचं बोलणं थोडं उशिरा मनात झिरपलं आणि मीही सुन्न झाले.

मंजू माझीपण मैत्रीण असली तरी सविताच्या घराजवळ रहात असल्यामुळे मंजूचं आणि सविताचं जास्तच गूळपीठ होतं. नाटकं-सिनेमा-संगीताचे कार्यक्रम... मंजू सविताला ओढून न्यायची सगळीकडे. तिला या सगळ्याचीच फार हौस. नेहमी म्हणायची 'आपणच आपल्याला समृद्ध केलं पाहिजे.'

दोघींनीही लग्नानंतर घरातले व्याप सांभाळून पुढचं शिक्षण घोतलं होतं. मंजूचं वाचन अफाट आणि स्मरणशक्तीही दांडगी. वाचलेले संदर्भ तिला नेमक्या वेळी बरोबर आठवायचे. त्यामुळे तिचं बोलणं नेहमीच खूप छाप पाडून जायचं. मात्र स्वभाव अतिशय हळवा. साध्यासुध्या घटना सुद्धा मनाला खोलवर लावून घ्यायची आणि लगेच चेहरा पाडून बसायची. त्यावरून आम्ही तिची खूप चेष्टा करायचो. सविता सतत तिला टोकायची, ''एवढं हळवं राहून कसं चालेल?''

पण कितीही वाद झाले तरी दोघींच्यातले बंध अगदी दृढ होते. मंजू न सांगता निघून गेली हे सविताच्या मनाला लागणं अगदी साहजिक होतं.

गेल्याच वर्षी साध्या आजाराचं निमित्त होउन मंजूचे यजमान गेले. मुलगा दिल्लीत स्थायिक झालेला. मंजू इकडे एकटीच पडली. मुलगा बोलावत होता. पण मंजूला वाटायचं, जन्मापासून मी पुण्यात वाढलेली

दिल्लीची संस्कृती अगदीच वेगळी. आता या वयात नव्या ठिकाणी जाउन आपण रुजणार नाही. उलट तिथे जास्त एकट्या पडू□ तिच्या स्वभावाचा विचार करता ते खरंच होतं.

ती मनाच्या अशा द्विधा अवस्थेत असतानाच दक्षिण भारतातल्या एका धार्मिक संस्थेशी तिचा संपर्क आला आणि बाईसाहेब त्याच्या खूप आहारी गेल्या. संवेदनाक्षम स्वभाव, एकटेपणाची भीती आणि अध्यात्माचा आधार याचा विलक्षण गुंता तिच्या मेंदूत झाला होता आणि आम्ही कुणीच तो सोडवू शकत नव्हतो.

गेल्या दोनचार महिन्यांपासून ती आम्हाला तिचा सर्वसंगपरित्याग करून केरळच्या मठात जायचा बेत बोलून दाखवायची आणि आम्ही तिचं मन वळवायचा प्रयत्न करायचो. आयुष्याला सतत सन्मुख रहाणाऱ्या माणसासाठी अध्यात्माची वाट सोपी नसते.

एरवी आम्हाला ज्ञान शिकवणाऱ्या मंजूला हे कसं कळत नव्हतं? एकटेपणापासून पळण्यासाठी हा योग्य उपाय नव्हता. मंजू मुळात अध्यात्मिक वृत्तीची नव्हतीच केवळ क्षणिक आवर्तांच्या भरात घेतलेला हा निर्णय तिला पेलेल का?

''आई निघायचं का?'' सुपुत्राने जोरदार हाक मारली तेव्हा मी भानावर आले आणि चेहऱ्यावर काही न दाखवता मुलांबरोबर उत्साहाचा मेकअप चढवून गाडीत बसले.

पण मनातला मंजूचा विचार बाजूला सारता येत नव्हता. एकसारखे सविताचे हुंदके कानात घुमत होते.

साडेतीन तासांच्या प्रवासात मला बाहेरचा निसर्ग जणू दिसलाच नाही. कानात-मनात एकच प्रश्नचिन्ह. जगण्याच्या सगळ्या वाटांवर भरभरून प्रेम करणारी माणसांचा प्रचंड लोभ असलेली मंजू. तिचं वाचन, तिचं बोलण, घर सजवणं, एखादा पदार्थ करणं... सगळ्यावर तिच्या कौशल्याची आणि बुध्दिमत्तेची छाप स्पष्ट दिसायची. या सगळ्याकडे पाठ फिरवताना तिला काहीच वाटलं नसेल?

मुलांचा जल्लोष वाढला तेव्हा आम्ही सासवन्याला आल्याचं माझ्या लक्षात आलं. आता मनातून मंजूला बाजूला सारायलाच हवं होतं.

डॉक्टरांच्या बंगल्यावर पोचताच साठीच्या वयातल्या एक विधवा बाई समोर आल्या. ''या आमच्या नानी.'' खांडेकर वहिनींनी ओळख करून दिली. सावळा गोल चेहरा, ठेंगणा बांधा आणि नेटकं नऊवारी नेसणं. चेहऱ्यावरचे भाव किंचित अलिप्त. पण ओठांवरचं हसू मात्र मनापासूनचं असल्याचं जाणवत होतं.

''दमलात ना?'' नानींनी आपुलकीनं विचारलं. आम्ही उन्हातून आलो

म्हणून गेल्यागेल्या कोकमाचं गार सरबत केलं आणि सोबत पळसाच्या पानावर पिवळेधम्मक गरे पुढे केले.

''वा! आपल्या झाडाचे?'' डॉक्टरांनी खूष होउन विचारलं.

''नाही. आपल्या झाडाला यंदा फळ धरलंच नाही. हा फणस शेजारच्या धाक्रसांनी काल बंडूसाठी दिला होता.''

''मग बंडूला ठेवले की नाही गरे?''

''नको. आम्हाला इथे मोप मिळतात. शहरगावच्या माणसांना कुठे असा ताजा फणस मिळणारे?''

मला नानींच्या अतिथ्यधर्माचं कौतुक वाटलं.

पण ते थोडा वेळच टिकलं. संध्याकाळी आम्ही समुद्रावरून फिरून आलो तर नानी गायब. कडकडून भूक लागली होती. स्वयंपाकघरात सगळं तयार दिसत होतं. चुलीवर वाफेला लावलेल्या भाताचा वास अंगणापर्यंत दरवळत होता. पण नानींचा पत्ताच नव्हता.

डॉक्टरांकडचं कुणी काही बोललं नाही म्हणून आम्हालाही गप्प बसावं लागलं. अर्ध्या तासाने नानी उगवल्या. चेहरा तृप्त हसरा. अस्साच धडा शिकवायला हवा सासरच्या माणसांना.''

''काय झालं?'' प्राजक्ताने विचारलं

''अवंतिका बघता ना तुम्ही? आज त्यात□नानी उत्साहाने सांगायला लागल्या. म्हणजे इथे आम्हाला भुकेलं ठेवून या बाईसाहेब शेजारच्या धाक्रसांकडे टीव्ही. बघायला गेल्या होत्या तर! अनुकूल झालेलं माझं नानींबद्दलचं मत एकदम बदललं.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही उठलो तेव्हा आपल्या थकल्यावाकल्या शरीराने नानी चक्क योगासनं करत होत्या. मात्र ती झाल्याबरोबर त्यांनी अंगणातल्या फुटक्या रांजणात हात घालून मोगऱ्याच्या फुलांची टोपली बाहेर काढली.

''वा!'' मी प्रसन्न मनाने त्यांना दाद दिली.

नानी खूष. ''थोडी माझ्या देवाला आणि थोडी तुमच्या पाहुण्यांच्या गजऱ्यांसाठी.''

''रोज एवढी फुलं निघतात?''

''कुठचं आलंय? अहो धाक्रसांची नात आलीय ना सुट्टीला. माझ्या आधी उठून पोरटी फुलं काढून नेते. माझा देव रहातो तसाच. म्हणून मी आदल्याच दिवशी कळ्या काढून ठेवते आता. देवपूजेपेक्षा ह्यांचं नटणंमुरडणं मोठं आहे का?''

□ बंडूसाठी मुद्दाम फणस देणाऱ्या ज्यांच्याकडे नानी हक्काने टीव्ही. पहायला जात होत्या त्या धाक्रसांच्या नातीबद्दलचं नानींचं मत मला पुन्हा

कोड्यात पाडून गेलं.

थोडया वेळाने आम्ही सगळे चहापाणी उरकून समुद्रस्नानाला निघालो तेव्हा बंडू उठला.□ ''आता पटकिनी आंघोळ उरका आणि निघा.'' नानी गरजल्या.

''पण मग देवपूजा?''

''करीन मी.''

''कालपण तूच केलीस.''

''मग कुठे बिघडलं? हे बघ देवापेक्षा चाकरी महत्त्वाची. देव देव्हाऱ्यात बसून आपल्या पोटाला घालत नाही...''

मी पुन्हा थक्क. नानींचा स्वभाव नेमका होता तरी कसा? त्यांच्या बोलण्यातला आणि वागण्यातला विरोधाभास मला पदोपदी दिसत होता.

दुपारची जेवणं झाल्यावर मंडळी पेंगली. नानी मागच्या अंगणात नारळाच्या झावळ्या नीट कापून केरसुणीसाठी काड्या जमवत होत्या. मी तिथेच सावलीत बसून त्यांचं काम बघत राहिले. हाताबरोबर नानींचं तोंडही चालू झालं□ सासवन्याचा इतिहास, ह्या बंगलीचा भूतकाळ, स्वत:च्या तरुणपणाच्या गतवैभवाच्या आठवणी,□ नानींचं बोलणं रसाळ होतं. ऐकणाराला गुंगवून ठेवणारं!.. दुपारच्या निवांत वेळी निसर्गाच्या सान्निध्यात बोलताबोलता आमची छान गट्टी जमली.

आता मात्र मला राहवेना. समर्पक म्हणी वापरत साधी उदाहरणं देत आयुष्याचं तत्त्वज्ञान सहजपणे सांगणाऱ्या नानी मधेच अशा का वागत असतील? त्या परस्परविरोधी वागण्यामागचं त्यांचं नेमकं तत्त्वज्ञान कोणतं असेल?... शेवटी मी विचारलंच त्यांना.

त्या हसल्या. ''हे बघा मी काही कुणी साधुसंत नाही. साधी संसारी बाई. पण आयुष्याने इतके वेडेवाकडे अनुभव दिलेत ना मला, त्यावरून मी एक ठाम ठरवलंय. आपण मसाल्याच्या डब्यासारखं वागायचं. कशाची कशात गल्लत करायची नाही.''

''मसाल्याच्या डब्यासारखं म्हणजे?''

''तुमच्या स्वयंपाकघरात मसाल्याचा डबा असेल ना? हळद, तिखट, हिंग, जिरे, मोहरी सगळे पदार्थ आमटीला चव आणायला गरजेचे असतात. पण तरीही ते वेगवेगळेच ठेवावे लागतात. एकत्र केले तर आमटीचं काय होईल? तसंच आपल्या आयुष्याचं असतं. देवधर्म, आपल्या गरजा, पैसा, शेजारीपाजारी, चार घटकांची करमणूक, आपली नोकरीचाकरी, कर्तव्य सगळं महत्त्वाचं असतं हो आयुष्यात. पण कोणत्या वेळी कशाला महत्त्व द्यायचं हे कळलं नाही तर त्याचा काय उपयोग? मला सांगा दुपारच्या जेवणाला मी□-''

नानी बोलतच होत्या. पण माझे कान मात्र बंद झाले होते. कालपासून थोडासा विसर पडलेली मंजू अचानक पुन्हा मनात येउन उभी राहिली होती. नानींचं हे तत्त्वज्ञान तिनेही काही दिवसांपूर्वी आम्हाला एका इंग्लिश पुस्तकातून वाचून सांगितलं होतं.

□रोजचं जगणं सुरळीत चालण्याची गुरूकिल्ली म्हणजे वेळच्या वेळी आणि जागच्याजागी... आपल्या वस्तू, कामं या गुरूकिल्लीनुसार केली की समस्यांचं प्रमाण आपोआप कमी होतं□

नानींच्याही आताच्या सांगण्याचं सार हेच होतं की. फक्त फरक एवढाच होता की नानी ते तत्त्वज्ञान प्रत्यक्ष जगत होत्या.

''काय हो? पटतंय ना मी म्हणतेय ते?'' नानी विचारत होत्या.

''हो हो बरोबर आहे. प्रत्येक भावना तिच्या जागीच ठेवायला हवी.'' मी त्यांना उत्तर दिलं.

पण मनातलं प्रश्नचिन्ह तसंच होतं□ जे नानींसारख्या अशिक्षित बाईला जमलं ते मंजूला मात्र□?...

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११ ०४८.



**'तुकयाची आवली'**

मंजुश्री गोखले

आकाशाएवढ्या तुकारामांची पत्नी असूनही जमिनीवरच ठाम उभी राहून नियतीशी एकटीनं झुंज देणारी...

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

# पुरस्कार

## * तुका म्हणे साहित्य पुरस्कार २००८

बुलढाणा येथील 'तुका म्हणे' या वाङ्मयीन साहित्य चळवळीच्या माध्यमातून देण्यात येणारा 'तुका म्हणे साहित्य पुरस्कार २००८' मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या 'तुकयाची आवली' (लेखिका-मंजुश्री गोखले) यांच्या पुस्तकास मिळाला आहे.

तुका म्हणे साहित्य पुरस्काराचे हे आठवे वर्ष आहे. आजवर १०५ साहित्यिकांना सदर पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले आहे.

## * 'पं. भीमसेन जोशी यांना 'भारतरत्न'

अभिजात भारतीय संगीत परंपरेचे मूर्धन्य गायक पंडित भीमसेन जोशी यांना ३ नोव्हेंबर रोजी 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर करण्यात आला. किराणा घराण्याचे प्रतिनिधित्व करणारे भीमसेनजी गेली सत्तरहून अधिक वर्षे आपल्या तेजस्वी, दमदार आणि आक्रमक सुरांनी रसिकांच्या मनावर राज्य करत आले आहेत. वयाच्या १९व्या वर्षापासून मैफली गाजवणारे भीमसेनजी आज वयाच्या ८६व्या वर्षीही गायनात मग्न आहेत. कलाक्षेत्रात ज्येष्ठ शहनाईवादक उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांच्यानंतर सात वर्षांनी संगीतक्षेत्रातील कलाकाराला हा सर्वोच्च सन्मान सरकारतर्फे देण्यात आला आहे. 'पंडित भीमसेन जोशी यांना भारतरत्न सन्मान प्रदान करताना राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांना अतिशय आनंद होत असल्याचे' राष्ट्रपती भवनातून सांगण्यात आले.

कर्नाटकमधील गदग या गावी ४ फेब्रुवारी १९२२ रोजी जन्मलेल्या भीमसेनजींना यापूर्वी अनेकानेक पुरस्कारांनी गौरवण्यात

आले आहे. १९७२ मध्ये पद्मश्री, १९८५ मध्ये पद्मभूषण तर १९९१ मध्ये त्यांना पद्मविभूषण सन्मान प्रदान करण्यात आले आहेत.

संगीताच्या ध्यासाने लहानपणीच घरातून पळून गेलेल्या छोट्या भीमसेनजींचे आयुष्य म्हणजे अविरत कष्ट, सततचा संघर्ष, अखंड परिश्रम, एकनिष्ठ गुरुसेवा आणि संगीतप्रती असणारी अवचिल श्रद्धा यांची कहाणी आहे. किराणा घराण्याची स्वरनिष्ठ गायकी जपत असतानाच ठिकठिकाणच्या प्रवासात जिथे सुंदर, सुरेल काही गवसले तिथून गोळा करत, भीमसेनजींनी स्वत:ची अशी वैशिष्टपूर्ण गायकी निर्माण केली आहे. घराण्याच्या सांगीतिक चौकटी त्यांनी जपल्या पण इतर सुंदर गायकीचे अंशभागही आपल्या गायकीनुरूप त्यात मिसळले. त्यामुळे त्यांच्या आक्रमक, जोशपूर्ण गायकीत जयपूर, पतियाळा, आग्रा घराण्याची सौंदर्यतत्त्वेही जाणकारांना डोकावताना दिसतात. पुण्यात त्यांच्या पुढाकाराने गेली पन्नासहून अधिक वर्षे सुरू असणारा 'सवाई गंधर्व संगीत महोत्सव' हे त्यांच्या निरलस गुरुभक्तीचे अजोड उदाहरण आहे.

भीमसेन जोशी यांचा भारतरत्न पुरस्कार देऊन केलेला गौरव हा महाराष्ट्राच्या सर्व जनतेचाच सन्मान आहे, असे गौरवपूर्ण उद्‌गार मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी काढले.

### * विजया मेहता यांना पुल स्मृती पुरस्कार

''पु. ल. व सुनीताबाईंनी माझा निगराणी केली आहे. जबरदस्त मजा घेत काम केले पाहिजे हे मी पुलंकडून शिकले. स्वत:ला मिळालेला आनंद सगळ्यांबरोबर वाटणे म्हणजे आनंद, हेही पुलंनी शिकविले,'' असे भावोद्‌गार ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता यांनी 'पु. ल. स्मृती सन्मान' स्वीकारताना काढले.

पु. ल. देशपांडे यांच्या नावाचा हा पुरस्कार पुलोत्सवात ज्येष्ठ लेखक विंदा करंदीकर यांच्या हस्ते मेहता यांना प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, एक लाख रुपये, मानपत्र असे त्याचे स्वरूप आहे.

त्या म्हणाल्या, ''मला पुलंच्या नावाचा पुरस्कार स्वीकारणार का, असे विचारण्यात आल्यावर मी लगेच हो म्हणाले. पुलंच्या नावाच्या पुरस्काराला नाही कसे म्हणणार? त्यात तो विंदांच्या हस्ते मिळतोय. मी महाविद्यालयात असताना विंदा आमचे 'हीरो' होते. वसंत बापट, मंगेश पाडगावकर व विंदांच्या कविता वाचनाच्या कार्यक्रमाला आम्ही तिकीट काढून जायचो. 'रंगायन'च्या चळवळीतही ते आले. 'रंगायन'च्या साहित्य बाजूच्या स्वरूपात विंदांचा मोठा सहभाग होता.

''पुलंसाठी काय अपूर्वाई वाटायची! पुलंबरोबर फिरायला जायला मिळतं म्हणून नाटकात नसलेले लोकही तालमीला यायचे. कला सादर करताना प्रेक्षकांशी १०० टक्के संवाद झाला पाहिजे, असे ते सांगत. सगळ्या गोष्टीत त्यांना आनंद घेता यायचा व तो आम्हाला मिळावा म्हणून आम्ही त्यांच्याभोवती घुटमळत असायचो.''

स्वागताध्यक्ष डॉ. मीना प्रभू यांनीही पु. ल. देशपांडे यांच्या आठवणी जागविल्या. डॉ. नरेंद्र जाधव, शशांक परांजपे, विजय वर्मा, वीरेंद्र चित्राव आदी उपस्थित होते. सुप्रिया चित्राव यांनी सूत्रसंचालन केले.

*** केशवसुत पुरस्कार**

'आम्ही कोण म्हणुनी काय पुसता', 'एक तुतारी द्या मज आणुनि' आणि 'झपुर्झा गडे झपुर्झा' या कवितांचे सादरीकरण करून ज्ञानपीठ पुरस्कारविजेते ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांनी आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत यांना ७ नोव्हेंबर रोजी अभिवादन केले. त्याचबरोबर आपल्या काही कवितांचे वाचन करून रसिकांना 'जगण्याचा ब्रह्मानंद' या काव्यपंक्तीचा प्रत्यय दिला.

दामले कुटुंबीय आणि आशय सांस्कृतिक तर्फे राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांच्या हस्ते करंदीकर यांना 'केशवसुत पुरस्कार' प्रदान करण्यात आला. माजी संमेलनाध्यक्षा विजया राजाध्यक्ष, राजाभाऊ दामले, 'पाथफाइंडर'च्या नीलिमा खरे, 'आशय'चे वीरेंद्र चित्राव आणि सतीश जकातदार या वेळी उपस्थित होते.

हा पुरस्कार प्रदान केल्याबद्दल संयोजकांविषयी कृतज्ञता व्यक्त करून करंदीकर म्हणाले, ''मी आज भाषण करून त्रास देणार नाही. त्याऐवजी केशवसुतांच्या कवितांचे वाचन करणार आहे. माझ्याही कविता सादर कराव्यात असा आग्रह झाल्यामुळे काही कवितांचे वाचन करीन.''

'देणाऱ्याने देत जावे' या कवितेविषयी भाष्य करताना ते म्हणाले, ''ही कविता मी लिहिली खरी; पण ती जगले पु. ल.'' बरगड्यांच्या तुरुंगातून मी हृदयाला मुक्त केले, 'ये यंत्रा ये', 'मिसीसिपीमध्ये मिसळू दे गंगा' आणि 'तुकोबाच्या भेटी शेक्सपिअर आला' या कविता विंदांनी सादर केल्या.

राजाध्यक्ष म्हणाल्या, ''केशवसुत यांच्यानंतर कुसुमाग्रज, अनिल आणि करंदीकर हे मराठी कवितेचे मानदंड आहेत. केशवसुतांप्रमाणे विंदांनी कवितेची वेगळी वाट शोधली. दोघांनीही कवितेमध्ये संगीत आणि अध्यात्म या दोहोंची सांगड घातली. स्त्रीचे सामर्थ्य आणि कृतज्ञता हे दोघांच्याही कवितेचे साम्यस्थळ आहे. कवितेचा प्रवाह वाहता ठेवणाऱ्या विंदांचे वाचकांबरोबर पुढच्या पिढीतील कवींनाही देणं आहे.''

'केशवसुतांची अलौकिक कविता पुढे नेणारे अलौकिक कवी', अशा शब्दांत कर्णिक यांनी विंदांचा गौरव केला. दामले यांनी पुरस्काराविषयी माहिती दिली.

उत्तरार्धात चंद्रकांत काळे, माधुरी पुरंदरे आणि किरण यज्ञोपवीत यांनी केशवसुतांच्या कवितेवर आधारित काव्यवाचनाचा कार्यक्रम सादर केला. त्याला आनंद मोडक यांचे संगीत होते.

## * आंतरभारती अनुवाद पुरस्कार

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट संचालित आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रातर्फे यावर्षीचा उत्कृष्ट अनुवादित पुस्तकाचा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार अठरा धान्यांचं कडबोळं या पुस्तकाच्या अनुवादिका डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर यांना तर ललितेतर पुस्तकासाठीचा पुरस्कार सत्यमेव जयते- शोध राजीव हत्येचा या पुस्तकाचे अनुवादक पत्रकार सारंग दर्शने यांना जाहीर करण्यात आला आहे. प्रत्येकी १२ हजार रुपयांचे हे पुरस्कार आहेत

ज्ञानपीठ पुरस्कारादाखल मिळालेल्या रकमेमधून दोन लाख रुपये हे ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांनी आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राला देणगी म्हणून दिले होते.

अठरा धान्याचं कडबोळं या पुस्तकात यीडीश, पर्शीयन, जपानी, स्पॅनिश, झेक, इंग्रजी, ऊर्दू, हिंदी अशा देशीविदेशी १८ भाषांतील कथांचे अनुवाद आहेत. हे पुस्तक मेनका प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. पुरस्काराचे स्वरूप १२ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे आहे.

ललितेतर पुरस्कारासाठी असलेला पुरस्कार डी. आर. कार्तिकेयन आणि राधा विनोद राजू लिखित ट्रायम्फ ऑफ ट्रूथ - राजीव गांधी ॲसॅसिनेशन दी इन्वहेस्टिगेशनच्या अनुवादाबद्दल सारंग दर्शने यांना देण्यात आला आहे. हे मराठी पुस्तक राजहंस प्रकाशनने प्रकाशित केले आहे. या वर्षीचे पुरस्कार हे २००४ ते २००६ या कालावधीत प्रकाशित झालेल्या पुस्तकांसाठी आहेत.

पुरस्कार निवड समितीचे निमंत्रक डॉ. सुभाष भेंडे, डॉ. प्र. ना. परांजपे, सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस या संस्थेच्या माजी संचालिका डॉ. प्रा. सुमन बेलवलकर आणि प्रा. दीपक घारे यांच्या समितीने एकूण २४९ पुस्तकांमधून ही निवड केली.

## * मीना इनामदार यांना बाया कर्वे पुरस्कार

गेल्या अडीच दशकांहून अधिक काळ मतिमंद मुलांसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मीना इनामदार यांना यंदाचा 'बाया कर्वे पुरस्कार' जाहीर झाला आहे. मानचिन्ह व ५१ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलेला महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो.

मतिमंद मुलांच्या जीवनात प्रकाश टाकण्यासाठी इनामदार यांनी १९८०मध्ये जीवनज्योत मंडळाच्या रूपाने छोटेसे रोपटे लावले. त्यांनी शक्तीवर या निवासी संस्थेची स्थापना केली.

सुरुवातीला केवळ पाच मतिमंद मुले होती. आज या संस्थेत दीडशेहून अधिक मतिमंद मुले आहेत. ही मतिमंद मुले स्वतः अर्थार्जन करीत आहेत. या मुलांच्या

शिक्षणात तसेच सुरक्षा व पुनर्वसन यात पालक-शिक्षकांचा सहभाग आवश्यक आहे, ही भावना निर्माण करून सर्वांचे सहकार्य मिळवले आहे. या संस्थेत मुलांना दिले जाणारे शिक्षण, आरोग्य, आहार याची माहिती घेण्यासाठी देशभरातून प्रशिक्षणार्थी येतात.

आदर्श माता, अहल्याबाई होळकर व आदर्श शिक्षक पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना यापूर्वी गौरविण्यात आले आहे.

*** पहिला 'समर्पण' पुरस्कार रामकृष्ण मठास प्रदान**

स्वामी रामकृष्ण, स्वामी विवेकानंद म्हणजे जीवनाला घडविणारा मंत्र असल्याचे मत प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी ३१ ऑक्टोबरला व्यक्त केले.

एल. टी. मारणे मेमोरियल फाउंडेशनतर्फे सामाजिक संस्थांना दिला जाणारा पहिला 'समर्पण' पुरस्कार रामकृष्ण मठास भोसले यांच्या हस्ते देण्यात आला. माजी खासदार विदुरा नवले, रामकृष्ण मठाचे स्वामी भौमानंद, अरविंद गोखले या वेळी उपस्थित होते. मारणे यांच्या जीवनाचा आढावा घेणाऱ्या 'कृतार्थ' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. नवले म्हणाले, ''संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांची समाजाला गरज आहे. त्यांचे विचार आत्मसात केले, तरच समाजाला स्थिरता लाभू शकेल.''

*** शं. ना. नवरे यांना गदिमा पुरस्कार**

ज्येष्ठ साहित्यिक, पटकथाकार, नाटककार शं. ना. नवरे यांना गदिमा प्रतिष्ठानाचा 'गदिमा पुरस्कार' आणि चैत्रबन पुरस्कार सुधीर गाडगीळ यांना व गृहिणी सखी-सचिव पुरस्कार मृणालिनी शिवाजी सावंत यांना व गदिमा स्नेहबंध पुरस्कार उल्हास पवार यांना जाहीर झाला आहे.

मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते टिळक स्मारक मंदिर येथे १४ डिसेंबर रोजी हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

माडगूळकर म्हणाले, ''शंकर नारायण (शं. ना.) नवरे यांच्या साहित्य कारकिर्दीचा सन्मान करण्यासाठी पुरस्कार देण्यात येत आहे. 'जत्रा', 'कोवळी वर्षं' आदी कथासंग्रह, 'सुरुंग', 'दिवसेंदिवस', आदी कादंबऱ्या, 'कवडसे', 'शन्नाडे' आदी ललित लेख नवरे यांनी लिहिले आहेत. याबरोबरच 'घरकुल', 'कळत नकळत', 'तू तिथं मी..' असे नितांत सुंदर चित्रपटही त्यांनी लिहिले आहेत. दहा हजार रुपये, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सुधीर गाडगीळ यांनी पत्रकारिता, लेखन याचबरोबर सूत्रसंचालक, मुलाखतकार म्हणून आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांच्या पुरस्काराचे स्वरूप अडीच हजार रुपये, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे आहे.

मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांच्या पत्नी मृणालिनी सावंत यांना गृहिणी-

सखी-सचिव हा पुरस्कार देण्यात येत आहे. पाच हजार रुपये, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे.

गदिमांशी असलेल्या स्नेहपूर्ण नात्याबद्दल पवार यांना सन्मानित करण्यात येत आहे. दहावीच्या परीक्षेत मराठी विषयात सर्वोच्च गुण मिळवलेले विद्यार्थी धीरज गायकवाड, स्वरूप चिर्के यांनाही पुरस्कार देण्यात येईल.''

### * ना. सी. फडके पुरस्कार 'इदवास'ला प्रदान

'ना. सी. फडके फाउंडेशन' तर्फे देण्यात येणारा 'ना. सी. फडके पुरस्कार' या वर्षी साहित्यिक चंद्रकात गावस यांच्या 'इदवास' या कादंबरीस देण्यात आला.

फाउंडेशनचे विजय फडके व्यासपीठावर उपस्थित होते.

जंगलतोडीचे गावाच्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामांचे चित्रण गावस यांनी या कादंबरीत केले आहे. गावस म्हणाले, ''कादंबरी लिहिताना मला संदर्भ शोधत फिरावे लागले नाही. 'इदवास' हा माझा जिवंत अनुभव आहे. पैशाच्या ताकदीला व्यवस्था कशी बळी पडते, हेच या कादंबरीच्या कथावस्तूतून स्पष्ट होते. जंगलतोडीतून लोकांच्या हाताला काम मिळाले. त्यातून पैसे मिळू लागले. सहकार्याची भावना मागे पडली. लोक स्वार्थी झाले. जंगलतोडीचे भीषण परिणाम आज लक्षात येत आहेत.''

यमाजी मालकर म्हणाले, ''ना. सी. फडके यांनी ललित साहित्याचे बारकाईने विश्लेषण केले आहे. त्यांचे ललित साहित्य संपन्न आहे.''

विजय फडके यांनी प्रास्ताविक केले. रोहिणी खरे आणि गीतांजली जोशी यांनी स्वागत केले. वर्षा फडके यांनी सूत्रसंचालन केले.

### * योगेश देशमुख यांना शाहीर हिंगे पुरस्कार

'शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी'तर्फे नृत्य दिग्दर्शक योगेश देशमुख यांना शाहीर हिंगे युवा कलागौरव पुरस्कार भरत नाट्य मंदिर येथे सुरेखा पुणेकर यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी गीत आणि नाटक प्रभागाचे पश्चिम विभाग उपनिदेशक डॉ. नीलकांत कुलसंगे, शाहीर परिषदेचे प्रांताध्यक्ष दादा पासलकर, जिल्हाध्यक्षा प्रा. संगीता मावळे उपस्थित होते.

### * 'नार्वेकर नाट्यसंहिता पुरस्कार'

डॉ. सुभाष भेंडे पुरस्कृत धि गोवा हिंदू असोसिएशनतर्फे दिला जाणारा 'शशिकांत नार्वेकर नाट्यसंहिता पुरस्कार' मकरंद साठे यांनी लिहिलेल्या 'ते पुढे गेले' या नाट्यसंहितेला देण्यात आला.

११ हजार १११ रुपये, शाल, श्रीफळ आणि स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## * अमर शेख पुरस्कार

जातीयतेचे अराजक दूर करून, समतेवर आधारलेल्या बलवान भारताच्या उभारणीसाठी संतांच्या विचाराबरोबरच राष्ट्रशाहीर अमर शेख यांचे साहित्य हे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन प्रवचनकार डॉ. सुहास फडतरे यांनी केले. भीमा-नीरा विकास संस्थेच्या वतीने राष्ट्रशाहीर अमर शेख यांच्या ९२व्या जयंतीनिमित्त समाजातील विविध क्षेत्रांतील २५ गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. भीमा-नीरा विकास संस्थेचे अध्यक्ष साथी सलीम शेख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या वेळी राष्ट्रशाहीर अमर शेख यांचे ज्येष्ठ सहकारी; तसेच स्वातंत्र्यसैनिक भगवान बाबा सातारकर (वय ९२), लक्ष्मणतात्या वाघमोडे, दत्तात्रेय धनवले, सौ. अलका मोरे, सौ. अशरफ मुल्ला, भक्ती जैन, ॲड. रवी रणशिंग, शंकरदादा रोकडे, सौ. सरोज राव, सौ. मंजिरी तिक्का, सुनील गिरी, डॉ. राजेश गुप्ता, दशरथ ढोरे, योगेश ओगले, गंगाधर मेढेकर, जाहिरा मुंडे यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

## * इंदिरा गांधी सद्भावना पुरस्कार गोविंद आपटे यांना जाहीर

नवी दिल्ली येथील 'नॅशनल इंटिग्रेशन अँड इकॉनॉमिक कौन्सिल' तर्फे देण्यात येणारा 'इंदिरा गांधी सद्भावना पुरस्कार' सामाजिक कार्यकर्ते गोविंद पांडुरंग आपटे यांना जाहीर झाला आहे. विद्यार्थी सहायक समिती, कबीरबाग मठ संस्था, वनस्थळी, ग्रामीण विकास महिला केंद्र, एसओएस बालग्राम, येरवडा गांधी स्मारक ट्रस्ट आदी संस्थांमध्ये ते गेली चाळीस वर्षे कार्यरत आहेत. यापूर्वी 'राजीव गांधी शिरोमणी पुरस्कार'ही त्यांना मिळाला आहे. आतापर्यंत त्यांनी रक्तदानाची अनेक शिबिरे आयोजित केली.

## * क्षीरसागर यांना इनामदार स्मृती गौरव पुरस्कार

साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे देण्यात येणारा के. व्ही. इनामदार स्मृती गौरव पुरस्कार डॉ. अनुपमा क्षीरसागर लेखित 'ज्ञान-विज्ञान : एक आनंदयात्रा' या पुस्तकाला डॉ. चंद्रकांत बांदिवडकर यांच्या हस्ते १८ नोव्हेंबरला देण्यात आला.

## * सरस्वती उपासना पुरस्कार

प्राचीन वेदांचा हिंदू धर्माशी संबंध जोडल्याने वेदांबाबत गैरसमज पसरला आहे. वास्तविक वेदांमध्ये कोणत्याही धर्माचा नव्हे; तर मानवतेचा पुरस्कार केला आहे, असे मत पोलिस आयुक्त डॉ. सत्यपालसिंह यांनी व्यक्त केले.

वेदमहर्षी विनायकभट्ट घैसास गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त सरस्वती उपासना पुरस्काराचे वितरण झाले. वैदिक संशोधन मंडळ, वेदमूर्ती दिनकर फडके गुरुजी व रत्नागिरीचे वेदमूर्ती दत्तोपंत लेले गुरुजी यांना सरस्वती उपासना पुरस्कार प्रदान

करण्यात आले. माजी खासदार अण्णा जोशी, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे, उद्योजक विजय आठवले व वेदपाठशाळेचे प्रमुख मोरेश्वर घैसास गुरुजी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. सत्यपालसिंह म्हणाले, ''वेद प्राचीन आहेत. सर्व धर्म त्यानंतर अस्तित्वात आले. प्रत्येक धर्म आपले श्रेष्ठत्व सांगतो. मात्र वेदांमध्ये कोणत्याही धर्माचा पुरस्कार नाही. पशूवरही प्रेम करण्याची शिकवण वेदांमध्ये आहे. त्यामुळे कोणत्याही धर्मापेक्षा वेदांमधील मानवतेची शिकवण मोठी आहे.''

डॉ. रामचंद्र देखणे, वेदाचार्य मोरेश्वर घैसास गुरुजी यांची या वेळी भाषणे झाली. कृष्णा आर्वीकर यांनी प्रास्ताविक केले. मंगेश वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले.

### * पुणे मराठी ग्रंथालयाचे पुरस्कार

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे देण्यात येणारा 'कै. ना. ह. आपटे' पुरस्कार साहित्यप्रेमी भगिनी मंडळ प्रकाशित 'भारतीय भाषांतील स्त्री साहित्याचा मागोवा' या ग्रंथास, तर 'कै. ना. के. बेहेरे' हा पुरस्कार डॉ. कृ. पं. देशपांडे लिखित 'कथा क्रांतिकारकांच्या' या पुस्तक संचाला देण्यात आला.

ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष मुकुंद अनगळ यांनी पुरस्कारार्थींचा परिचय करून दिला. साहित्यप्रेमी मंडळाच्या प्रकल्पप्रमुख डॉ. मंदा खांडगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. अध्यक्ष मोहन दाते, प्रा. चारुदत्त निमकर, सुहास नातू उपस्थित होते.

डॉ. भाटे म्हणाल्या, ''साहित्य आणि स्त्री-प्रश्नांचा चहू अंगांनी विचार केल्यामुळे या ग्रंथास संशोधनमूल्य प्राप्त झाले आहे. स्त्री-प्रश्नाच्या पलीकडे जाऊन उपेक्षितांचे अंतरंग स्त्रियांनी साहित्यातून मांडले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची जिद्द यातून अधोरेखित झाली असून, नवीन पिढीला यामुळे नक्कीच प्रोत्साहन मिळेल. यापुढे स्त्रियांनी वैज्ञानिक साहित्याकडे वळायला हवे,'' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'कथा क्रांतिकारकांच्या' पुस्तकातून स्वातंत्र्यवीरांचे आचारविचार, त्यांचे भावविश्व, तत्त्वज्ञान डॉ. देशपांडे यांनी सखोल पद्धतीने मांडले आहे. आजच्या आदर्शशून्य वातावरणात तरुण पिढीला नवीन विचार देण्यासाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल,'' असेही डॉ. भाटे यांनी सांगितले.

### * डॉ. अनिल अवचट यांना अनंत भालेराव पुरस्कार

संवेदनशील लेखक, कार्यकर्ते आणि समाजसेवक डॉ. अनिल अवचट यांना दि. ५ नोव्हेंबर रोजी अनंत भालेराव स्मृती पुरस्कार मधुकरराव मुळे यांच्या हस्ते औरंगाबाद येथे प्रदान करण्यात आला. रोख ११ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

निर्भीड पत्रकार व ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी अनंत भालेराव यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

अनंत भालेराव यांनी निर्भीड पत्रकारिता रुजविली. मराठवाड्यावरील अन्यायाबाबत सरकारवर सडेतोड टीका केली; मात्र त्यांची टीका विधायक असायची. त्यांची पत्रकारिता नवीन पिढीला माहीत व्हावी, आदर्श घ्यावा यासाठी प्रतिष्ठानतर्फे हा पुरस्कार दिला जातो.

डॉ. अनिल अवचट यांना देण्यात आलेल्या आणि डॉ. सुधीर रसाळ यांनी लिहिलेल्या सन्मानपत्राचे वाचन प्रा. विजय दिवाण यांनी केले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर अनिल अवचट यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम झाला. त्यात अवचट यांनी लेखनामागील आपली भूमिका स्पष्ट केली.

मी लेखक नव्हे; तर चांगले जगू इच्छिणारा आणि इतरांनी चांगले जगावे, असे मानणारा... एवढीच माझी पात्रता आहे. जे पाहिले आणि सांगावे वाटले ते सांगतो... लेखन हे केवळ माध्यम आहे असे सांगत अवचट यांनी समाजातील वास्तवाचे विदारक चित्र डोळ्यांपुढे उभे केले.

ते म्हणाले, माझ्या गावातील समृद्ध जीवन पाहायला मिळाले. मिळून मिसळून कसे राहायचे हे गावात शिकलो. आपला गाभा गावचाच आहे. साऱ्यांनी चांगले जगावे, हे ग्रामीण वातावरणाने शिकवले. आपण कोणतेही ठरवून लिहीत नाही, जसे दिसत गेले तेच लिहीत गेलो. चळवळीत काम करत असताना अनेकदा तुरुंगात जाण्याचे प्रसंग आले. तुरुंगाच्या गजाआड, पुण्याच्या ससूनमध्ये काम करताना समाजाचे खरे दर्शन झाले. जे काही अस्वस्थ करणारे वाटले तेच लिहीत गेलो. लिखाणाला उपजत प्रेरणा असेल तरच लिखाण जिवंत होत असते; मग त्यासाठी कशाला हवीय शैली, असा सवाल त्यांनी केली. आपले लिखाण, लोकांना जे आवडते ते देऊन 'कॅश' करणारे नाही. 'मार्केट'ची गरज लक्षात घेऊन लेखन करणे आपला स्वभाव नसल्याचे त्यांनी सांगितले.

*** ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार**

''माझ्यासारख्या वारकरी उपासक सेवकास प्रदान करण्यात आलेला 'ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार' हा जनताजनार्दन, संतसज्जन आणि सरकारच्या रूपाने विराजमान असलेल्या श्री विठ्ठलाचाच कृपाप्रसाद आहे,'' अशी भावना डॉ. दादामहाराज मनमाडकर यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनातर्फे उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या हस्ते मनमाडकर यांना 'ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सांस्कृतिकमंत्री अशोक चव्हाण अध्यक्षस्थानी होते. प्रभावतीदेवी मनमाडकर, उल्हास पवार, आमदार मोहन जोशी, हेमंत टकले, महापौर राजलक्ष्मी भोसले, शशिकांत पागे, जिल्हाधिकारी चंद्रकांत दळवी, फादर फ्रान्सिस दिब्रिटो, रामेश्वरशास्त्री, डॉ. सदानंद मोरे, पं. गुलाम दस्तगीर या वेळी उपस्थित होते.

मनमाडकर म्हणाले, ''ज्ञानोबा-तुकाराम हे वारकरी संप्रदायाचे संतद्वय सर्वोच्च आणि सर्वात्मक भाव धारण करणारे आहेत. हा उद्घोष टाळ-मृदुंगाच्या साथीने भक्तिभावाने गायला जातो. या श्रद्धेने संप्रदायाचे संघटन आणि संवर्धन होते. वारकरी संप्रदायाने धार्मिक प्रबोधनाचाची परिणती गाठली आहे. जातीय दंगलीपासून ते अतिरेकी आणि हिंसात्मक कारवायांनी चिंतातूर होत असलेल्या देशास विश्वधर्मात्मक सामंजस्याची आणि सहिष्णुतेची गरज आहे. ती पूर्ण करण्याची दिशा वारकरी संतसाहित्यात आहे.''

पाटील म्हणाले, ''विस्कटलेला समाज भक्तिप्रवाहात आणण्याचे कार्य करणारे वारकरी संप्रदाय हे महाराष्ट्राचे शक्तिस्थान आहे.''

''शिवाजीमहाराजांना हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी पार्श्वभूमी संतांनी तयार केली. आता विकासाच्या गप्पा आम्ही मारत असलो, तरी धनदांडगे गुंड निवडून येतात, अधिकारी माजोरी होतात आणि वजन ठेवल्याशिवाय फायली पुढे सरकत नसतील, तर वारकऱ्यांनी पुढे यावे. या आंदोलनात मी सहभागी होईन,'' असे पाटील म्हणाले.

सांस्कृतिक संचालक अजय आंबेकर यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. रामचंद्र देखणे यांनी सूत्रसंचालन केले. संजीव अभ्यंकर, आरती अंकलीकर-टिकेकर आणि शौनक अभिषेकी यांनी अभंग सादर केले. डॉ. सदानंद मोरे यांनी निरुपण केले.

## * डॉ. गंगवाल यांना 'अहिंसारत्न' पुरस्कार

'सर्व जीव मंगल प्रतिष्ठान'चे संस्थापक अध्यक्ष आणि शाकाहार व्यसनमुक्ती चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. कल्याण गंगवाल यांना 'अहिंसा' आणि 'शाकाहार' प्रबोधन कार्यासाठी ग्वालियर (मध्य प्रदेश) येथे 'सकल जैन समाजा'तर्फे 'शाकाहार अहिंसा रत्न' पुरस्कार शाकाहार अहिंसा परिषदेत प्रदान करण्यात आला.

रोख अकरा हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. गंगवाल यांनी पुरस्कारांची रक्कम अहिंसेच्या प्रचारार्थ परत दिली. दिल्ली येथील सफदरजंग हॉस्पिटलचे डॉ. डी. सी. जैन प्रमुख पाहुणे होते.

## * निळू फुले यांना जयंतराव टिळक पुरस्कार

राजकारणात असूनही राजकारणनिरपेक्ष असणाऱ्या जयंतराव टिळक यांच्या नावाचा पुरस्कार स्वीकारताना आनंद वाटतो, अशी भावना ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांनी ६ नोव्हेंबर रोजी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या वतीने जयंतराव टिळक स्मृती पुरस्कार विधान परिषदेचे माजी सभापती ना. स. फरांदे यांच्या हस्ते फुले यांना देण्यात आला. राज्याच्या पुणे विभागाचे माहिती आयुक्त विजय कवळेकर, डॉ. दीपक टिळक, मनोहर कुलकर्णी, डॉ. सतीश देसाई आदी या वेळी व्यासपीठावर

उपस्थित होते.

प्रमिला मराठे, शुभा सोलापूरकर, बेगम मिरजकर, वत्सला पानसे, ठकूबाई बांदल यांना 'माता जानकी पुरस्कार' देण्यात आले. मैथिली आणि जयराम पोतदार यांना 'लक्ष्मीनारायण जोडी' म्हणून गौरवण्यात आले. तसेच नाट्य परिषदेच्या वतीने भेट देण्यात आलेली ज्येष्ठ रंगकर्मींची छायाचित्रे टिळक स्मारक मंदिराच्या जिन्यातील भिंतीवर लावण्यात आली.

फुले म्हणाले, ''आयुष्यात अनेक घोडचुका केल्याने पुरस्कार स्वीकारणे मी टाळतो; पण हा पुरस्कार जयंतरावांच्या नावाचा असल्याने मी नाकारू शकलो नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मी एक कार्यकर्ता होतो. तेव्हापासून जयंतरावांचा सहवास लाभला. त्या काळात नाना, भवानी पेठेत सभेला नेतेही कचरत असत. जयंतराव याला अपवाद होते. राजकारणाशिवायदेखील अनेक चांगल्या गोष्टी असतात, हे त्यांनी दाखवून दिले. त्यामुळेच हा पुरस्कार मी स्वीकारला.''

''निळूभाऊ हे माणूस म्हणून मोठे आहेत की कलाकार म्हणून मोठे आहेत, याचे मोजमापच करता येत नाही,'' असे सांगून कुवळेकर म्हणाले, ''वलय असलेला पण वलयांकित नसलेला हा माणूस आहे.''

### * सु. वा. जोशी यांना वि. पु. भागवत पुरस्कार

'मुंबई मराठी साहित्य संघा'तर्फे 'ग्रंथाली'चे संस्थापक दिनकर गांगल यांच्या हस्ते 'उत्कर्ष प्रकाशन'चे सु. वा. जोशी यांना वि. पु. भागवत पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप हाते. ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर अध्यक्षस्थानी होते. गांगल म्हणाले, ''प्रकाशनाच्या पडत्या काळात ५० वर्षांहून अधिक काळ वैविध्यपूर्ण पुस्तकांची निर्मिती करून वाचनसंस्कृती टिकविण्याचा प्रयत्न उत्कर्ष प्रकाशनने केला आहे.'' वाहिन्या आणि माहितीचा प्रचंड स्रोत निर्माण होत असताना ग्रंथनिर्मितीचे कार्य व्रतासारखे करीत आहे, अशी भावना जोशी यांनी व्यक्त केली.

### * प्रतिभा मोडक यांचा सत्कार

कृतज्ञता म्हणून हा सत्कार स्वीकारत आहे, अशा भावना प्रतिभा शाहू मोडक यांनी व्यक्त केला. प्रतिभा मोडक यांनी नुकतेच ७१ व्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्ताने 'आडकर फाउंडेशन'चे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया होते. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, डॉ. के. एच. संचेती उपस्थित होते. फाउंडेशनच्या विश्वस्त मैथिली आडकर उपस्थित होत्या. मोडक म्हणाल्या, ''शाहू

मोडक यांच्यामुळे सर्व जीवन बदलून गेले. ते माझे गुरू होते. मुंबईहून पुण्याला वास्तव्यास आल्यानंतर अवघ्या पाच महिन्यांत ते गेले. त्या वेळी पुण्यात कुणीच ओळखीचे नव्हते; पण गेल्या सोळा वर्षांपासून पुणेकर मला प्रेम देत आहेत.''

धारिया म्हणाले, ''शाहू मोडक हे श्रीकृष्णाचे बोलके रूप होते. चित्रपटातील त्यांच्या श्रीकृष्णाच्या भूमिकेच्या माध्यमातून 'श्रीकृष्णा'चे दर्शन व्हायचे.''

*** डॉ. रवींद्र शोभणे यांना 'लाभसेटवार सन्मान'**



प्रसिद्ध लेखक डॉ. रवींद्र शोभणे यांना या वर्षीचा 'डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मान पुरस्कार' जाहीर झाला आहे. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्र अशा स्वरूपाचा हा पुरस्कार जानेवारी २००९ मध्ये प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते देण्यात येणार आहे.

डॉ. अनंत आणि लता लाभसेटवार चॅरिटेबल ट्रस्ट; तसेच लाभसेटवार विद्यमाने मराठी साहित्यात लक्षणीय ठसा उमटविणाऱ्या लेखकाला हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कार निवड समितीत डॉ. आनंद यादव, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्रकाशक अनिल व सुनील मेहता यांचा समावेश होता.

समाजाचे विशेषत: विदर्भातील समाजजीवनाचे नेमके आणि संवेदनशील चित्रण डॉ. शोभणे यांच्या लेखनात प्रतिबिंबित होते. त्यांनी कथा, कादंबरी, समीक्षा, संपादन, ललित लेखन असे साहित्याचे विविध आकृतिबंध समर्थपणे हाताळले आहेत.

प्रवाह, रक्तध्रुव, कोंडी, चिरेबंद, सव्वीस दिवस, उत्तरायण, पडघम अशा कादंबऱ्या; वर्तमान, दाही दिशा, शहामृग, अदृष्टाच्या वाटा हे कथासंग्रह, कादंबरीकार श्री. ना. पेंडसे, 'सत्वशोधाच्या वाटा', 'संदर्भासह हे समीक्षाग्रंथ' आणि 'ऐशा चौफेर टापूत' हा ललितलेखसंग्रह अशी शोभणे यांची साहित्यसंपदा आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांना पुरस्कारही मिळाले आहेत.

❒



# वाचकांचा प्रतिसाद

**'इथे पुस्तके भेटतात'**

रविवारी सकाळी चहा पिता पिता कोल्हापूर आकाशवाणीवर आपल्या पुस्तकांची माहिती ऐकायला मिळते. श्रीमती वीणा मेहत्रे-मिस्त्री यांच्या अस्खलित शुद्ध परिणामकारक वाणीतून ही माहिती ऐकणे आनंददायक वाटते. आकाशवाणीवरील आपल्या पुस्तकांची माहिती ऐकून ती वाचण्याची उत्सुकता वाटते. आपणाकडून ती पुस्तके मागवून मी स्वत: वाचतो; माझ्या नातवांसाठीही योग्य ती पुस्तके मुद्दाम मागवून त्यांना वाचायला देतो. 'थॉट लीडर्स'चे परीक्षण ऐकून तेही घेण्याची इच्छा झाली. तरुणांना ते प्रेरणादायक ठरू शकेल. या अभिनव उपक्रमाबद्दल आपले अभिनंदन. आपण तो नियमित चालू ठेवावा ही विनंती.

**सुनील शेठ,**
**नागाळा, कोल्हापूर ३.**

**प्रिय सुनील मेहता,**

वेरुळला जायची योजना माझ्या मुलाने आखली, तेव्हा आपले वेरुळ-अजिंठ्याच्या लेण्याबद्दलचे पुस्तक वाचावे म्हणून आपणास फोन केला. आपण लगेच ते पुस्तक श्री. भिसे कुरियर यांच्यामार्फत पाठवून दिले याबद्दल धन्यवाद. ते पुस्तक फारच माहितीपूर्ण आहे. त्यामुळे आमचा तेथील फेरफटका छान झाला.

आपला दिवाळी अंकही अप्रतिम आहे. सर्वच लेख वाचनीय आहेत. मला हा अंक फार आवडला. तो संग्रही ठेवण्यासारखा आहे.

**पांडुरंग कुमठा**
**ई-३ सारस्वत सोसायटी, गावदेवी, मुंबई ७.**

**श्री. सुनील मेहता,**

श्रीमती आशा आपराद यांच्या ‘भोगले जे दु:ख त्याला’ या पुस्तकाचा ‘मेहता मराठी ग्रंथजगत’मधील परिचय वाचून पुस्तकाबद्दल ओढ निर्माण झाली. ते पुस्तक आमच्या वाचनालयासाठी मागवून घेतले. दि. १७-९-०८ रोजी सौ. आशा अपराद यांना वाचनालयात व्याख्यान देण्यासाठी बोलवले. त्यांचे अनुभव ऐकताना श्रोतृवृंदाच्या डोळ्यांतून अश्रू आले. सौ. श्रद्धा श्रीकांत पुजारी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. ग्रंथपाल सौ. स्नेहल संजय पुजारी यांचे बी.लिब उत्तीर्ण झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. आपराद यांच्या भाषणाने भारावून जाऊन श्री. केदार कडेकर यांनी वाचनालयाला ५०१ रुपयांची देणगी दिली.

**दत्तात्रय गजानन रुक्के पुजारी,**
**अध्यक्ष, श्रीदत्त सार्वजनिक वाचनालय, नरसोबावाडी ४१६१०४.**



**लेखिका आशा आपराद वाचनालयात व्याख्यान देताना.**

**‘इथे पुस्तके भेटतात’**

इथे पुस्तके भेटतात हा प्रायोजित कार्यक्रम आम्ही न चुकता प्रत्येक मंगळवारी आकाशवाणीवरून ऐकत असतो. या कार्यक्रमाद्वारे वेगवेगळ्या पुस्तकांची माहिती मिळते. लेखकाची ओळख व पुस्तकाचा सारांश थोडक्यात ऐकायला मिळत असल्यामुळे पुस्तक वाचण्याची ओढ या कार्यक्रमातून निर्माण होते. श्रोत्यांच्या मनात हा कार्यक्रम जिव्हाळा निर्माण करतो. हा कार्यक्रम असाच सुरू रहावा ही शुभेच्छा.

ज्याचा त्याचा, आंधळा न्याय, अवशेष, तसेच डबेवाला या पुस्तकांची माहिती उद्‌बोधक वाटली.

**विनोदकुमार ढवळे, प्रथमेशकुमार ढवळे**
**अयोध्यानगर, राळेगाव जि. यवतमाळ**

# श्रद्धांजली

## * ज्युरॅसिक पार्कचा किमयागार

'ज्युरॅसिक पार्क'चा लेखक-दिग्दर्शक म्हणून जगभर लौकिक मिळवणारा मायकेल क्रायटन हा प्रतिभावंत ४ नोव्हेंबर २००८ रोजी कर्करोगाशी संघर्ष करीत कालवश झाला; या घटनेने त्याच्या हजारो चाहत्यांना हळहळ वाटल्याशिवाय राहणार नाही. त्याचे वय फक्त ६६ होते. थरारकथांचा लेखक आणि विज्ञानातील नवनव्या कल्पनांचा वापर करून चित्तवेधक कथानकांची उभारणा करणारा चतुरस्त्र, सिद्धहस्त लेखक म्हणून वर्षानुवर्षे बेस्ट सेलर लेखकांच्या मालिकेत तो अग्रगण्य राहिला. त्यचबरोबर आपल्या कथांवरचे चित्रपटही काढण्यात त्याने स्वारस्य दाखवले; आणि आपल्या कल्पनारम्य कथावस्तूंना भव्य आणि वास्तव स्वरूपात पद्यावर 'लार्जर दॅन लाइफ' स्वरूपात दाखवून जागतिक स्तरावर लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन ठेवले. क्रायटनच्या लेखनाचा झपाटा कोणाही लेखकाला हेवा वाटावा असाच होता. हार्वर्ड युनिव्हर्सिटीत पदवीसाठी अभ्यास करीत असताना ट्युशन फी भरण्यासाठी त्याने थरारकथा लेखनाचा मार्ग पत्करला. १९६६ साली ऑड्स मॅन ही त्याची पहिली थरारकथा प्रसिद्ध झाली. तिला वाचकांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे प्रकाशकांनी त्याला भरपूर मानधन देऊन वर्षाला दोन-तीन थरारकथा जरूर दे असा आग्रह केला. स्क्रॅच वन, इझी गो, ए केस ऑफ नीड, झीरो कूल, द व्हेनॉम बिझनेस, ड्रग ऑफ चॉइस, टू टीलिंग, ग्रेट डिसेन्ड, वायनरी वगैरे थरारकथा त्याने वैद्यकीय शिक्षण घेत असताना लिहिल्या. मात्र दरम्यान 'अँड्रोमेडा स्ट्रेन' ही लष्कराच्या पार्श्वभूमीवरची कादंबरी १९६९ मध्ये त्याने प्रसिद्ध केली. या कादंबरीने बेस्टसेलमध्ये स्थान पटकावले. त्या कादंबरीचे

चित्रपटाचे हक्क त्याने हॉलीवुडला विकले तेव्हा हार्वर्ड मेडिकल स्कूलमध्ये त्याचे शिक्षण चालू होते... त्या कादंबरीतील अमेरिकेच्या लष्करातील एक आणीबाणीची घटना ही भल्याभल्यांची झोप उडवणारी ठरली...

त्याच स्वरूपाच्या परंतु वेगवेगळ्या पार्श्वभमीवरच्या कथानकांचा मायकेल क्रायटनने पाठपुरावा केला. विज्ञानाचे त्याचे आकलन सर्वंकष होते आणि त्यातील नवनव्या शोधंचा तो सातत्याने मागोवा घेत होता. टाइमलाइन, ज्युरॉसिक पार्क, एअरफ्रेम, वेस्टवर्ल्ड, प्रे यामध्ये त्याने कालप्रवास, प्राचीन अश्मीभूत डीएनएवरून अस्तंगत प्राण्यांची पुनर्निर्मिती करणे, तंत्रज्ञानातील गुंतागुंती, सायबरनेटिक संशोधन वगैरेंचा वापर केला आहे. नॅनोटेक्नालॉजीपासून ते डायनोसॉरपर्यंत प्रत्येक विषयाचे त्याला मूलग्राही ज्ञान होते आणि त्याभोवती चित्तथरारक कथावस्तूंची उभारणी करण्याचे कौशल्य त्याला अवगत होते.

त्याच्या लेखनाचा झपाटा विलक्षण होता. दरवर्षी एक तरी बेस्टसेलर कादंबरी लिहिण्याचा त्याचा कटाक्ष होता आणि त्या प्रत्येक कादंबरीत त्याचे त्या विषयातले सखोल ज्ञान आणि संशोधन जाणवत असे. त्या त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तीलाही स्तिमित करणारे तपशील आणि त्या तपशीलांचा कथानकाच्या विस्तारामध्ये केलेला चपखल वापर यामुळे त्याच्या कादंबऱ्या वाचकांनाही हातातून खाली ठेववत नसत. कथानकाच्या कालावधीबद्दलची त्याची काटेकोर जागरुकताही स्तिमित करणारी, गतिमानतेचा आदर्श प्रकट करणारी असे. प्रकरणांच्या आरंभीच तो दिवस-वेळ यांचा उल्लेख करी. अत्यंत अल्प कालावधीत तो कथावस्तूतील वेगवेगळे टप्पे वेगाने दाखवून वाचकाला त्यात झोकून देई. त्याच्या कांदबऱ्यांचे स्थापत्यशास्त्र आणि रंजनात्मक आकृतिबंध गुंतागुंतीचे असत. त्याच्या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना साधी आणि सोपी असे.

प्रयोगशाळेत संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञाला संशोधन करताना एखादा पेचप्रसंग अचानक जाणवावा, आणि तो पुरता स्पष्ट होण्याअगोदरच त्याचा भयावह, संहारक प्रभाव वाढत जावा - सगळे काही आता उद्ध्वस्त होणार म्हणून हवालदिल होण्याची, हतबल होण्याची आपल्यावर पाळी यावी आणि सुटकेचा मार्ग दिसेनासा व्हावा... 'अँड्रोमेडा स्ट्रेन'मध्ये अवकाशातून प्लेग सदृश साथीचे जंतू पृथ्वीवर येतात, 'ज्युरॅसिक पार्क'मध्ये अश्मीभूत गुणसूत्रांद्वारे डायनोसॉरसारख्या महाकाव्य प्राण्याची प्रयोगशाळेत पुनरुत्पत्ती होते, 'रायझिंग स्टार'मध्ये एक जपानी उद्योगपती अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर कब्जा मिळवण्याच्या महत्त्वाकांक्षेपोटी निरंकुश पावले उचलतो, अशा प्रकारच्या संभाव्य भयसूचक घटनांद्वारे कथावस्तूची उभारणी करण्यात मायकेल क्रायटनचा हातखंडा होता.

टाइमलाइन मध्ये नॅनोटेक्नालॉजीद्वारे मनुष्याच्या पेशीचे सूक्ष्म कणात रूपांतर करून ते भूतकाळात पाठवणे आणि तेथे पुन्हा त्याचे सूक्ष्म कणांतून मनुष्यरूपात

प्रकटीकरण करणे या कल्पनेचा वापर केला आहे. त्या दृष्टीने जगभर चाललेल्या संशोधनाचा आधार त्याने कथावस्तूच्या व्यामिश्रतेसाठी घेतला आहे. अशा प्रकारे भूतकाळात गेलेल्या व्यक्तीला पुन्हा वर्तमानात आणण्याचा मार्गच जर काही अपघाती योगायोगाने नष्ट झाला वा बंद पडला तर? या कल्पनेचाही हा प्रवास रोमांचकारक आणि सेन्सेशनल होण्यासाठी वापर करण्यात आला आहे.

एकूण काय तर मायकेल क्रायटनने सध्या विज्ञानक्षेत्रात चाललेल्या विविध संशोधन प्रकल्पातील संभाव्य धोक्यांकडे लक्ष वेधण्याचे काम कादंबऱ्यांच्या माध्यमातून करून दाखवले आहे. उद्या कुठल्याही संशोधनातून काही विपरीत, विचित्र प्रकार उद्‌भवले तर मायकेल क्रायटनची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही.

ज्युल व्हर्नने चंद्रावर जाण्याचे, पृथ्वीचा मध्यभाग गाठण्याचे, समुद्राच्या तळाशी वीस हजार लीग्ज जाण्याचे जगाभोवती प्रदक्षिणा घालण्याचे, एकाच वाहनाने जमीन, पाणी आणि अवकाशात विहार करण्याचे स्वप्न आपल्या विज्ञानकथांतून शतकापूर्वी दाखवले... अशा सिद्ध प्राप्त करताना उद्‌भवणाऱ्या समस्यांची पूर्वकल्पना देण्याचे काम मायकेल क्रायटनने आपल्या कादंबऱ्यांद्वारे केले आहे असे श्रेय त्याला देणे क्रमप्राप्त आहे.

**शंकर सारडा**

## * शिक्षणतज्ज्ञ डॉ. पु. ग. वैद्य यांचे निधन

अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी 'नापासांची शाळा' चालवून त्यांना प्रोत्साहन देणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, लक्ष्मणराव आपटे प्रशाला आणि ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य आणि पुणे महापालिका शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. पुरुषोत्तम गणेश ऊर्फ पु. ग. वैद्य यांचे १ नोव्हेंबरला हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

वैद्य यांचा जन्म नऊ मे १९३४ रोजी सातारा येथे झाला. एम.एस्सी. आण एम.एड. केल्यावर त्यांनी १९६२ मध्ये आपटे रस्त्यावर केवळ ३२ विद्यार्थ्यांची शाळा सुरू केली.

या लक्ष्मणराव आपटे प्रशालेत गणित आणि शास्त्र विषयांचे ३० वर्षे, ज्युनिअर कॉलेजमध्ये १५ वर्षे आणि अभिनव कला विद्यालय ऑफ आर्किटेक्चर येथे १६ वर्षे इंजिनिअरिंग विषयाचे अभ्यागत अध्यापक म्हणून काम केले. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी त्यांनी 'नापासांची शाळा' हा उपक्रम अनेक वर्षे राबवून कच्च्या विद्यार्थ्यांची उमेद वाढविली. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक शैक्षणिक वर्गांना त्यांनी गणित, शास्त्र विषयांचे मार्गदर्शन केले. इंग्लंडमधील लगबरो विद्यापीठातील 'सेंटर फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ मॅथमॅटिक्स एज्युकेशन अँड टेक्नॉलॉजी' येथे १९८१-८२ या वर्षी गणिताच्या प्रगत अभ्यासक्रमासाठी त्यांची निवड झाली होती.

त्यांनी विज्ञानकथा, गणित रंजन आणि शिक्षण यांसह विविध नियतकालिके, पाठ्यपुस्तक मंडळासाठी लेखन केले. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील आधारित 'नापासांची

शाळा', तसेच 'विज्ञान राक्षस' या कादंबऱ्यांचे आकाशवाणीवरून १३ भागांमध्ये प्रसारण झाले होते. 'हरवलेले शोध' हे त्यांचे विज्ञानकथांचे पुस्तक प्रसिद्ध आहे. गणित आणि शास्त्र या विषयांच्या प्रसारासाठी त्यांचे आकाशवाणी आणि दूरदर्शनवरून ५०हून अधिक कार्यक्रम प्रसारित झाले होते. नागरी संघटनेच्या माध्यमातून ते पुणे महापालिकेवर निवडून आले होते. पुणे विद्यापीठाच्या अधिसभेचे; तसेच महापालिका शिक्षण मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी यापूर्वी काम केले होते.

शिक्षण क्षेत्रातील कार्याबरोबर नागरी संरक्षण क्षेत्रातील विशेष कार्याबद्दल १९८० मध्ये त्यांना राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले होते. ते 'एचआयव्ही'बाधित मुलांसाठी काम करणाऱ्या 'मानव्य' संस्थेचे विश्वस्त, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, चिंचवड येथील मोरया शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, भगीरथ सहकारी औद्योगिक सहकारी संस्थेचे अध्यक्ष, विद्या महामंडल आणि आपटे प्रशालेचे संस्थापक-विश्वस्त म्हणून शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अखेरपर्यंत कार्यरत होते.

## * ज्येष्ठ साहित्यिक, कवी रवींद्र भट यांचे निधन

संतांचे चरित्र कादंबऱ्यांतून रेखाटणारे लेखक, प्रसिद्ध कवी व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी प्रमुख कार्यवाह रवींद्र भट (वय ६९) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दि. २२ नोव्हेंबर रोजी निधन झाले.

रवींद्र भट यांचा जन्म १७ सप्टेंबर १९३९ रोजी वाई येथे झाला. वाईच्या द्रविड हायस्कूलमधील शिक्षणानंतर पुण्याच्या स. प. महाविद्यालयातून त्यांनी बी. ए. पदवी संपादन केली. १९६८ ते १९८० या कालावधीत त्यांनी आकाशवाणी पुणे केंद्रावर निवेदक म्हणून नोकरी केली. त्यांनी काही नभोनाट्यांचे लेखन केले होते. त्यांचे काही कार्यक्रम दूरदर्शवरून प्रसारित झाले होते. रवींद्र भट यांना ज्ञानेश्वरांवरील 'इंद्रायणीकाठी' या कादंबरीने साहित्यजगताची मान्यता मिळाली. 'सागा प्राण तळमळला', 'भेदिले सूर्यमंडळा', 'भगीरथ', 'अनादि मी अनंत मी', 'घरट्यात मी एकटा', 'देवाची पावले', 'आभाळाचे गाणे', 'सत्यम शिवम सुंदरम', 'घास घेई पांडुरंगा', 'एका जनार्दनी', 'हेचि दान देगा देवा' या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

भट यांची 'योगसुखाचे साहळे', 'ज्ञानदेवा डोळा पाहू चला', 'कृष्णाकाठचा भुत्या', 'सारी पावले मातीचीच' ही ललित पुस्तके, 'अरे संसार संसार', 'केल्याने होत आहे रे', 'अवघी दुमदुमली पंढरी', 'असा नवरा नको गं बाई', 'एक कळी फुललीच नाही' ही नाटके, 'मोगरा फुलला', 'ओठावरले गाणे', 'जाणता अजाणता', 'मन गाभारा गाभारा', 'खुर्ची' हे कवितासंग्रह अशी साहित्यसंपदा आहे.

त्यांनी 'ते माझे घर', 'गोविंदा गोपाळा' आणि 'नसती उठाठेव' या चित्रपटांसाठी कथा-पटकथा लेखन केले होते. 'ते माझे घर' चित्रपटाला १९६३ मध्ये राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यांनी चित्रपटांसाठी गीतलेखन केले होते.

‘श्रमिक हो घ्या इथे विश्रांती’, ‘उठी श्रीरामा पहाट झाली’ आणि ‘दिव्या दिव्यांची ज्यो सांगते’ ही त्यांची गीते लोकप्रिय झाली. त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषद, फाय फांउडेशन, वाईभूषण, ना. ह. आपटे, स्वामी स्वरूपानंद पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

## * तात्यासाहेब महाजन

पैठण येथील ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, वैद्य तात्यासाहेब ऊर्फ विठ्ठल पंडित महाजन (वय ९८) यांचे रविवारी औरंगाबाद येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

तात्यासाहेब महाजन यांनी निझाम राजवटीच्या विरोधात औरंगाबाद-नगर जिल्ह्याच्या सीमेवर एरंडगाव येथे स्वातंत्र्यसैनिकांसाठी सुमारे दीड वर्ष कँपचे आयोजन केले होते. या कँपच्या माध्यमातून त्यांनी निझामी राजवटीविरुद्ध सशस्त्र लढा उभा केला होता. त्यांनी गोदावरी नदीकाठची १४ गावे स्वतंत्र केली होती. त्यांना तुरुंगवासही झाला होता. तात्यासाहेब महाजन यांच्या पार्थिवावर ९ नोव्हेंबर रोजी पुष्पनगरी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले.

मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या मैत्र जीवाचे या पुस्तकाचे लेखक डॉ. भवान महाजन हे त्यांचे पुत्र होत. त्यांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

## * मंगलाराजे पटवर्धन

भूतपूर्व मिरज संस्थानच्या कन्या श्रीमंत कुमारी मंगलराजे पटवर्धन (वय ८६) यांचे १४ नोव्हेंबर रोजी पुणे येथील मिरज हाऊसमध्ये निधन झाले. सत्तर वर्षांहून अधिक काळ त्यांचे मिरजेतच वास्तव्य होते.

बेडग रस्त्यावरील हिराबाग राजवाड्यात त्या राहात होत्या. त्या उत्तम चित्रकार होत्या. त्यांची अनेक चित्रे आजही या राजवाड्यात आहेत. अनेक नियतकालिकांमधील त्यांचे स्फुट लेखन विशेष गाजले होते.

त्यांनी लिहिलेली ‘रिबेका’ ही कादंबरी विशेष लोकप्रिय झाली होती. मिरज शहरातील ज्युबिली लायब्ररी, खरे मंदिर वाचनालय, ज्युबिल कन्या शाळा, नवयुग महिला मंडळ या संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

## * सुधाकर गद्रे

मुलुंडच्या महाराष्ट्र सेवा संघाचे माजी अध्यक्ष आणि प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक सुधाकर लक्ष्मण गद्रे (वय ७६ वर्षे) यांचे १६ नोव्हेंबर रोजी निधन झाले. गद्रे यांनी समाजातील अनेक संस्थांना आर्थिक मदतीचा हात दिला होता. साहित्य संस्कृती आणि कला क्षेत्रातील कलावंत साहित्यिकांना ते गेली अनेक वर्षे मातोश्री पुरस्कार देऊन गौरव करीत होते.

❐



# बालनगरी

अनुक्रमणिका

कासवाची जीत १०६



# कासवाची जीत



ससा आणि कासवाच्या गोष्टीत, ससा हरला, कासव जिंकले. त्याला बरीच वर्षे लोटली. हरलेल्या सशाचा नातू भयंकर चिडला. एकदा त्या वेडपट कासवाच्या आजोबांनी आमच्या आजोबांना हरवले आणि सगळया सशांची बदनामी झाली. आम्ही किती चपळ, देखणे पण आमचे आजोबा गवत खाऊन झोपले आणि हरले म्हणून आमची जातच आळशी झाली आणि ते मंद कासव जिंकले हा इतिहास बदलायची त्या हरलेल्या सशाच्या नातवाला फार इच्छा होती, तो अस्वस्थ होता. आता तो पुन्हा ती झोपण्याची चूक कदापि करणार नव्हता, सशांच्या घराण्याचे नाव त्याला उज्वल करायचे होत. त्याची अक्षरशः झोप उडाली, त्याच्या आईबाबांनी त्याला खूप समजावले पण सशाला तो जुना अपमान खूप झोंबत होता. तो ससा त्या जिंकलेल्या कासवाच्या घरी जाऊन म्हणाला - ''आपण पुन्हा पैज लावू या. त्यावेळी केवळ नशीब म्हणून तुझे आजोबा जिंकले. आता मला ते सगळे बदलायचे आहे. आम्ही ससे एवढे वेगाने धावतो. आमच्या नखाची तरी सर तुम्हाला आहे का? आता मीच जिंकेन. मग सगळा इतिहास बदलेल, जगाला आमची लायकी कळेल आणि तुमचीही.''

कासव ह्या अनपेक्षित हल्ल्याने गडबडून गेले. कसेबसे

हसत ते म्हणाले, ''जाऊ द्या ससेभाऊ. तो एक अपघात होता, झाले गेले विसरून जाऊ आपण दोघे. मी मान्य करतो की तुम्ही श्रेष्ठ आहात, आम्ही मंद, बोजड आहोत! वाटल्यास जाहीर सभा घेऊन सर्वांना सांगू की ती गोष्ट खोटी आहे. ससेच चपळ, वेगवान असतात.''



ससा ऐकायला तयार नव्हता. तो नुसता पेटून उठला, दातओठ खात म्हणाला, ''नाही स्पर्धा होणारच. मी जिंकणार, माझी टी. व्ही. वर मुलाखत होणार तिथे मी तुला बोलावणार, तू तुझा पराभव मान्य कर. हरलो म्हणून कबूल कर आणि आमच्या विजयाची घोषणा कर.''

ससा हट्टाला पेटला, काही केल्या ऐकेना, मोठ्या कासवांनी गोड शब्द वापरले. त्याला गाजर खायला दिले. सगळ्या सशांनीही समजूत घातली पण त्याच्या डोक्यात अपमान बसला होता तो काही ऐकण्याच्या मनःस्थितीतच नव्हता!

शेवटी त्या कासवाचा नाइलाज झाला. तो पैजेला तयार झाला.

एका टी. व्ही. चॅनेलकडे तो गेला. स्पर्धेचे व्हिडिओ

शुटिंग करायचे ठरले.पळणारा ससा, चालणारे कासव आणि सीमारेषा सर्वांचे शुटिंग ठरले. कासवाने टी. व्ही. चॅनलवाले, जे बातमीदार होते त्या सगळयांना भरपूर पैसे दिले आणि मॅनेज केले.

ससा ऐटीत आला. पैज सुरू झाली. शुटिंग सुरू झाले, ससा लवकरच सीमारेषेजवळ पोचलाही.

हाय रे दैवा! कासव ह्याही वेळी जिंकले होते. आपली कुरूप मान पुढे काढून हसत होते. सशाने गवत खाल्ले नाही, झोप काढली नाही. मग असे कसे झाले? आता तर व्हिडिओ शुटिंगही होते.

चॅनलवाल्यांनी सशाला स्लो करून आयडिया करून कासवाला शुटिंगमध्ये फास्ट दाखवले आणि शेवटी सीमारेषेवर एक डुप्लिकेट कासव ह्या कासवाचा सख्खा जुळा भाऊ ठेवला होता त्यामुळे शर्यतीतले कासव जिंकल्याचा भास झाला, खरे कासव आरामात हळूहळू आपल्या गतीने चालत होते.

बिचारा ससा भयंकर निराश होऊन घरी आला. सशाचे आजोबा आळशीपणाने हरले आणि नातू कासवाच्या हुशारीने परत हरला

हात नव्हे कान हलवत ससा घरी परतला.

कासवाने जिंकण्याची परंपरा कायम ठेवली!

परत ससेभाऊंची जिरली!

**अनघा ठोंबरे.**




## डिसेंबर

०३ डिसेंबर - डॉ. राजेंद्रप्रसाद जन्मदिन (१८८४)

०६ डिसेंबर - डॉ. आंबेडकर पुण्यतिथी (१९५६)

०७ डिसेंबर - ध्वजदिन

१० डिसेंबर - मानवी हक्कदिन

११ डिसेंबर - कोयना भूकंप (१९६७)

१२ डिसेंबर - हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन (१९३०)

१५ डिसेबर - सरदार वल्लभभाई पटेल स्मृतिदिन

१९ डिसेंबर - गोवा मुक्तिदिन (१९६१)

२० डिसेंबर - संत गाडगेबाबा पुण्यस्मरण

२४ डिसेंबर - साने गुरुजी जयंती (१८९९)

२५ डिसेंबर - येसू ख्रिस्त जयंती

## चित्र रंगवा



### सुविचार

सदाचार हा मनुष्याचा खरा अलंकार आहे.

## कविता

आदी म्हणते आजीला,
गणपतीपेक्षा कृष्ण रोड,
गूळपोहे चिकट ढोण,
मोदक छान लागतो गोड.
राम आणि मारुती
फक्त सुंठवडा खाती
सगळे येतात एकच दिवस,
गणपती छान अकरा
दिवस,
आजी म्हणाली घेऊन पापे,





एकाच देवाची अनेक रूपे,
मोदक, पोहे, सुंठवडा
खाऊ,
प्रसाद घेऊन तृप्त होऊ.
डोळे मिटून जोडूहात,
म्हण मनातल्या मनात
शक्ती, बुद्धी, आरोग्य दे
एक छोटे भावंड दे,
सारे सुखी होऊ दे...

**माधुरी शानभाग, बेळगाव**

# ओळखा पाहू

भारताची सुप्रसिद्ध धावपटू



विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

नोव्हेंबर अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

मराठीतील अष्टपैलू साहित्यिक, नाटककार, संपादक, शिक्षणतज्ज्ञ, चित्रपट निर्माते - **आचार्य प्रल्हाद केशव अत्रे**

स्पर्धेचे विजेते **- पंडित हिंगे, हडपसर, पुणे**

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक**

राम घाटे-अकोला, मिनाज मुल्ला-सातारा, रविंद्र सराफ, नंदकिशोर शुक्ल-जळगाव, कमलाकर बावस्कर-बुलढाणा, हरिभाऊ शिंदे, निरंजन भगुरकर, शरदचंद्र वांगे-पुणे.

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी, टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**(साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी.)**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

**उत्तर पाठविण्याचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस,१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे-४११ ०३०.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## वर्गणीचे नूतनीकरण करा.

| | |
|---|---|
| एक वर्षाची वर्गणी | १५० रु. |
| तीन वर्षांची वर्गणी | ३५० रु. |
| पाच वर्षांची वर्गणी | ५०० रु. |

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**




३ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'वपु ८५'
वपु काळे
हे ६०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'आरोग्यासाठी योग'
अनु. मंगेश कश्यप
हे ८०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.




**भेट पुस्तके - प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L-2/RNP/PNW/M/38/2006-2008 / L.NO.LWP-50/
Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 December 2008.

# फॉल्स इम्प्रेशन

९/११च्या घटनेचा फायदा घेऊन डॉ. ॲना पेट्रेस्कू या तरुणीनं एक धाडसी बेत आखला. एका गरीब स्वभावाच्या भोळ्या स्त्रीला सर्वस्व गमावण्यापासून वाचवण्यासाठी!

तिचा मुकाबला होता, इच्छित ते मिळवण्यासाठी कशाचाही विधिनिषेध न बाळगणाऱ्या, अगदी सुपारी देऊन खून पाडायलाही न कचणाऱ्या बँकरशी – ब्रायस फेन्स्टनशी.

न्यूयॉर्क ते लंडन, ते बुखारेस्ट, टोकियो असा श्वास रोखून धरणारा प्रवास केल्यानंतर उलगडेल व्हॅन्गॉगच्या 'सेल्फ पोर्ट्रेट विथ बँडेज्ड इअर' या जगप्रसिद्ध चित्राचे रहस्य. धक्कादायक आणि रोमांचक अशी जेफ्री आर्चर यांची कादंबरी.




**: जेफ्री आर्चर**
अनुवाद :सुधाकर लवाटे

## मेहता पब्लिशिंग हाऊस
**१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोनभवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४.**

प्रति,
________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३४६ गणेश पेठ, पुणे २.